कै.

# श्रीनिवास रामचंद्र बोबडे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३९९

# समग्र कविता

REFBK-0022589

रा. वि. मालकर

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना**:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र.मा.प.)


किंमत—१० रुपये

२२५८८
काव्य
२३९६



कै. श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णासाहेब बोबडे

कै. श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णासाहेब बोबडे

यांची

# क वि ता

REFBK-0022589

*

आवृत्ती दुसरी

प्रकाशक :
नागपूर साहित्य संघ
C/o श्री. दा. दे. हिंदु मुलींची शाळा
गांधीगेट, महाल, नागपूर.

मुद्रक :
**वामन या. हिवसे**
वंदना प्रिंटींग प्रेस
नरसींग टॉकीजजवळ,
महाल, नागपूर ४४०००२.

# प्रकाशकाचे निवेदन

कविवर्य कै. श्रीनिवास रामचंद्र उपाध्य अण्णासाहेब बोवडे यांच्या काव्य-संग्रहाची ही दुसरी आवृत्ती. पहिली आवृत्ती १९३७ साली–म्हणजे अण्णाजींच्या मृत्युनंतर तीन वर्षांनी त्यांच्या मित्रमंडळींच्या खटपटीने प्रसिद्ध झाली होती. ती आवृत्ती अण्णाजींचे परम सुहृद कविवर्य कै. जयकृष्ण केशव उर्फ बुवासाहेब उपाध्ये यांनी तयार केलेली होती. ती आवृत्ती तयार करण्याचे काम संपवून बुवांनीही या जगाचा निरोप घेतला. प्रत्यक्ष प्रकाशन पहायला ते थांबले नाहीत. जणू काही अण्णाजींचा हा परम मित्र केवळ आपल्या मित्राच्या समाधीवर वहावयाच्या पुष्पांचा गुच्छ गुंफण्याकरताच मागे थांबला होता. ते काम हाता-वेगळे होताच तोही तातडीने अण्णाजींना भेटायला निघून गेला.

अण्णाजींच्या कविताची ही पहिली आवृत्ती दुर्मिळ झाली. ती इतकी दुर्मिळ का झाली याचाही इतिहास आहे. पण त्याची पुनरावृत्ती न करणेच इष्ट.

आज अण्णाजींचे चिरंजीव अॅड. भाऊसाहेब बोवडे यांनी पुन्हा प्रयत्नपूर्वक या कविता रसिकांना उपलब्ध करून देण्याचे कार्य अंगावर घेतले आणि विदर्भातील एक सुप्रसिद्ध कवी, समीक्षक आणि अभ्यासक प्रा. कै. भवानीशंकर पंडित यांनी त्यांना साथ दिली त्यामुळे आजची ही दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे पहिल्या आवृत्तीचे संपादन विदर्भाचे ज्येष्ठ कवी बुवा उपाध्ये यांनी केले होते आणि दुसऱ्या आवृत्तीचे संपादनही अशाच एका ख्यातनाम कवीकडून होत आहे ही मोठी भाग्याची गोष्ट आहे.

अण्णासाहेब हे महाराष्ट्रातील श्रेष्ठ दर्जाच्या कवींपैकी एक होते. साऱ्या आयुष्यात त्यांनी पाऊणशेहून अधिक कविता लिहिल्या नाहीत. परंतु कवीचे श्रेष्ठत्व लेखाच्या लांबी रुंदीवरून आणि पानांच्या संख्येवरून ठरत नसते. अण्णाजी तर त्याबावतीत अधिकच विलक्षण. 'माझे गाणे मजकरता' असा त्यांचा खाक्या होता. निंदास्तुतीची पर्वा नव्हती. लहर लागली की गायचे. त्यांतही काव्य हाच काही त्यांचा एकमेव छंद नव्हता. हाडाचा रसिक असलेला हा माणूस जीवनाच्या अंगाअंगातून रसपान करण्यात गुंतला होता. ते जितके काव्यांत रमत तितकेच गाण्यात, तितकेच खेळात, तितकेच गप्पात. कशात त्यांना रस नव्हता व कशाच्या ते मागे लागत नव्हते हे सांगणे कठीण. आणि प्रत्येक गोष्टीत आकंठ डुंबून जाणारा हा जीव कशातच गुंतून पडत नव्हता. तांब्याच्या कविता आस्थेनं जपून ठेवणाऱ्या अण्णाजींनी आपल्या कवितांची कधीच आस्था केली नाही.

ती केली त्यांच्या मित्रांनी, चाहत्यांनी. अण्णाजींच्या नाराजीची पर्वा न करता त्यांनी परस्पर त्यांच्या काही कविता निरनिराळया नियतकालिकांतून प्रसिद्ध केल्या आणि अण्णाजींच्या प्रतिभेचा सुगंध सर्वदूर दरवळू लागला.

१९३० साली अण्णाजींच्या मित्रमंडळीनी नागपुरात 'वागीश्वरी' हे मासिक सुरू केले व त्याच्या संपादनात अण्णाजींना गोवले. अण्णाजी इतरांसाठी कितीही तुसडे व एकांतप्रिय असले तरी मित्रत्वाच्या नात्यात त्यांच्याजवळ हातचे काही नव्हते. त्यांनी वागीश्वरीच्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली व आपल्या कविता त्यातून प्रसिद्ध करू लागले. त्या बहुतेक 'रसिक' वा 'श्रीराम' या टोपण नावाने असत.

अण्णाजींच्या कवितांच्या अनेक वह्या होत्या. त्यांत काही कविता एकापेक्षा अनेक वेळा लिहिलेल्या होत्या. पहिल्या आवृत्तीची मुद्रणप्रत बुवा उपाध्यांनी त्यावरून केली. परंतु अण्णाजींच्या हयातीत वागीश्वरीत प्रसिध्द झालेल्या कवितांचे पाठ व पुस्तकातील पाठ यांत अनेक ठिकाणी भेद आहेत. प्रस्तुत आवृत्तींत संपादकांनी वागीश्वरीतील पाठांना प्रमाण मानले आहे. कारण ते पाठ स्वत: अण्णाजींच्या हातचे होते. पहिल्या आवृत्तींत समाविष्ट नसलेल्या कांही कविता या दुसऱ्या आवृत्तींत समाविष्ट केल्या आहेत. त्या पुस्तकाच्या अखेरीस 'शृंगार संगीता' नंतर घातल्या आहेत.

ही दुसरी आवृत्ती प्रसिध्द होण्यासाठी कै. प्रा. भ. श्री. पंडित यांनी व मुद्रक श्री. वामनराव हिवसे यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल प्रकाशक त्यांचे आभार नमूद करतो.

नागपूर
१९-१-१९७८

प्रकाशक

# अनुक्रमणिका


| क्र. | कविता | पान नं. |
|---|---|---|
| १ | मृत्युलेख | १ |
| २ | प्रसाद | २ |
| ३ | मंगलमय सुखकंद | ३ |
| ४ | नमस्कृति | ४ |
| ५ | अहं | ५ |
| ६ | सारा वृथा वृथा अभिमान | ६ |
| ७ | आत्मनिवेदन | ८ |
| ८ | रसिकास | ९ |
| ९ | स्वतःप्रामाण्य | १० |
| १० | कुंकुम | ११ |
| ११ | शुभमंगल सावधान | १२ |
| १२ | आनंदी-आनंद | १३ |
| १३ | महाकवी बेबंद | १४ |
| १४ | भारतवर्ष गुणगान | १५ |
| १५ | जयजय भारतवर्ष | १६ |
| १६ | पंढरी | १७ |
| १७ | मीलनें | २० |
| १८ | राधामाधव | २१ |
| १९ | प्रेमाचा परिचय | २३ |
| २० | परिचयाचे प्रेम | २६ |
| २१ | नारी तरुणाची संपदा | २८ |
| २२ | लावणी | ३० |
| २३ | प्रबोधन | ३२ |
| २४ | पौर्णिमा | ३३ |
| २५ | लावणी | ३४ |
| २६ | रंगपंचमी | ३६ |

| | | |
|---|---|---|
| २७ | सोन्याचा खंजीर | ३७ |
| २८ | बासरिचा झंकार | ३८ |
| २९ | अबोला | ३९ |
| ३० | कमला | ४१ |
| ३१ | लावणी | ४४ |
| ३२ | प्रीतीचे दिव्य | ४५ |
| ३३ | चिरंजीवास | ४७ |
| ३४ | जोगीण | ४८ |
| ३५ | पंजाबी भाई | ५१ |
| ३६ | स्वातंत्र्य समर | ५३ |
| ३७ | हरहर महादेव | ५५ |
| ३८ | !! | ५७ |
| ३९ | ज्योति | ५८ |
| ४० | पहिले चुंबन | ५९ |
| ४१ | प्रिये खेळु खेळ | ६१ |
| ४२ | प्रीति | ६३ |
| ४३ | कालिंदी | ६४ |
| ४४ | प्रभातमंगल | ६५ |
| ४५ | विजयोत्सव | ७० |
| ४६ | गडि मर्द मराठा वीर | ७४ |
| ४७ | उन्नति झाली ! श्रीमंता गरिबी आली | ७७ |
| ४८ | पोवाडे | ७८ |
| ४९ | संदेश | ८० |
| ५० | हरवले माझे पिंपळपान | ८२ |
| ५१ | अभिनंदन | ८३ |
| ५२ | वचनभंग | ८५ |
| ५३ | गंगास्तव | ८७ |
| ५४ | माझ्या अंगणी | ८९ |
| ५५ | बालगीत | ९० |
| ५६ | महाकवि व अरसिक | ९१ |
| ५७ | प्रणयाच्या तीन अवस्था | ९२ |

५८ विडंबन ९३
५९ प्रीति विवाह ९४
६० वैताग ९५
६१ नाटकी पोर ९६
६२ योगी शिरोमणी ९८
६३ लग्न कचेरित नोंदुनि झाले ९९
६४ अस्ताव्यस्त सौंदर्य १०१
६५ स्फुट कविता व सुभाषितें १०२
शृंगार संगीत १११ ते १२८
६६ जय हिंदभूमी १२९
६७ सोक्ष की मोक्ष १३०
६८ बिकट वाट १३०
६९ खेळगडी १३१
७० माझी सुशी १३२
७१ सखूबाई १३२
७२ रंग खेळत हरी १३३
७३ काळी चंद्रकळा १३४
७४ मेले नवरे १३५
७५ चांदणी १३५
७६ स्फुट कविता १३६
७७ हिंदी कविता १३९

२२५८८
२३९९

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

कै. श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णाजी बोवडे यांच्या दुर्मिळ झालेल्या कविता-संग्रहाची दुसरी आवृत्ती आज प्रसिध्द होत आहे. कै. बोवडे यांच्या काव्यसंग्रहाच्या पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना महाराष्ट्रांतील प्रख्यात कवि श्री. आत्माराम रावजी देशपांडे उर्फ कवि अनील यांनी लिहिली होती. या दुसऱ्या आवृत्तीची ही प्रस्तावना लिहिण्याचे काम माझ्याकडे आलेले आहे.

कवि अनील व मी यांत निदान एका पिढीचे अंतर आहे. तेव्हां कै. बोवडे यांच्या कवितांच्या श्रेष्ठ काव्य-गुणांबद्दल, त्यांच्या सौंदर्याबद्दल, त्यांच्या भाव-मधुरतेबद्दल, जरी कसलाच मतभेद झाला नाही तरी ते काव्य समजून घेण्याच्या बाबतीत किंवा त्याकडे पाहण्याच्या बाबतीत मत-भिन्नता होणे स्वाभाविक आहे.

कवीच्या काव्याचे रसास्वादन करताना कोणत्या कसोटया लावाव्या. याबाबतहि मतभेद, होणे अपरिहार्य आहे. काव्याचे समीक्षण करताना काव्यबाह्य कसोटया लावण्यात येऊ नये असे सांगण्यात येते. परंतु काव्यबाह्य कसोटया कोणत्या आणि काव्यांतर्गत कसोटया कोणत्या हे मात्र कोणीच सांगत नाही. कारण कोणालाहि ते माहीत नाही. आणि काव्यबाह्य कसोटया लावू नये असे म्हणणारे स्वतःच काव्यबाह्य निकषावर काव्याचे विश्लेषण करू लागतात असे आढळून येते.

माझ्या अल्पमतीप्रमाणे काव्यात कवी आपल्या मनीचे भाव प्रकट करीत असतो. हे जे मनीचे भाव आहेत ते कांही हवेतून निर्माण होत नाहीत; किंवा आकाशातून पडत नाहीत. बाह्यजगताशी संबंध आल्यानंतर मनाची जी प्रतिक्रिया होते त्यांतूनच भाव निर्माण होतात. तेव्हां भावांचा व बाह्य जगताचा संबंध हा अतिशय घनिष्ठ आहे. कवीची बाह्य जगताबद्दलची ही जी प्रतिक्रिया आहे ती सुध्दा प्रत्येक व्यक्तिगणिक वेगळी राहील. त्या व्यक्तीचा जीवनाबद्दलचा जो दृष्टीकोन राहील त्यानुसार ही प्रतिक्रिया राहील. आणि हा जो जीवनाबद्दलचा दृष्टीकोन आहे तो त्या व्यक्तीच्या जगातील अस्तित्वाची जी कांही परिस्थिति आहे त्यावर बव्हंश अवलंबून असतो. उदाहरणादाखल कविवर्य बोवडे यांची 'विजयोत्सव' ही कविता घ्या. पहिले महायुध्द जिंकल्यानंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जो विजयोत्सव साजरा केला त्याबद्दलची कटु प्रतिक्रिया त्यांत व्यक्त झाली आहे. ही प्रतिक्रिया सर्वस्वी भारतातील माणसाची आहे. ब्रिटनमधल्या माणसाची ती असू शकत नाही, हे कुणाच्याहि सहज लक्षात येण्यासारखे आहे. तेव्हां काव्यात जे भाव व्यक्त होतात त्यांचा संबंध तो कवि कोणत्या दृष्टीकोनाचा आहे त्यावर अवलंबून आहे, व त्या कवीचा दृष्टीकोन तो कोण आहे-इंग्रज की

भारतीय–यावर अवलंबून आहे हें स्पष्ट आहे. जी गोष्ट कविमनाच्या अभिव्य' क्तीची आहे तीच गोष्ट कवि व त्याचा आस्वादक यांच्यांतील परस्पर संबंधांची आहे. 'पोटास लागती कळा आमुच्या भुकेने, ते नाच रंग तुमचे विजयोत्सवाने या बोरकरांच्या कवितेच्या ओळी तुमच्या आमच्या हृदयाच्या तारा छेडून जातात. परंतु त्याच ओळी वाचून ब्रिटिश साम्राज्याच्या पाइकांना त्यांत राजकीय प्रचार, चिथावणीखोरपणा, वगैरे आढळते व त्यावर ते प्रचारी वाङ्मय असा शिक्का मारून मोकळे होतात. त्यांना कांही ती कविता आवडू शकत नाही. 'गॉड सेव्ह द किंग' किंवा 'ब्रिटानिया रूल्स द वेव्हज्' या गाण्याचे सूर सुरू होताच गोरे उठून उभे राहतात व आपल्याला चपला किंवा सडकी अंडी फेकून मारावीशी वाटतात. तेव्हां कवि आणि त्याचा रसास्वाद घेणारा यांच्यात सुसंवाद स्थापन होण्यासाठी दोघांतही दृष्टीकोनाचे साधर्म्य हे आवश्यक आहे, हे स्पष्ट होते. आणि ते दृष्टीकोनाचे साधर्म्य दोघांचीहि जीवनाची परिस्थिति साधारण आहे की भिन्न आहे यावर मुख्यत: अवलंबून आहे.

बोरकरांचे शृंगार संगीत हे एक श्रेष्ठ काव्य आहे यांत मुळीच संशय नाही पण 'वैकुंठास सदेह नीट चढणे शय्या विमानातुनी' ही त्यांची भावाव्यक्ति कदाचित संभोगातून समाधीकडे जाऊ पाहणाऱ्यांना पटकन पटेल. अंधारात महोत्सव करून निशा घालविण्याची कल्पना रोषणाईच्या झगझगाटात वावरणाऱ्याला मोठी सुंदर वाटेल, पण तीच झोपडपट्टीत अंध:कारमय जीवन जगणाऱ्याला ती कितपत मानवेल हा प्रश्नच आहे. नर नारीच्या शृंगाराचे बोरकरांनी रसिकपणाने केलेले वर्णन अभिजातांच्या अंत:करणाला सुखद गुदगुल्या करील, परंतु कशी तरी शरीराची भूक भागविण्यापलीकडे ज्यांच्या आयुष्यांत शृंगाराला काही वाव नाही त्यांना हे सारे श्रीमंतांचे चोचले वाटेल तर त्यांत नवल वाळगण्याचे काही कारण नाही. 'नकोच सन्मान नकोच किर्ती, कुबेर संपत्ती नको मला ती । सवस्व माझे हृदयेश्वरी ही, सदैव देवा मजलागी देई,' असे उद्गार संपत्तीत लोळणारा कुबेर काढू शकतो. ज्याला दोन वेळच्या भाकरीचीहि भ्रात आहे तो ते उद्गार काढू शकत नाही. तो कुबेराची संपत्तीच कशाला, भाकरीचा एक तुकडा मिळाला तरी आपल्या हृदयेश्वरीचा सौदा त्याच्या बदल्यात करून टाकील. हे हृदयेश्वरी पुराण त्याच्यापुढे गाणे म्हणजे गाढवापुढे गीता गाण्यासारखेच ठरेल.

तेव्हां कवी आणि त्याचा आस्वादक यांच्यातहि सुसंवाद असावा लागतो. त्याच्या अंत:करणाच्या तारा एकाच पट्टीत लागलेल्या असाव्या लागतात. आणि हा सुसंवाद दोघांच्या दृष्टोकोनातील साधर्म्यावर अवलंबून असतो आणि जीवनातील दृष्टीकोन माणूस ज्या वातावरणात जगतो त्यावर निर्भर असतो.

आणि म्हणून कवीचे काव्य समजून घेण्यासाठी त्याचा जीवनविषयक दृष्टीकोन समजून घेणे आवश्यक असते. त्याशिवाय त्याची संगती लागत नाही.

कै. बोबडे यांचे काव्यावर जुन्या संस्कृत कवींचा व मराठी लावणीकारांच्या वाङ्मयाचा पगडा आहे आणि त्यांच्या काव्याचा प्रमुख रस शृंगार आहे, व तो अनेक वेळा उत्तानाकडे झुकणारा आहे, असे त्यांच्या साऱ्या विवेचकांचे म्हणणे आहे. पण असे कां ? त्याचे उत्तर देण्याला ही विवेचक मंडळी कचरतात. कारण तसे केले तर 'काव्यबाह्य' क्षेत्रांत पाऊल टाकण्याचा दोष आपल्या हातून घडेल असे त्यांना वाटते. परंतु त्याचे उत्तर समजुन घेणे बोबड्यांची कविता समजून घेण्यासाठी आवश्यक आहे असे माझे मत आहे.

**'निशावसानी जरि कामिनीला**
**आलिंगुनी देह न धन्य केला**
**तरी स्वयें लावुनि भस्म अंगी**
**हिमाचली होऊन बैस योगी'**

असे बोबडे म्हणतात. येथपर्यंत ठीक आहे. जगांत राहून जर त्या जगाचा उपभोग घ्यायचा नाही तर त्यांत अर्थ नाही. परंतु बोबडे तेवढ्यावर थांबत नाहीत. ते पुढे जातात, आणि म्हणतात—

**'युद्धी ठोकुनी दंड सज्ज अरिशी सोत्कंठ झुंजावया**
**किंवा प्रेममहोत्सवी तरुणीशी आनंद भोगावया**
**जे जे वीर, समर्थ तेच असती, धिक् भीरूवृत्ती जन**
**ज्यांचे सार विचार नीती नियमे माघार घेई मन.**
**विद्या बुद्धि श्रुतिहि सगळ्या सर्व शास्त्र प्रमेये**
**लज्जा भीती, नय विनयहि, तीहि अत्युच्च ध्येये**
**जी जी तत्वे खचुनी भरली वेदवेदांत पृष्ठी**
**ती नारीच्या विहरति सुधासारधाराधरोष्ठी.'**

युद्धात कापाकापी करणारे आणि रतिमंदिरांत स्त्रीला कुस्करणारे हेच तेवढे आदर्श पुरुष आहेत आणि सारासार विचार व नीती नियम विचार ही भीरूवृत्ती आहे ! जगांत जे कांही वांछनीय आहे ते सारे नारीच्या ओठांत आहे ! हा दृष्टीकोन क्षत्रियाचा आहे, राजपुरुषाचा आहे. पण बोबडे यांचे काळांत क्षत्रियहि नव्हते व राजपुरुषहि नव्हते. आणि त्याची त्यांना खंत होती. त्यांच्या कवितांतून ती जागोजागी व्यक्तहि झाली आहे.

**ते दिवस कधीच मावळले, शौर्य ते लपले**
**लोपले शूर । गडि मर्द मराठा वीर**

आणखी एका ठिकाणी ते म्हणतात–

ते दिवस संपले गेले । वीर लोपले
लपले शाहीर, पोवाडे गावे कुणावर
लोपले सर्व नरमणी । लोपले म्हणुनि
सर्व शाहीर, पोवाडे गावे कुणावर ?
आता कुठूनी स्फूर्तीच्या लहरी । पोवाडे कुणावरी
गाऊ कोठून, पोवाडे करू कुणावरून

जुने गेल्याची खंत होती आणि त्याच्या जागी जे नवे आले होते त्याबद्दल तिटकारा होता.

हे दिवस पूर्ण सौख्याचे हे दिवस आरामाचे
हे दिवस लेखणीचे स्वराज्य भीक मागण्याचे
हे दिवस वक्तृत्वाचे ठराव पास करण्याचे
हे दिवस सहानुभूतीचे हे दिवस शिष्टाईचे
हे दिवस अनुकरणाचे हे दिवस वृत्तपत्रांचे
यांच्यावर गाऊनि गाणी । शिणवु का वाणी ?
भूमीला भार, पोवाडे गावे कोणावर ?

बोबडयांच्या काळांत रानडे, गोखले, टिळक, गांधीच्या नेतृत्वाखाली जी स्वराज्याची चळवळ चालू होती त्याबद्दल बोबडयांची ही भावना होती. हातात तलवार घेतल्याशिवाय स्वराज्याची चळवळ होतच नाही हा त्यांचा ठाम विश्वास होता. पुन्हा पुन्हा ते हरहर महादेव गर्जा आणि तोफांना सरबत्ती द्या असे सांगताना आढळतात. पण तोफाच नव्हत्या आणि सरबत्तीहि नव्हती. त्यांच्या मते ज्योति विझुन गेली होती आणि ती पुन्हा प्रज्वलित करायला 'मंत्रज्ञ' हवा होता. दहशतवादी क्रांतिकारकांच्या स्वरूपात त्यांना तो आढळला. गदर पक्षांत दिसला. त्यांच्याबद्दल त्यांनी लिहिले. सावरकरांच्या कमला काव्यावर त्यांनी रचलेले गीत हे दहशतवादी क्रांतिकारकांच्या पूजेचेच गीत आहे. परंतु हे पर्व क्षणकाल टिकले व विझून गेले. पुन्हा अंध:कारच.

बोबडयांना अभिप्रेत असलेले वीरांचे आणि राजपुरुषांचे जग नष्ट झाले होते. त्यांना अतिशय घृणा असलेल्या वैश्यवृत्तीचे जग निर्माण झाले होते. 'स्वार्थपरायण वैश्यवृत्तिच्या प्रचंड कलहात' त्यांना प्रिय असलेल्या जगाचे, कल्पनांचे व मूल्यांचे दहन झाले होते व नव्या जगाचा, नव्या कल्पनांचा व नव्या मूल्यांचा

उदय होत होता. जुन्या जगाला कवटाळून असलेल्या बोबड्यांना त्या नव्या जगाशी सुसंवाद साधता येत नव्हता, नव्या दृष्टीकोनाशी सहमत होता येत नव्हते. प्रीतीच्या संसाराबद्दल त्यांना तिटकारा होता. कचेरींत नोंदलेल्या लग्नाबद्दल नफरत होती. सरस्वतीच्या अनुग्रहाचा विक्रय करणाराला ते खल म्हणत होते. कवीला आश्रय देणारे राजपुरुष गेले म्हणून त्यांना दुःख होते. नाटक कंपनीत स्त्री भूमिका करणे त्यांना पसंत नव्हते. प्रीति–विवाह नामंजूर होता. तरुणाची संपदा असलेल्या नारीचे स्वातंत्र्य त्यांना नामंजूर होते. गंगेचे गचाळ पाणी त्यांना अजून पवित्र होते. शाळेंत जाऊन शिक्षण घेणे म्हणजे आयुष्य वाया दवडणे आहे असे त्यांना वाटत होते.

पण हे सारे आले होते व राहणार होते. ते त्यांच्या परवानगीने आले नव्हते व त्यांच्या नाराजीची पर्वा न करता राहणार होते. इतिहासाच्या प्रक्रियेने ते आले होते व इतिहासाची ती प्रक्रिया त्यांना आकलन होत नव्हती. ती आकलन व्हायला गतिवादी विचाराची वैठक लागते. बोबडे स्थितिवादी होते. आपल्याला अभिप्रेत असलेले जग हेच श्रेष्ठ व त्यांत बदल होणे म्हणजे प्रलय, असे प्रत्येक प्रस्थापिताला वाटत असते; व म्हणून त्याचा बदलाला विरोध असतो. तो स्थितिवादी असतो. बोबडेहि तसेच होते. पण गति हा जगाचा नियम आहे. ती थोपविण्याचे सामर्थ्य कोणातहि नाही. बोबडे यांच्यातहि नव्हते; व म्हणून जुने जग पुन्हा येईल म्हणून डोळे लावून बसलेले बोबडे शेवटी निराश होऊन, वैय्यर्थ्याच्या भूमिकेवर आले. 'व्यर्थ व्यर्थ ईशेच्छेविण हा कर्तृत्वाचा बाणा' असे म्हणू लागले. 'धिग् मानवा । व्यर्थ ताठा तुझा' म्हणून मानवालाच धिक्कारू लागले. बाहुबलाने सागर पोहण्याची इर्षा बाळगणारा हा कवी 'होता कुणी जगांत नाही ठिकाण ठाव' म्हणून केविलवाणे क्रंदन करू लागला.

ज्या काळांत केशवसुतासारखा कवी जुन्या युगाची तुतारी स्वप्राणाने फुंकून जुने मरणालागी जाऊ द्या असे सांगत होता व 'प्राप्त काल हा विशाल भूधर । सुंदर लेणी त्यावर खोदा' असे आवाहन करीत होता. त्याच काळात बोबडे जुन्यावर नजर लावून बसले होते व नव्याकडे त्यानी पाठ फिरविली होती. स्वतःला हरवून बसलेल्या पिढीची ही शोकांतिका होती. ती बोबड्यांच्या काव्यरूपाने जिवंत झाली आहे. त्या पिढीच्या वेदना, त्या पिढीच्या यातना, त्या पिढीची आत्मवंचना, त्या पिढीचे आक्रंदन, बोबड्यांच्या काव्यरूपाने सजीव व बोलके झाले आहे. त्या पिढीच्या अंतर्मनाचे दर्शन ते आपल्याला घडवित आहे.

कवीचा जीवनविषयक दृष्टीकोन हा जसा त्यांतील आशय निश्चित करीत असतो तसाच तो त्याच्या बाह्य–स्वरूपावरहि परिणाम करीत असतो. आशय व त्याची अभिव्यक्ती यांत एक अविभाज्य असे नाते आहे. बोबडे यांच्या जातीचा

कवि कितीहि निराश झाला तरी 'मनीच्या आशा शेण झाल्या' असे लिहू शकणार नाही.त्यासाठी सारी मानवीं मूल्ये आणि सुंदरतेचे मुखवटे उध्वस्त करून टाकणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थेच्या चरकांत उसासारखे पिळून फोफट झालेले आधुनिक मध्यम वर्गीय मनच लागते. काव्य करणे म्हणजे शारदेची आराधना करणे आहे अशी कल्पना उराशी बाळगून असलेले मन कितीहि पस्त झाले तरी 'पिपात मेले ओल्या उंदिर' अशा 'ओंगळ' ओळी लिहू शकणार नाही. 'मंगलं भगवन्नाम मंगलं नाम शारदा' असे म्हणत आपल्या उत्तान शृंगार संगीताची रचना करणारे बोबडे अतीव निराशावस्थेतहि आपल्या भावना 'धिङ् मानवा, व्यर्थ ताठा तुझा हा तुझी व्यर्थ ही सर्व वाचालता । नीच स्थिति सर्व विश्वामधे रे ! तुला क्षुद्र कीटाहुनि सर्वथा । अशा 'संभावित' शब्दांतच आपला क्षोभ व्यक्त करतील. जुन्या सरंजामशाहीच्या अभिजाततेत मुरलेले त्यांचे सुसंस्कृत पांडित्य अश्लीलतेशी स्पर्धा करण्याचा चावटपणा करू शकेल, पण 'सर्वे सुखिना जंतु' म्हणण्याचा मर्ढेकरी 'धच्चोट' पणा करूं शकणार नाही. त्यांच्या 'कीटाचा' 'जंतु' होणार नाही.

तात्पर्य काय की कवीचा जीवनविषयक दृष्टीकोन जसा त्याच्या काव्यात प्रतीत झाला असतो तसाच तो त्याच्या अभिव्यक्तितहि प्रतीत झाला असतो. सध्या नवकाव्य म्हणून जे काही गाजते आणि वाजते आहे ते जुन्या सरंजामशाही जगातील अभिजाततेच्या फोल कल्पनांना उध्वस्त करून त्या जागी आपल्या नागड्या पिळणुकीच्या नागड्या मूल्यांची प्रस्थापना करणाऱ्या नव्या जगाचे काव्य आहे. ते जितके जुन्या सरंजामी युगाचा उपहास आहे, तितकेच ते नव्या विद्रुप जगाबद्दलचेहि आक्रंदन आहे. ते आक्रंदन जुन्यांना कळत नाही व 'बीभत्स ! बीभत्स !' म्हणून ते त्याविरुद्ध ओरडतात. आणि मग नवे या जुन्यांच्या आभिजात्यत्वाच्या मायावी मुखवटयाखाली दडलेला त्यांचा हिडीस चेहरा बाहेर काढतात. ते हिडीस होते, हे बीभत्स आहे.

मग सुंदर काय ? मंगल काय ? पवित्र काय ? ते सुंदर आहे निर्मितीच्या श्रमाने भाल प्रदेशावर उगवलेले मौक्तिकबिंदु. ते पवित्र आहे अन्यायाच्या प्रतिकारार्थ सांडलेले मानवी रक्ताचे तीर्थ. ते मंगल आहे शोषणावर आधारलेला समाज नष्ट होऊन त्या जागी समता, बंधुत्व व स्वातंत्र्य यावर आधारलेल्या समाजाची निर्मिती. त्या सौंदर्याची, त्या पावित्र्याची आणि त्या मांगल्याची गाणी गायला हवा तो दृष्टीकोन. तो दृष्टीकोन काव्यांत आणणे हे नव्या पिढीचे काम आहे.

—दि. वा. फडणवीस

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

**" फुले कुणाला वहायचीं तर पुढे समाधीवरी वहा ।**
**झर झर पाऊल टाकित येतो तिथेंच त्याची वाट पहा ।।"**

असे आपल्या काव्याच्या चाहत्या लोकांस सांगून श्रीनिवास रामचंद्र बोवडे खरोखरच झरझर समाधीकडे गेले. आतां प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या या काव्य-संग्रहाची प्रस्तावना समाधीवरच्या फुलांसारखीच होणार आहे. हा काव्यसंग्रह आज प्रसिद्ध न होतां जर दहाबारा वर्षापूर्वी, जेव्हां बोवड्याच्या काव्यगंगेचा पूर भरास आला होता, तेव्हां प्रसिद्ध झाला असता तर आधुनिक मराठी काव्यांत त्याला एकदम महत्त्वाचें स्थान मिळालें असतें. बोवड्याच्या योग्यतेची ओळख पटून जिवंतपणींच त्यांचेवर स्तुतिसुमनें उधळलीं गेलीं असती. पण सर्व साधनें अनुकूल असतां आणि मित्रांचा अतिशय आग्रह असतां देखील, बोवडे आपला काव्यसंग्रह प्रसिद्ध करायचा नाही हीच वृत्ती धरून होते –

**"कशास निंदास्तुति चिंता**
**गाणें माझें मजकरितां"**

असे बोवड्यांच्या सारखे उद्गार इतर कांहीं कवींनीही काढलेले आहेत. बोवड्यांनीं मात्र ते शब्द खरोखरच आचरणांतही आणले होते. बोवड्यांनी आपले हे काव्यरसाने पुरेपूर भरलेले कमल विजनातच फुलविले होते तरी, कांही रसिक भृंग त्यांतील मधु सेवन करण्यास मार्ग काढीत जातच असत. आज या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनामुळे सर्वच रसिकांना त्यांच्या काव्याचा आस्वाद घ्याव-याम मिळणार आहे.

बोवडे यांनी इ. स. १९१५ ते १९२५ या दशकांत या संग्रहांतील उत्त-मोत्तम कविता लिहिल्या. त्या काळच्या कवितेत आणि आजच्या कवितेत थोडा बहुत फरक निःसंशय पडलाच आहे. जीवनात जसे नित्य नवनवीन उदयास येणार, रुचिपालट होत जाणार, तसतसे काव्यही नवोनव रूप धारण करणार व काव्यभिरुची बदलणार. काव्यकृती वा कोणत्याही कलाकृती, ज्या काळांत त्या निर्माण झाल्या त्या काळाशी कांही अंशांनी व कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात समरस असणारच. त्या काळातील साहित्यविषयक प्रचलित विचारांचा त्यांच्या स्वरूपावर परिणाम होणारच. सर्व मानवी कृतीप्रमाणेच काव्यकृतीहि कालसापेक्ष असतात. त्या कालसापेक्षतेत त्या कृतीचे महत्व ओळखणे हे अभ्यासकांचे कर्तव्य

आहे. बोबड्यांच्या ह्या काव्यसंग्रहाचा रसास्वाद घेताना, तो आज प्रसिद्ध होत आहे म्हणून आजचाच आहे असे समजून कोणी त्याकडे पाहील, तर तो या काव्यसंग्रहाचा रसास्वाद घेण्यात विनाकारणच अडचणी उत्पन्न करून ठेवील.

१९१५ च्या दोनतीन वर्षे आधीपासून तो १९२५ च्या दोनतीन वर्षे नंतर पर्यंतचा काळ हा काव्याच्या भरभराटीचा होता की नाही हे जरी आज निश्चितपणे ठरवता येत नसले, तरी तो काळ कवीच्या महत्त्वाचा होता, यात शंका नाही. त्या काळांत ललितवाङ्मयसृष्टीत कवी आणि नाटककार यांनाच अतिशय महत्त्व आले होते. आता ते महत्त्व हळू हळू कादंबरीकार व लघुकथा-लेखक यांना येऊ लागले आहे. त्या कवीना महत्त्व असलेल्या काळात, नारायण वामन टिळक, तांबे, गोविंदाग्रज, बालकवि व 'बी' हे कवी ललितवाङ्मयाकाशांत ठळक ताऱ्यासारखे चमकत होते. इतर कितीएक कमीअधिक तेजाचे तारे उगवत होते, प्रकाशत होते व अस्तास जात होते. आज जसा एकदा नवसाहित्यिक ललितवाङ्मयसृष्टीत बहुधा लघुकथेने प्रवेश करतो तसा त्या काळात एखाद्या कवितेने करीत असे. त्या काळात केशवसुतांच्या कवितेचा जोमदार पुरस्कार झाला व विनायकाच्या कवितांचा साकल्याने रसास्वाद घेतला गेला. त्या काळा-तच आधुनिक काव्याला स्थिरासन प्राप्त झाले. टिळकांच्या काव्यांतील सहानुभूतीने, तांब्यांच्या कवितेतील मोहनीने, गोविंदाग्रजांच्या कवितेतील तेजाने, बालकवींच्या निसर्गसमरसतेने व 'बी' कवींच्या सहजतेने आधुनिक काव्य रसिकादरास पात्र झाले.

त्या काळात तीन प्रमुख विचारप्रवाह आधुनिक मराठी काव्यात दिसून येत होते. एक केशवसुतांच्या सामाजिक सुधारणावादी व प्रतीतिधर्मी (mystic) कवितेचा, दुसरा विनायक व गोविंद कवींनी वाढविलेल्या राष्ट्रीय कवितेचा व तिसरा गोविंदाग्रजांनी पुनरुज्जीवित केलेल्या शाहिरी कवितेचा. श्रीनिवास रामचंद्र बोबडे आधुनिक मराठी कविता अत्यंत काळजीपूर्वक वाचून व अभ्यासून तिचा रसास्वाद घेत असत. त्या काळांत आजच्यासारखे काव्यसंग्रह प्रसिध्द झालेले नव्हते. बोटावर मोजता येतील इतके थोडे आधुनिक काव्यसंग्रह त्यावेळी होते पण कुठे एखाद्या मासिकात अगर वर्तमानपत्रातसुध्दां कुणाचीहि प्रसिध्द झालेली कविता बोबडे यांच्या वाचनातून सुटत नसे. त्यातील चांगल्या कवितांचा काळजीपूर्वक संग्रह करण्याचा तर त्यांना हव्यासच होता. ह्या त्यांच्या हव्यासा-नेच कविवर्य तांबे यांचा काव्यसंग्रह संकलित स्वरूपांत एकदम मिळू शकला, ही गोष्ट सर्वांस माहित आहेच. ह्या त्यांच्या व्यासंगामुळे बोबडे हे वर सांगितलेल्या तीन्ही आधुनिक विचारप्रवाहांशी चांगले परिचित होते. परंतु केशव-सुतांच्या सुधारणावादी व प्रतीतिधर्मी कवितेशी बोबडे कधीच समरस होऊं शकले नाहीत. १९२३ ते २५ ह्या दोन वर्षांत बोबडे यांच्या निकट सहवासाचा

लाभ मला झाला असता केशवसुतांच्या काव्याविषयी पुष्कळदां चर्चा झाली, पण केशवसुतांच्या महत्त्वाबद्दल त्यांचे व माझे एकमत कधींच होऊ शकलें नाही. त्यांच्या घराण्यात संस्कृत साहित्यशास्त्राचा अभ्यास चांगला. स्वत: बोवडे यांनी संस्कृत काव्याचा व साहित्यशास्त्राचा उत्तम अभ्यास केलेला होता. त्या परंपरेत मुरलेल्या त्यांच्या काव्याभिरुचीला केशवसुतांच्या बंडखोरींत रुचण्यासारखे कांहीच नसावे हे साहजिकच होते. केशवसुतांचे काव्य त्यांना आवडत नसे याची इतरहि कारणे होती. त्या कारणामुळेच बोवडयांच्या कवितेला वैशिष्टय आले आहे. शब्दकलेविषयीं कमालीचा चोखंदळपणा हे त्यातले एक कारण होते.

केशवसुतांच्या सुधारणावादी व प्रतीतिधर्मी काव्यप्रवाहाशी जरी बोवडे समरस होऊं शकले नाहीत तरी राष्ट्रीय व शाहिरी कवितांच्या प्रवाहाशी ते ते पूर्णपणे समरस झाले होते. ह्या प्रवाहांत त्यांचा सूर अगदी स्वतंत्र होता व तो प्रवाह वाढविणारे ते एक स्वतंत्र प्रतिभेचे निर्माते होते. कोणत्याहि समकालीन कवींचे सादपडसाद बोवडे यांच्या कवितेत दिसून येत नाहीत. विनायक, गोविंद, तांबे, गोविंदाग्रज, बालकवि, 'बी' या सर्वांच्या काव्याचा अभ्यास असून, त्यांचे-विषयी आदर असूनही त्यांचे अनुकरण बोवडे यांनी कोठेंच केलेले दिसत नाही. नव्हे, त्यांचा पुसट छाप पडलेला देखील बोवडयांच्या कवितात कोठे दिसून येत नाही. म्हणूनच मी बोवडे यांना स्वतंत्र प्रतिभेचे निर्माते म्हणतों. या स्वतंत्रपणामुळेच बोवडयांना आधुनिक काव्यविकासाच्या इतिहासात महत्वाचे स्थान द्यावयास हवे. आज प्रसिद्ध होणारा हा संग्रह जर त्यांनी १०-१५ वर्षांपूर्वी प्रसिध्द केला असता तर गडकरी यांच्या निधनाने रिकामी झालेली जागा त्यांना त्याच वेळी खात्रीने मिळाली असती. आजसुद्दां विचारवंत टीकाकार त्यांना ती देतील अशी आशा करण्यास कांही हरकत आहे असे मला वाटत नाही.

आता, बोवडे यांच्या काव्याचा विचार करण्यपूर्वी या लहानशा प्रस्तावनेत देखील बोवडे ह्या व्यक्तीबद्दल थोडे तरी लिहिणें जरूर आहे. तीन वर्षापूर्वी, त्यांच्या निधनानतर 'वागीश्वरी' ने जो 'बोवडे-अंक' प्रसिद्ध केला, त्यात त्यांच्या निकट सहवासाचा लाभ ज्यांना ज्यांना झाला त्या निरनिराळ्या मंडळींनी त्यांचे स्वभावचित्रण उत्तम प्रकारे केलेलेच आहे. बोवडे ही व्यक्ति त्यांच्या काव्या-इतकीच, किंबहुना अधिक आकर्षक होती बुद्धिमान् वकील म्हणून त्यांची ख्याति वाढतच होती. त्यांच्या भोवती जमा होत असलेल्या मित्रमंडळाइतके विविधमंडळ एकाद्याच साहित्यिकाला लाभले असेल. कवि ह्मणजे एक साधा भोळा, जरासा विचित्र, हळव्या हृदयाचा व व्यवहारास पारखा असा मानवी प्राणी अशी सर्व-साधारण जनतेची समजूत असते. ह्या समजुतीचा पाठपुरावा करून, आपण कवी आहोत असे दाखवण्यासाठी पुष्कळ 'कवि-लोग' तसे बनतातही. कवीविषयी अशी समजूत घेऊन जर कोणी बोवडयांकडे गेला असता, तर त्याला त्यांची

व्यवहारकुशलता, चाणाक्षपणा व चतुर धूर्तता पाहून धक्काच बसला असता. बोबडे यांना कोणी 'कवि' म्हटलेले फारसे खपत नसे. 'हा मला बावळट समजतो की काय ?' असेच त्यांना कोणी 'कवि' म्हटले असता वाटायचे. 'कवि' ही एक शिवी आहे." या विनोदी वाक्याचे जनक बोबडेच होते. कोणी 'कवि' म्हणून कवि बोबड्यांचेकडे गेला तर ते आपले काव्य शक्य तो त्यापासून लपविण्याचाच प्रयत्न करीत. या जगात, जगातील एक सर्व साधारण व्यवहारी मनुष्य म्हणून जीवनाचा पुरेपुर रसास्वाद घेता यावा याकरिताच काव्याभ्यासाची व काव्य-निर्मितीची जरूर आहे, असे बोबड्यांचे काव्याविषयीचे विचार होते. त्यांच्या निकट मित्रत्वाचा कांही काळ मला लाभ झाला असता, मला हेच दिसले की त्यांची कला त्यांच्या जीवनाहून विभिन्न नव्हती. स्वतःच्या जीवनास परिपूर्ण व सौंदर्यमय करण्याचे एक साधन या दृष्टीनेच ते काव्याचा व्यासंग ठेवीत असत. ते आपल्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध करण्यास तयार नव्हते, व कोठे एखाद्या मासिकात त्यांची एखादी कविता छापून यायची तीही मित्रांनी त्यांना न विचारता पाठवलेली असावयाची, याचे कारण माझ्या मते हेच होय. बोबड्यांना मनापासून वाटत असे की ज्या लोकांचा आपल्या जीविताशी संबंध आला त्यांचाच आपल्या काव्याशी संबंध यावा. ते आपल्या जीविताचाच एक भाग समजत असत. बोबड्यांच्या व्यक्तित्वाचा दुसरा विशेष म्हणजे त्यांची रसिकता. त्यांची रसिकता त्यांच्या कवित्वापेक्षाही मोठी होती. बोबडे आधी रसिक व मग कवी होते. ज्यांना ज्यांना म्हणून आपल्या कविता त्यांना दाखवण्याचा किंवा त्यांच्याबरोबर इतर कवींच्या कविता वाचण्याचा योग आला असेल त्यांना बोबड्यांच्या सहृदय रसिकतेची ओळख पटल्यावाचून राहिली नसेल. बोबडे व त्यांच्या पाठोपाठ नुकतेच परलोकवासी झालेले त्यांचे निकटवर्ती स्नेही, विनोदमूर्ती जयकृष्ण केशव उपाध्ये, तसेच आनंदराव टेकाडे, पु. य. देशपांडे, रघुनाथ दत्तात्रय सरंजामे, गुणवंत हनुमंत देशपांडे, इत्यादि आम्हा मित्रमंडळींचा एखादे वेळी बोबड्यांच्या वाड्यांत मेळावा झाला म्हणजे काव्यवाचनांत व काव्यचर्चेत किती तरी तास उलटून जात. त्यावेळी बोबड्यांच्या रसिकतेची आम्हाला चांगलीच जाणीव होत असे. कोणत्याही कवितेतील उत्तमोत्तम ओळी बोबडे तेव्हांच मुखोद्गत करीत असत व त्या समजून घेताना किंवा त्यातील त्यांना पटलेला अर्थ समजावून सांगताना ते आनंदाने तल्लीन होत असत. पुष्कळ वेळा अशा रसिक रसास्वादांतून त्यांना स्वतंत्र काव्यस्फूर्तीही होत असे. सावरकरांच्या 'कमला' काव्याच्या कौतुकाने लिहिलेली 'ज्याचे त्याला निवेदन' ही सुंदर कविता या गोष्टीचे प्रत्यतर आहे.

वऱ्हाड-नागपूरकडील रसिकांना अत्यंत परिचित असे बोबड्यांचे गुणसंपन्न व्यक्तित्व कालांत विराम पावल्यावर त्यांच्या मित्रमंडळींनी आस्थेने संपादन केलेला हा त्यांचा काव्यसंग्रह आज बृहन्महाराष्ट्रांतील वाचकवर्गासमोर ठेविला

जात आहे. या संग्रहाचा आकार फारसा मोठा नाही. जेमतेम १३० पानांत बोबड्यांच्या बहुतेक साऱ्या कविता संग्रहित झाल्या आहेत. त्यांपैकी ६३ स्फुट कविता व १०१ शृंगार संगीताचे श्लोक आहेत. बोबडे आपल्या कविता निरनिराळ्या वह्यांमध्ये सुंदर अक्षरांत स्वतः लिहून ठेवीत असत. पण सर्वच लिखाण एकाच वहीत त्यांनी लिहून ठेवलेले नव्हते. त्यातील कांही वह्या कांही मित्रांनी वाचावयास नेऊन परत केल्या नाहीत, असे बोबडे केव्हां केव्हां म्हणत. तेव्हां त्यांच्या काही कविता या संग्रहांत समाविष्ट व्हायच्या राहूनहि गेल्या असण्याचा संभव आहे. पण त्या सात–आठापेक्षा जास्त नसाव्या, असे मला वाटते. दुसरे असे की, बोबडे आपल्या कवितांना शिरोनामे क्वचितच देत असत. मी त्यांनी लिहिलेल्या पाचसात वह्या पाहिल्या, त्यांत 'स्वतः प्रामाण्य' (पा. ९) कुंकुम (पा. १०) परिचय (पा. २२) अबोला (पा. ३९) याशिवाय इतर कवितांना शिरोनामे दिलेली मला आठवत नाहीत. तसेच चवथ्या पानावरील ज्या कवितेस 'अभिमान निंदा' हे नांव दिलेले दिसते ते बोबडे यांचे नव्हे, असे मला वाटते. १९२२ साली, मनोरंजनात ही कविता 'अहं' या शिरोनामाखाली प्रसिद्ध झालेली मला आठवते. कदाचित् तेहि नांव बोबड्यांनी दिलेले नसेल. स्फुट कवितांची शिरोनामे संग्राहकांनी दिलेली आहेत. तसेच, 'शृंगारसंगीत' एवढे नांव व त्यातील विभागाची थोडीशी नांवे मात्र बोबड्यांची; बाकीच्या विभागांची शिरोनामे संग्राहकांनी दिलेली आहेत. शृंगारसंगीतातील श्लोकांचा क्रम बोबड्यांच्या निरनिराळ्या वह्यांतून निरनिराळा असायचा. आज जुळवलेला क्रम हा संग्राहकांनी जुळवलेला आहे.

संग्रहाच्या बहिरंगाविषयीं येवढा खुलासा केल्यावर दुसरा प्रश्न पुढे उभा राहतो तो हा की बोबडे यांच्या ह्या काव्यसंग्रहाचे लघुत्व त्यांना कवी या दृष्टीने आधुनिक मराठी काव्यात महत्वाचे स्थान मिळण्याच्या आड येऊं शकेल काय ? माझ्या मते मुळीच येऊ नये तसे पाहिले तर केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज इत्यादि ज्या कवींना आधुनिक मराठी काव्यात महत्वाचे स्थान मिळाले आहे त्यांचे संग्रह तरी कोठे मोठे आहेत ? ते आकाराने या संग्रहाएवढेच आहेत. पण आजकाल कांही लोकांची अशी समजूत झालेली दिसते की काव्यग्रंथाची जाडी जेवढी जास्त तितका त्या ग्रंथाचा कर्ता जाडा कवि ! मग त्या लट्ठ ग्रंथातले त्याचे 'कविकर्म' कितीही मठ्ठपणाचे असले तरी हरकत नाही. एक जुनी म्हण आहे की 'उसाची कांडी आणि कडब्याची पेंडी.' पण आजकाल काही टीकाकारांना कडब्याच्या पेंडीचा खुराकच जास्त पसंत पडत आहे असे दिसते. आजकालच्या या धावपळीच्या काळात मनुष्याला जेवढे उत्तम तेवढे थोडक्यांत पाहिजे अशी स्थिती असताना वाङ्मयातच मात्र विपुल निर्मिती असल्यासच स्थान मिळेल असा अट्टहास का ? कलावंतांनी व कवींनी आपल्या निर्मितीचे नियमन करून उत्तमोत्तम तेवढेच जनतेसमोर ठेवले तर तेवढ्यावरच

त्यांना महत्वाचे स्थान मिळावयास पाहिजे. ही वृत्ती अभ्यासकात उत्पन्न झाल्यास त्याच त्या कल्पनांच्या पुनरावृत्तीला आळा बसून वाङ्मयवाटिका सुंदर व मौलिक कृतींनीच फुलून जाईल. **बोबडे हे आपल्या वाङ्मयनिर्मितीचे नियमन करणाऱ्या कवींपैकी एक होते.** कांही ताळतंत्र न ठेवता कविता 'पाडायलाच' ते बसले असते तर त्यांनी आज चार गलेलठ्ठ काव्यग्रंथ गरीब बिचाऱ्या मराठी वाचकांच्या माथी सहज मारले असते, इतके त्यांचे भाषेवर व शब्दकलेवर प्रभुत्व होते. पण मराठी भाषेचा, मराठी काव्याचा व मराठी वाचकांचा असा छळ करण्याइतके बोबडे निर्घृण नव्हते. त्यांना येन केन प्रकारेण पुढे येण्याची नुसती महत्वाकांक्षाही नव्हती. अशा प्रकारची वाङ्मयसेवा कधीही चिरंजीव होणार नाही हेहि ते जाणून होते. उत्तम कलाकृती जगातील कोणत्याही उत्तम कृतीप्रमाणेच संख्येने कमी रहाणार हे उघडच आहे. उत्तम काव्य निर्मितीस उत्तम व्यासंग पाहिजे. उत्तम तेवढेच ठेवायचे व त्यापेक्षा जे रेसभरही कमी, ते जगापुढे आणावयाचे नाही असा निश्चय पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करून बोबडे यांनी आपल्या थोड्याच पण सुंदर कृती रसिकासाठी ठेवून दिल्या याबद्दल रसिक त्यांचे आभारच मानतील व त्या कृतींच्या बळावर त्यांना मिळावयास पाहिजे असलेले महत्वाचे स्थान त्यांना देतील अशी मला फार आशा वाटते.

बोबडे यांची कविता विषयाच्या आणि विवरणाच्या दृष्टीने अगदी स्वतंत्र आहे. पण तिजवर संस्कृत काव्याची, काव्यसंकेतांची आणि मराठी शाहिरी काव्याची छाया पडलेली आहे, हे वरवर पाहणारासही दिसून येईल. पण बोबडे यांचे काव्य हे संस्कृत व शाहिरी वाङ्मयाच्या अभ्यासाचा स्वतंत्र व नवनवोन्मेषशाली परिपाक आहे असेच त्याचे रसग्रहण करतांना दिसून येईल. बोबडे यांच्या काव्याचा साकल्याने विचार केला असताना त्यातील प्रसादाची व प्रसन्नतेची चार दोन कविता वाचताच जाणीव होते. कोणत्याही कवितेत पहिल्या चारदोन ओळींतच प्रसादयुक्त प्रसन्नतेचे काव्यमय वातावरण उत्पन्न होते. या गोष्टीचे प्रत्यंतर सहृदय रसिकास हा काव्यसंग्रह वाचून सहज होण्यासारखे आहे, ही खात्री असल्यामुळे काही कवितांचा निर्देश करण्याचे या लहान प्रस्तावनेत प्रयोजन नाही. प्रसाद व प्रसन्नता हे बोबड्यांच्या काव्याचे ठळक व डोळ्यात चटकन् भरणारे गुणविशेष आहेत. ह्या गुणांत ते गोविंदाग्रज, बालकवी, 'बी', तांबे इत्यादि कवींच्या बरोबरीचे, इतकेच नव्हे तर कांही कवितांत कांकणभर जास्तच आहेत असे दिसून येईल. बोबड्यांची 'प्रभातमंगल' (पान ६९) ही कविता या गोष्टीची साक्ष देईल.

बोबड्याच्या कवितातले हे प्रसादयुक्त प्रसन्नतेचे वातावरण बहुश: त्यांच्या निर्मळ शब्दकलेतून उत्पन्न होते. बोबड्यांची शब्दकला भारदस्त तितकीच मोहक,

ओजस्वी तितकीच नाजूक, अर्थगंभीर तितकीच नादमधुर आहे. त्यांच्या शब्दकलेत इतकी जादू आहे की एकच वेळ त्यांची अर्थपूर्ण ओळ नजरे खालून गेली तरी ती स्मरणांत कायमचे ठाणे देऊन बसते. त्यांच्या

" वृंदावनि तुज भेटल माधव
नीट सरळ जा या वाटेने
दिसतिल तुज हरिचरण उमटले
यमुनेच्या काठाकाठाने "

या कवितेतील (पान २०) एकूण एक ओळी या विधानाची सत्यता पटवितील. योग्य शब्दयोजनेने, अतिशय नाजुक व विवरण करण्यास कठिण अशा कल्पनांचा सुंदर उठाव करण्यात बोबडे हे किती कुशल होते हे उदाहरणें देऊन दाखवायचे म्हटल्यास त्यांचा सर्व काव्यसंग्रहच येथे उद्धृत करावयास पाहिजे. उलट मला कोणाही सहृदय रसिकांस असेच आव्हान द्यावेसे वाटते की बोबडे यांच्या कवितातून अशी एक ओळ तरी काढून द्या की जेथे त्यांची शब्दकला गुणसंपन्न दिसून येत नाही. खऱ्या कलावंताने जिवाभावाने खपून संगमरवरावर सुंदर नक्षी काम उतरवावे तशी बोबडे यांची शब्दकला आहे. काही ठिकाणी तर तिची परमावधीच झाली आहे. उदाहरणार्थ "अबोला" (पान. ३९) ह्या कवितेतील

" हृत्तंत्रीच्या नाजुक तारा
स्वरांत लाऊन गोडी
स्वच्छंदाने हात फिरविता
मनोविनोद होते का "

या ओळी पहा. आणि

" दो नयनांचे मीलन झाले
उसळे विद्युत्प्रवाह हा
उज्वलशा त्या प्रभा प्रकाशी
पाठ प्रीतिचे वाचु गडे" (पान १९)

" आकांक्षेच्या मंडपावरी
चढविलि आशालता । लालिता ।
दंवबिंदूंची माळ गुंफिता
वाटें मज धन्यता" (पान २२)

"नव्हती पडली गाठ रेशमी
नव्हती आलिंगने । कोवळी ।
नव्हते नयनींच्या मोत्यांचे हृदयावर लेणे" (पान २५)

अशा नितांत सुंदर ओळी बोबडयांच्या किती तरी कवितातून काढून दाखविता येतील. राष्ट्रीय कविता घ्या, लावण्या घ्या, विनोदी कविता घ्या, वा निसर्गवर्णनपर कविता घ्या, बोबडे यांचे कलाकुसरी शब्दशिल्प तेथे दिसलेच पाहिजे. भारदस्त, अर्थगंभीर, ओजस्वी, नादमधुर, औचित्यपूर्ण व अत्यंत सुसंस्कृत अशी शब्दकला हा बोबडे यांच्या कवितेचा फारच महत्वाचा गुणविशेष आहे.

बोबडे यांची काव्यरचना विपुल प्रमाणांत झाली नाही याचे कारण त्यांचा उत्तमोत्तम शब्दांविषयीचा आग्रह, हे होय. स्फूर्तीच्या भरात (किंवा, ज्यांच्या लठ्ठ काव्यग्रंथांत स्फूर्तीचा लवलेशहि कोठे दिसत नाही अशा कवी संबंधी बोलावयाचे झाल्यास, इतर कशाच्या भरांत) जे लिहिले ते फत्तरावरची रेघ व त्यांत एका अक्षराचीहि फिरवाफिरव मी करणार नाही असे म्हणणाऱ्या अट्टाहासी कवींपैकी बोबडे नव्हते. आधी लिहितानाच ते आपल्याला काय म्हणावयाचे आहे ते अगदी मोजक्या व योग्य शब्दांत लिहिण्याविषयी दक्षता ठेवीत. इतके करून सुद्धा, कविता त्यांनाच पूर्णपणे पसंत पडून वहीत सुंदर व सुवाच्य अक्षरांत लिहिली जाइपर्यंत कितीकच चांगले फेरबदल करीत. अशा शब्दशिल्पी कवीला भाराभर काव्यनिर्मिती न केल्याबद्दल दोष देणे म्हणजे शहाजहानाला गावोगाव ताजमहाल न उठविण्याबद्दल दोष देण्याइतकेच हास्यास्पद होईल.

निर्मळ शब्दकलेने उत्पन्न झालेल्या बोबडयांच्या काव्यातील प्रसादास, सहज सुंदर, सफाईदार व अर्थबोधास सोप्या अशा काव्यरचनेतील, कोमल व हळुवार कल्पनाविलासामुळे प्रसन्नतेची जोड मिळते. एक दोन ओळीत कल्पनेची खूप उंच भरारी मारून तिसऱ्या ओळीत त्या उंचीवरून एकदम भूमितलावर आदळण्याचा प्रसंग, बोबडे यांच्या कवितात रसिकास कधीच यावयाचा नाही. त्यांची कल्पना एकदम आकाशांत उड्डाण कधीच करीत नाही, तर परिचित घटनांच्या पददलित भूमीपासुन 'फुलाफुलांच्या पायघडयावर भूगगनाचा घेर' दाखविणाऱ्या विशाल चंद्रशालेपर्यंत लहान लहान पायऱ्यांच्या सोईस्कर सोपान मार्गाने हळू हळू चढून जाते. बोबडे यांच्या काव्यांतील कल्पनाविलास भरारीचा नाही, विकासी आहे. या संग्रहातील बऱ्याचशा कविता या विधानाचे सत्यत्व दर्शवतील.

बोबडे यांच्या काव्यांतील भावकलेविषयी विचार करता, त्यांच्या कवितातील भावना, एकाच बाजूस उसळून; उमाळून उफाळताना दिसत नाहीत. त्या

समतोलपणे आंदोलताना दिसतात. हा बोवडे यांचा वैयक्तिक गुणविशेष त्यांच्या काव्यातहि पुरेपुर उतरलेला आहे. रसाच्या दृष्टीने विचार केल्यास भक्ति, शृंगार, करुण, वीर व हास्य या रसांतून बोवडे यांची कविता खेळलेली दिसते. बोवडे यांच्या राष्ट्रीय कविता वीररसपूर्ण आणि जोमदार तितक्याच समतोलहि आहेत हे 'हिंदुस्थाना" (पान ५१) "आमची क्षुधा" (पान ७५) या कविता पाहता दिसून येते. स्थलसंकोचामुळे बोवडे यांच्या निरनिराळ्या रसातील कवितांचा विचार करणे येथे शक्य नसले तरीहि बोवडे यांच्या शृंगाररसांतील कवितांचा विचार करणे जरूर आहे. बोवडयांच्या काव्यांतील शृंगार, इतर कवितात थोडा फार, व शृगार संगीतांत विशेषे करून उत्तान झाला आहे असा आक्षेप बोवडयांच्या शृंगारिक कवितांवर येणे संभवनीय दिसते. संस्कृत शृंगारिक काव्याची व जुन्या मराठी शृगारिक काव्याची परंपरा पाहिल्यास, ती उत्तान शृंगारात मुरलेली होती हे स्पष्ट दिसते बोवडयांचे कविमन त्या शृंगारिक काव्याच्या अभ्यासाने बनलेले व त्या परंपरेवर पोसलेले होते. तेव्हा उत्तानतेकडे कल साहजिकच गेला. संस्कृत मराठी शृंगारिक काव्याचा परिचय असलेल्या वाचकांनी वुजून जावे असे बोवडयांच्या शृंगारिक काव्यात काही नाही असे मला वाटत असले तरी काही नीतिबाज लोकांच्या अश्लीलतेच्या उपदव्यापाची आठवण यावेळी मला येते. बोवडे यांचे शृंगारिक काव्य अगदी उघडपणे, मनमोकळेपणे वैषयिक आहे, वैषयिकतेत रसिकपणे रंगलेले आहे. पण म्हणून ते दोषार्ह नाही. अश्लील हा शब्द तर त्यांस मुळीच लागू पडणार नाही. वैषयिकतेविषयी तीन वृत्ती असू शकतात. नैसर्गिक, विकृत्, व ढोंगी. नैसर्गिक वैषयिकतेचे उदात्तीभवन झाले म्हणजे शुद्ध प्रेमाचे व क्वचित् भक्तिरसाचे काव्य उत्पन्न होते. रंगेल रसग्रहण झाल्यास उत्तान शृंगाराचे काव्य उत्पन्न होते. नैसर्गिक वैषयिकतेमधूनच ह्या दोन्ही प्रकारच्या मूलतः शृंगारिक काव्याचा उगम होतो. कलापूर्ण उत्तान शृंगाराच्या काव्याला अश्लील कधीच म्हणता येणार नाही. विकृत् वृत्तीतून उत्पन्न झालेले जे कलाहीन वैषयिक काव्य त्यासच अश्लील म्हणता येइल. ढोंगीपणांतून उत्तम काव्याचा उगम होणे शक्य नाही. ढोंगी लोक नुसते 'अश्लील, अश्लील' म्हणून ओरड करीत असतात, अशा लोकांनी या संग्रहातून (त्यांच्या खास सोईसाठी वेगळी छापलेली) शृंगार संगीताची पाने फाडून ठेवलेली बरी.

बोवडे यांच्या शृंगार संगीतातील सर्वच श्लोक अत्यंत कलापूर्ण असून कल्पनाविलासाने व शब्दसौंदर्याने नखशिखात नटलेले आहेत. शृंगार संगीतांत बोवडे यांची काव्यकला आपल्या पूर्ण वैभवात दिसून येते. आरंभाचे ऋतुवर्णनच घ्या. हेमंत वर्णनांत "दिगंताची शेते हसवि वर सोने उधळुनी", शिशिर वर्णनांत, "सुखाने हा आनंदित शिशिर झाकूनि नयन। धुके आच्छादूनी दुलईत करी गाढ शयन" ह्या ओळी कोणत्याहि उच्च प्रतीच्या निसर्गपर काव्यांत शोभून

दिसण्याइतक्या सुंदर आहेत. अष्टनायिका वर्णनांत "हा आणील वसंत काय सखये माझा मला कोकिल"; "माझा राम रमापती नवनवे माझे करी कौतुक" ह्या ओळी शृंगारात सोज्वळपणे चमकतात. प्रभातकाळ वर्णनांत

"डोळे लावुनि दूर दूर निजलों, हा चंद्र ते चांदणे"

ह्या कल्पनेचे सौंदर्य मनास भारून टाकते. थोडक्यात म्हणायचे झाल्यास बोबडे यांचे शृंगारसंगीत त्यांनी वर्णिलेल्या प्रमदेप्रमाणे

"दृश्य–श्राव्य श्रवणनयनानंद काव्यप्रमोद"

आहे.

ह्या लहानशा प्रस्तावनेत बोबडे यांच्या काव्याचा सर्व बाजूंनी व पुरेपुर विचार करणे अशक्यच होते. माझ्यापेक्षा अधिक योग्यतेचे रसिक अभ्यासक ते कार्य करतीलच. या ठिकाणी बोबडे यांच्या अगदी शेवटच्या कवितेतील

"होता कुणी जगांत
नाही ठिकाण ठाव
नाहीच नांव गांव
येथे वसोनि गेला"

ह्या ओळी आठवतात. बोबडे यांची स्वत:विषयी अशी वृत्ती होती; पण त्यांचे काव्य आपल्या बहुविध गुणामुळे मराठी काव्यजगात ठिकाणठाव व कायमचे नांव गांव ठेवून जाणार आहे.

आत्माराम रावजी देशपांडे

नागपुर २५–९–३७.

# १. मृत्युलेख

होता कुणी जगात ।।धृ०।।

नाही ठिकाणठाव
नाहीच नांवगांव
येथे वसोनि गेला
कुणि एकटा अनाथ   १

येथें जलप्रवाही
आला वहात आला
वाऱ्यावरी इथोनी
गेला वरी नभांत   २

हंसला कळ्याफुलांत
वसला विहंगमांत
शीतोष्ण तरुतळीचे
जिव गुंतला वनांत   ३

प्रभुगीत आळवीत
ओठांतलें मनांत
स्वानंद लीन झाला
एकांत निर्जनांत   ४

मउ मोकळ्या धरेला
पानांत झांकलेला
डोळे मिटोनि येथे
विरला चिरंतनांत   ५

◆ ◆ ◆

वागीश्वरी व ४ वि. २ आणि व ५ वि. ७
बोबडे विशेषांक ' समाधीवर फुलें '

# २. प्रसाद

प्रसाद नाहीं सरस्वतीचा माझें मी जाणें
फुटक्या वीणेवरचें बेसुर भेसुर हें गाणें

येथें केलें नसे देविनें रससिंचन मधुर
नाहीं धाडुनि दिले वरुनिया तिनें **अलंकार**

कवित्व नसता गुंफित बसलों शब्दांचें जाळें
**गणमात्रांचें** गणित मांडलें कोऱ्यावर काळें

सरस मधुर जर हृदयच नाहीं कोठुनि मग गाणें
मोत्यांच्या शिंपल्यांत होती मोत्यांचे दाणे

निरभिमान निर्मल हृदयानें माझें मी जाणें
**प्रसाद** मज या जन्मी नाहीं दिला शारदेनें

या जन्मींचा निकाल झाला माझें मी जाणें
पुढच्या जन्मी प्रसाद व्हावा म्हणुनी हें गाणें

जन्मोजन्मीं प्रसन्न व्हावी मज देवी वाणी
करितो आराधना म्हणुनि मी गाउनि ही गाणीं

हृदयाच्या गीतावर झुलतो स्फूर्तीचा पाळणा,
—रिकामा स्फूर्तीचा पाळणा
प्रसाद घेउनि ये ये देवी ! माझ्या संकीर्तना

◆◆◆

'साधना' महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळ,
हिस्लॉप कॉलेज, नागपूर
द्वादशवार्षिक प्रकाशन पृ. ४३, डिसेंबर १९३६.

# ३. मंगलमय सुखकंद

मंगलमय सुखकंद । जयजय ।। ध्रु० ।।

हिरेजडित शिरि किरिट विराजे
तिलक केशरी गंध । जय०

विलसे नयनीं सरोजशोभा
स्मितयुत नित मुखचंद । जय०

वक्षस्थळिं मोत्यांची कंठी
पदक रुळे स्वच्छंद । जय०

सिंहासनस्थित हातीं शोभे
फरशांकुश अरविंद । जय०

झळझळ झळझळ पीतांबर पट
चरणीं शरण भुजंग । जय०

हे मनमोहन ! तव पदसेवन
हा अमुचा आनंद । जय०

◆ ◆ ◆

# ४. नमस्कृति

(वृत्त–पृथ्वी)

तुझें चरित माधवा ! जड जनांस कैसें कळे
अगम्य महिमा तुझा मम मनास का आकळे ?
तुझा न निगमागमा कधिहि पार तो लागला
तरीहि तव सद्यश: स्तवनकामना ही मला

तुझीच सदया ! दया, मजसि इंद्रियें लाभलीं
तुवां प्रभुवरा ! मला तनु सुरेखशी दीधली
समस्त परिवार हा प्रभु ! तुझ्या कृपेचें फळ
सदैव करि रक्षणा तव सुदृष्टि ती प्रेमळ

पुराणपुरुषा ! तुवां विविध विश्व संपादिलें
अनंत नभमंडळासहि तुवांच विस्तारिलें
असंख्य ग्रहतारका, रविशशी कृती ही तव
असा कितिक पामरें वद तुझा करावा स्तव ?

जगत्पट चमत्कृतिप्रद तुझींच दे साक्ष हा
कुठेंहि तरि भासते मज तुझीच सत्ता पहा
तुझ्याविण कुणा असे जगविधानचातुर्य तें
नमस्कृति असो तुझ्या चरणसारसीं श्रीपते !

◆ ◆ ◆

## ५. अहं

(वृत्त–मंदारमाला)

'मी श्रेष्ठ, मी सुज्ञ, मी ज्ञानसंपन्न, मी भाग्यवान्, मीच लक्ष्मीपती,
मी धन्य, मी मान्य, मी शक्तिसंपन्न, मी साजिरा–गोजिराही अती,'

विश्वामधें शोध पाहा करोनी न येईल माझी कुणाला तुला,
झाला नसे, आज नाहीं, न होणार कोणी प्रतिस्पर्धि केव्हा मला

हे चंद्रसूर्यादि, हे तारकासंघ निस्तेज माझ्या प्रभावापुढें
काळासही धाक माझ्या महत्वापुढें, मेरुमांदार फिक्का पडे

मी शूर, मी वीर, मी धीर, माझाच गाजे दिगंती यशोदुंदभी,
माझ्यापुढे विश्व हें तुच्छ सारें, न वाऱ्यास भीतिहि राहे उभी

"धिक् मानवा ! व्यर्थ ताठा तुझा हा तुझी व्यर्थ ही सर्व वाचालता
नीच स्थिती सर्व विश्वामधें रे ! तुला क्षुद्र कीटाहुनी सर्वथा

'मी मी' तरीही तुझें नित्य चालेल कां अंध होतोस जाणूनिया
कां सर्वही ज्ञान, कां सर्वही बुद्धि, वाया करीसी त्यजूनी नया"

◆ ◆ ◆

मासिक मनोहर १९२२;
काव्यकौमुदी, ६–२३५ नोव्हेंबर १९२४

## ६. सारा वृथा वृथा अभिमान

चाल–(सबसे रामभजन)

सारा वृथा वृथा अभिमान ।। धृ० ।।

सदा न अंबरशिखरी भानू सदा न हिरवेंगार
मधेच चपला चमकुनि पडला भीषण घन अंधार

सदा न वीणानाद श्रवणीं सदा न ही बरसात
क्षणभर झालें वसंतवैभव केला दैवें घात

सदा न जलनिधिचलास भरती सदा न पूर्ण शशी
गंजीफाचे बुरुज बांधिले क्षणभर आकाशीं

सदा न नौबद निशाण भेरी सदा न जरीपटका
सोन्याचा गोवर्धन उडला उरला मणि फुटका

चढण चढूनी जातां पुढती उतरावें लागे
कडचावरुनि, सांभाळ लागला काळ तुझ्या मागें

गेला हा क्षण तूझा आतां काळाचा पुढतीं
तुझ्या हातचें शस्त्र उलटलें तुझ्या शिरावरतीं

क्षणभरचें साम्राज्य संपलें झुकली अंबारी
उलटा फिरला काळ, गळ्याशीं चढली चौपदरी

स्नेह संपलें वात वाळली विझूनि गेली ज्योत
शशिकांतीला लांछन आलें नाचतात खद्योत

सुवर्णाक्षरे लिहितां लिहितां सरूनी गेला वेळ
पुढचा कोरा कागद घेउनि वाच विधीचे खेळ

मावळला रवि वठली हिरवळ ओसरली बरसात
फुटली वीणा तुटल्या तारा सुकले सागर सात

क्षणांत ईश्वर, क्षणीं दिगंबर, फिरतें भवचक्र
सदा न बारावरती कांटा कालगती वक्र

या जगताचा सूत्रधार तो वैकुंठीचा राणा
व्यर्थ व्यर्थ ईशेच्छेविण हा कर्तृत्वाचा वाणा

◆ ◆ ◆

विदर्भवीणा प्रकाशन १९३०
६–१५ व १६

## ७. आत्मनिवेदन

चाल--(आनंदी आनंद)

कशास 'कवि' हें अभिधान
कशास 'कवि' चा सन्मान
नलिनीवनिचा मी भृंग
स्वतःच गाउनिया दंग

स्वानंदानें
गावें गाणें

कशास निंदास्तुति चिंता ?
माझें गाणें मजकरितां

सुगंध अथवा दुर्गंध
फुलास फुलण्याचा छंद
काय तयाला जगताचें ?
हसण्याचें वा रुसण्याचें ?

स्वानंदाने
फुलुनी डुलणें

जनांत अथवा विजनांत
सखा एक तो भगवंत

◆◆◆

विविध ज्ञान विस्तार
(केवळ पहिल्या आठ ओळी)

## ८. रसिकांस

(अंजनी गीत)

कुणास ठाऊक काय लिहीलें
सरस निरस वा कैसें झालें
जें आलें ते लिहुन ठेवलें
रसिक जनासाठीं ।

शब्दसृष्टिचा अनंत ठाव
इतुकी नाहीं माझी धाव
कशी धरावी मोठी हाव
दुबळ्या जीवानें ?

रुचेल तें घे रसिका ! निवडुन
जें न रुचें तें राहो पडुन
केवळ माझें मनोविनोदन
पहा सदयदृष्टि

◆◆◆

## ९. स्वतः प्रामाण्य

सागर पोहत बाहुबळानें
नाव तयास मिळो न मिळो रे

स्वयेंच तेजोनिधि जो तरणी
तद्‌गृहिं दीप जळो न जळो रे

जो करि कर्म अहेतु निरंतर
देव तयास वळो न वळो रे

ओळख झाली ज्यास स्वताची
वेद तयास कळो न कळो रे

◆ ◆ ◆

काव्यकौमुदी द. २३७ नोव्हे. १९२४

## १०. कुंकुम

(वृत्त–अनुष्टुप)

उगवे रवि भाग्याचा बाळे ! तव मनोरम
प्रभा अरुण ही शोभे शुभसूचक कुंकुम

नयनानयनांचीं वा मीलनें हृदयंगम
प्रीति ही उसळे भाळीं शुभमंगल कुंकुम

दैवी संपत्तिची ज्योत, पूर्वपुण्य परंपरा
मांगल्य–लक्ष्मी प्रत्यक्ष कुंकुमाकृति सुंदरा

आर्यसंस्कृति आर्यांची श्रुतिस्मृतिरहस्य तें
ललाटीं गृहलक्ष्मीच्या शुभकंकुम शोभते

एकपत्नीत्व रामाचे सीतेचें शीलगौरव
ललाटीं गृहलक्ष्मीच्या शुभ कुंकुमवैभव

व्रतसंरक्षणासाठीं विधीचे कमलासन
ललाटीं गृहलक्ष्मीच्या शुभ कुंकुम पावन

व्रतसंरक्षणासाठीं श्रीविष्णूचें सुदर्शन
ललाटीं गृहलक्ष्मीच्या शुभ कुंकुम पावन

व्रतसंरक्षणासाठीं तृतीय शिवलोचन
ललाटीं गृहलक्ष्मीच्या शुभ कुंकुम पावन

व्रतसंरक्षणासाठीं ब्रह्मा–विष्णु–महेश्वर
अर्पिती गृहलक्ष्मीला शुभ कुंकुम सुंदर

भाळीं सुभग हा शोभो शुभांचा शुभसंगम
शुभाकृति शुभादर्श शुभस्वस्तिक कुंकुम

◆ ◆ ◆

वागीश्वरी, वर्ष १ वि. १

## ११. शुभमंगल सावधान

(जाति–चंद्रकांत)

सावधान ! शुभमंगल ! तुजला प्रेमी हृदयाचें
मंगल तूझ्यासह श्रीधरा ! तुझ्या रुक्मिणीचे

मांगल्याचें पवित्रतेचें मंगल प्रेमाचें
मंगल नवपरिणीत प्रीतसंबद्ध वधुवरांचें

मांगल्याची मूर्तिमति श्री मंगलगुणराशी
धरुनी हातीं सखया श्रीधरा ! आज सार्थ होसी

दो नयनांचें दोन मनांचे हें एकीकरण
तुला सुखाचें होवो सखया ! घे आशीर्वचन

विवाहमंगल शिरीं अक्षताभार न उधळीला
म्हणून गुंफुनि अर्पित कविता–सुमनांचा झेला

◆◆◆

# १२. आनंदी आनंद

आनंदी आनंद साजणी ! आनंदी आनंद
दिशादिशांतुनि शतधारांनी सांद्र गळत मकरंद

नंदनवन चौफेर साजणी ! नंदनवन चौफेर
फुलाफुलांच्या पायघड्यांवर भूगगनांचा घेर

तेजोमय आकाश साजणी ! तेजोमय आकाश
ग्रहमालेवर मंडळ धरुनी हासत खेळूं रास

भरलें हें भांडार साजणी ! भरलें हें भांडार
तोरण तारांगणांत गुंफू नवरत्नांचे हार

गाऊं या स्वच्छंद साजणी ! गाऊं या स्वच्छंद
सरस्वतीच्या वीणेवरती स्निग्ध हृदयिचे छंद

◆◆◆

विविध ज्ञान विस्तार, सप्टेंबर १९२२
आणि
विदर्भ वीणा, पृ. ६४

## १३. महाकवी बेबंद

आनंदी आनंद । साजणी
आनंदी आनंद
दिशांदिशांतुनि तुटुनि विखुरले महाकवी बेबंद

नंदनवन चौफेर साजणी ! नंदनवन चौफेर
भाराभर फाटकीं चिठोरी भाराभर वर केर

तेजोमय आकाश साजणी ! तेजोमय आकाश
चक्रवाढ व्याजानें वाढें नवकवनांची रास

भरलें हें भांडार साजणी ! भरलें हें भांडार
दिसेल त्याच्या माथीं मारूं कवितांचा संभार

गाऊं या स्वच्छंद साजणी ! गाऊं या स्वच्छंद
इकडुनि तिकडे मसिकांकडे पाठवुं अपुले छंद

◆◆◆

विदर्भ वीणा, पृष्ठ ६५

# १४. भारतवर्षगुणगान

भारतवर्ष सुयशगुणगानी सार्थक वाणीचें
गानीं सार्थक वाणीचे ।। धृ० ।।

मधुर मनोहर मंजुळ गानीं आळवुं भारतमाता
पवित्रतम यशगायन गाउनि जागवुं हिंदी जनता

वीररसाची सुंदर मूर्तिच ही भारतदेवी
या देवीच्या यशोगायनी वाणी धन्य करावी

एक काळ तो झाला जेव्हां वैभवगिरिशिखरावरती
निजतेजानें विश्व समस्तहि हिंद प्रकाशित होती

त्या काळाचें गाऊं गायन एकरवानें सर्वजण
गंभीर ध्वनिनें त्या टाकूं या नभ दुमदुमवून

दिगंति ज्यांच्या वीरकृतींचे फडफडती झेंडे
त्या वीरांची माता भारत गाऊं तिचे पोवाडे

दिव्यवृत्ति ज्या गानें स्फुरती तें गायन गाऊं
तेंच गान शुभ हिंदजनांना गायाला लावूं

गानी सार्थक वाणीचें

◆◆◆

# १५. जय जय भारतवर्ष

(वृत्त–दोहा)

जय जय भारतवर्ष जय जय महाराष्ट्र देश
धन्य पुण्यभू नांदला जेथें शिवजि नरेश

धन्य शहाजी भोसला धन्य जिजाई माय
ज्यांचे पोटीं जन्मला छत्रपती शिवराय

धन्य धन्य शिवनेरीगड धन्य मावळे वीर
जेथें बालक खेळला शिवराजा गुणधीर

धन्य महात्मा दादोजी देशभक्त गुरुराज
शिष्य जयाचा जाहला राजराज शिवराज

ते नेताजी तानाजी धन्य धन्य नरवीर
नायक ज्यांचा वीरमणी शिव संगरगंभीर

धन्य सिंहगड रायगड प्रतापगडही धन्य
शिवपद माथां धरण्याचें अगाध ज्यांचे पुण्य

धन्य तारका धन्य नभ धन्य धन्य शशिसूर्य
नेत्रांना ज्यांच्या दिसलें शिवभूपांचे शौर्य

गंगायमुना जलनिधि धन्य गिरी हिमवान
ज्यांचे शिवकीर्तिश्रवणें पवित्र झाले कान

धन्य दऱ्या खोरे वन धन्य नद्या नाले
शिव वीराच्या सहवासें पवित्र जे झाले

धन्य मराठे लोक हे धन्य मराठा देश
ज्यांच्यासाठीं धावुनि, घे अवतार महेश

◆ ◆ ◆

# १६. पंढरी

(चाल–चंद्रकांत)

सगुण ब्रम्ह सावळें विटेवरी उभा पांडुरंग
भोळा भाविक भक्त तुकोबा गातो अभंग

पवित्र सलिला गंगा वाहे विमल चंद्रभागा
पदोपदीं हरिनाम गर्जते पंढरिची जागा

पुण्यात्म्यांच्या पुण्याईनें स्थळ तें पुण्यमय
उभा विटेवरि वैकुंठींचा भक्तसखा सदय

हरिनामाचे घोष चालले गजर नभीं भरला
फुलले साधुजनांचे मेळे नाद एक उठला

ज्ञानोबा पालखींत बसुनी येती मिरवीत
भावार्थाची उच्च दीपिका सतेज पाजळित

भागवताचा पाया रचुनी धन्य धन्य झाला
नामा भगवद्भक्त कुटुंबासह तेथें आला

भगवंताचा केवळ ताईत धन्य पुंडरीक
प्रभु–हृत्कमळीं बैसुनि घेई प्रभुपाशीं भाक

राजयोगि एकनाथ आले हत्तीवर स्वारी
भागवताचें पुराण सांगति डोलति नरनारी

भक्तिमार्ग कळसास पोचवुनि मंदिर पूर्ण करी
महाराष्ट्राचा वेद गात ये तुकयाची स्वारी

एकतारिवर सूर लावुनी येत मिराबाई
प्रेमानें जी पंढरपुरचा नाथ विकत घेई

या दु:खावेगळें एकदां करि पंढरिराया
गाऱ्हाणें सांगण्यास आली सखू हरीपाया

अंतर्बाह्य ध्यान लागलें पंढरिरायाचें
घोष विठोबा रुक्माईच्या नामाचा वाचे

एकादशिची पुण्यपर्वणी महाराष्ट्र लोटे
वैकुंठीचे ब्रह्म सावळें पंढरीस भेटे

धन्य देश महाराष्ट्र मराठे लोक धन्य धन्य
पन्नगशायी उभा विटेवरि हें ज्यांचे पुण्य

साधा भोळा मराठमोळा हरि भजनीं लीन
आला पंढरपुरास भक्ती नदींत वाहून

प्रसाद हरिचा गळयांत साध्या तुळशीच्या माळा
अखंड 'हरि हरि' घोष मुखानें हातीं करताळा

'अनंत गुणमय अनंत रसमय' नाम अनंताचें
अखंड 'हरिहरि' घोष मुखानें शब्द जिव्हाळयांचे

भक्तिस्तव या क्षीरसागरा सोडुनि हरि आले
सोडुनि पन्नगशयन विटेवरि सदा उभे झाले

महाराष्ट्राच्या धर्मग्लानिनें हरि कळवळुनि
पुंडरिकाचें निमित्त करुनी आले धावूनी

पंढरपुरचा अगाध महिमा सर्व एक झाले
विसरुनि भेदाभेद सकलही हरिनामीं रतलें

पंढरिनाथापाशीं नाहीं नरनारीभेद
ऐके विठ्ठल केवळ एकच भक्तीची साद

पृथ्वीचें वैकुंठ पंढरी नगर आटपाट
प्रेमाचा दरबार प्रेमळ भक्तीची पेठ

विसरुनि मीपण ब्रम्हपदावरि व्हावें तल्लीन
जावें पंढरपुरास नंतर हरिचरणीं शरण

'वृत्तीची विषमता लोपली द्वैतभाव हरला'
महाराष्ट्राचा सर्व मराठा त्यांत एक झाला

पंढरपुरच्या राउळामधें ऐक्यध्वज उभवे
त्या ऐक्यानें देश एकदा नवजीवन पावे

महाराष्ट्राचें स्वराज्य झालें स्थापन रायगडीं
परी तयाचें बीज रोविलें भिवरेच्याच थडीं

महाराष्ट्राची कीर्ती केली मावळवीरांनी
परी तयांना समर्थ केलें भक्तिसमर्थांनी

पंढरपुरची रुक्माबाई तुळजापुरि गेली
जगदंबारूपानें शिवकरिं भवानि अर्पियली

गर्जे पंढरपूर 'ग्यानबा तुकाराम' नादें
'श्रीहरहर महादेव' शब्द तो रायगडीं कोंदे

भगवंतानें महाराष्ट्र हें धन्य धन्य केलें
वैकुंठीचें नगर उचलुनी येथें वसवीलें

खरा मराठा पंढरपुरची प्रौढी मिरवील
महाराष्ट्र–भांडार–पंढरी यशगुण गाईल

महाराष्ट्राचें मंगल खेळे खेळ वाळवंटी
महाराष्ट्राचा नाथ जागतो भीमेच्या काठीं

पुंडरीक वरदे हरि विठ्ठल

◆ ◆ ◆

विविध–काव्य–माला, वि. सा. वि. च्या ज्युबिलीचा
स्मारक ग्रंथ, ३–६–४० जुलै १९२१

# १७. मीलन

भेटवुनि हृदयासि हृदय, हृदयांची सांगड बांधुं गडे !
दो प्रेमांचे प्रवाह वळवुनि प्रेम संगमीं पोहूं गडे !

आयुष्याचा वसंत सुंदर बहर शोभला नवा नवा
तनुलतिकांना फुलें सुगंधी, सुगंध त्यांचा लुटूं गडे !

सकल कलांचा शशि प्रेमाचा उदय पावला मनोनभीं
दिव्य सुधेच्या ह्या कुंभांतुनि करूं सुधारस पान गडे !

दो नयनांचे मीलन झालें नवतेजाची वीज उसळली
प्रसन्न निर्मळ प्रभाप्रकाशीं पाठ प्रीतिचे वाचुं गडे !

आनंदाचा अथांग सागर भरला काठोकाठ सख्या !
परोपरीचे विहार करुनी तरंग झोकूं नभीं गडे !

कुंजविहारी तूं गिरिधारी तुझ्या प्रीतिची मी राधा
प्रेमाच्या वृंदावनिं आतां रास रचूनी नाचुं गडे !

मदनासम तव सुंदर काया या चरणांची मी दासी
स्पर्शमणिवर लोह घासुनि यथेच्छ सोनें लुटूं गडे !

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ४, विलास ७

## १८. राधा–माधव

(चाल–इस तनधनकी)

"वृंदावनिं तुज भेटल माधव नीट सरळ जा ह्या वाटेनें
दिसतील तुज हरिचरण उमटले यमुनेच्या काठाकाठानें

हारांचे सर श्रीहरिच्या हे तुटुनि विखुरले वाळूवरती
जिकडे गेला माधव तिकडे वनमालेचीं सुमनें दिसती

ध्वजवजांकित पदचिन्हें हीं नंदनवनिचीं हीं वनसुमनें
तुजसाठी ह्या खुणा ठेविल्या तुझ्या प्रीतिच्या श्रीकृष्णानें

हंसवित डुलवित लतालतांना माधव गेला ह्या वाटेनें
फुलाफुलांची ओंजळ भरुनी हरिसा पूजिलें वनदेवीनें

उधळित कुसुमें वृंदादेवी अजुनि हरीच्या मार्गावरती
तरुपर्णांतुनि अजुनि हरीचें शुक पिक मिळुनी गायन गाती

पादस्पर्शें कालिंदीला पावन करुनी माधव गेला
दिशादिशांतुनि त्या हर्षाच्या उसळति मंगल तरंगमाला

बिंदूबिंदूमधुनी राधे ! साठविला हरि कालिंदीनें
श्यामलसलिलीं नयनमनोहर ठसे उमटले ह्या वाटेनें

काळ्या डोहाजवळीं हरिचा कदंबतरु तो फुलुनी डोले
जेथें कितिदां तुझ्या प्रीतिचें हरिनें कोमल कौतुक केलें

शिलातलावार बसुनी तेथें वाट बघुनि तव माधव गेला
मागें वळुनी पाहत भिरभिर लालसनयनीं राधाबाला

आळवीत हरि 'राधा राधा !' स्निग्धहृदयिचें राधागीत
इकडुनि गेला माधव, राधे ! स्वर भरुनी ते फुलाफुलांत

उधळित सरिवर सरी फुलांच्या फुलला जाईचा तो कुंज
वृंदावनिं तुज भेटल तेथें 'श्याम' मनोहर तेज:पुंज

ऐक ऐक राधिके ! ऐक ही, मधुर मुरलिची मृदु रसवंती
तरल विरल ह्या गानलकेरी छेडित हरि हा मुरलीवरती

परिचित असतिल तुजला स्वर हे, ऐक पुन: ते नीट उमटले
अंकी बसवुनि हरिनें तुजला याच गायनीं मोहित केलें

झुलति मुरलिच्या गायनलहरी वायूच्या ह्या दोल्यावरती
न्याया तुज ये पंख उभारुनि वाटे हरिची राधा–प्रीती

–पण कां गे ! शुक उडुनी गेला तोडुनि आलिंगन मैनेचें ?
असें कसें क्षणभंगुर बाई ! प्रेम हरीचें राधेवरचें ?

कपटचतुर तो नटवर गेला फसवुनि तुजला लटक्या वचनीं
तुझ्या प्रीतिचा माधव राधे ! जाउनि बसला वृंदाविपिनीं"

राधेचा जो माधव होता,––
––'तो माधव अजुनि राधेचा
नीट निरखुनी बघ या हृदयीं"––

## पृथ्वी

तिथें दिसति दृष्टिला सकल गोकुळींचे जन
सुपुष्पित दिसे तिथें परमपुण्य वृंदावन
प्रसन्न यमुना दिसे तरु कदंब तोही दिसे
दिसे विमल राधिकाहृदयिं कुंज तो ही वसे

परस्पर गळ्यांमधें मृदुल ते करांचे सर
परस्पर मुखांवरी सरस चुंबने निर्भर
तरंगत विलोचनीं प्रणयहास्य लास्योत्सव
असे हृदयिं शोभले प्रकट राधिका–माधव

◆◆◆

विदर्भवीणा १९३० व वागीश्वरी वर्ष १ विलास ४

## १९. प्रेमाचा परिचय

(चाल–भूपाळी)

परिचय झाला नव्हता तेव्हां नव्हती हो जाचणी जिवाला
मी नव्हतों तुज सजन सखे ! तू नव्हतिस मज साजणी

नव्हती गुंतागुंत मनांची नव्हता हा आठव परस्पर
नव्हते नयनी पाणी नव्हता हृदयावर घाव

नव्हता घडला पिंजरा तेव्हां नव्हत्या पडल्या भिड्या एकदां
स्वच्छंदानें घेत पांखरूं वाऱ्यावरती उड्या

भरांत होत्या नव्या उमेदी नवें नवें मृगजळ सोज्वळ
हिरवी हिरवळ दिसतां सुटलों करीत धावपळ

आकांक्षेच्या मंडपावरी चढविली आशालता ललिता
दंवबिंदूंची माळ गुंफितां वाटे मज धन्यता

फुटला तो आरसा, भंगलें प्रतिबिंबित उपवन मनोहर
क्षितिजावरि पसरलें वाळुचें दिसे उभें रान

लपल्या प्रभाततारा, तळपे चंडकिरण दारुण भयाचा
झंझावातें झोत वाळुचे भेदित भूगगन

उपवन सुकलें वेल वाळली पाझरती लोचन अश्रुनें
चहूंकडे पसरली निराशा फुटतां तो दर्पण

ज्या आशातंतूंचे स्वकरीं गोड गोफ गुंफिले सुखाचे
गांठी वळुनी त्या फासांतच अडकविले हे गळे

सोन्याच्या लंकेस निघालों उडि घेउनि सागरीं मनाची
कुठली लंका भ्रमत राहिलों भोंवऱ्यांत वरिवरि

गेलें वैभव सरली आशा, दुभंगलें हृदय हें कोवळें
जपमाळेचे मणी ओढणें हेंच कार्य राहे

अनंत या पिंडब्रह्मांडी मी तुजसी तूं मला सर्वथा
तूंहि मानिलें सजन सखे ! मज, मीहि साजणी तुला

झालें गेलें काय तयाचें आज हीच जाचणी जिवाला
दुबळा मी तव सजन, देवता माझी तूं साजणी

मूर्तिमती तूं लक्ष्मी माझी ठसलिस माझ्या मनीं साजणी !
परी खुळयाच्या प्रेमासाठीं फसलिस तूं वचनीं

तव सहवासीं पवित्र झालों गेलों उद्धारूनी तुझ्यानें
परि मी तुज दारिद्र्य दाविलें भरीस घालूनी

रूपवती गुणवती नभींची शुक्राची चांदणी सखे ! तूं
या पाप्याच्या बाहूपाशीं पडलिस गुंतोनी

राजाची शोभशील राणी तूं ती सौदामिनी भामिनी
या रंकाच्या झोपडिमाजीं पडलिस येऊनी

वाटे पूजा तुझी करावी मांडुनि सिंहासन हिऱ्यांचे
परि हृदयाच्या तृणासनावर घे गौरव मानुन

तुझ्यावरी अभिषेक करावा सुवर्ण पात्रांतुनी साजिऱ्या
परि मम नयनीं गंगायमुना भरल्या खळखळुनी

पांचा पक्वान्नांचें तुजला घालावें भोजन वाटते
परि केवळ मजजवळ द्यावया तुज पंचप्राण

भावभक्तिच्या ज्योतीनी तुज करितों पंचारती साजणी
गोड करुनी घे प्रेमें मानुनि ही चंद्रज्योती

तुजसाठीं मी लावुनि घेइन जन्मवरी जाचणी जिवाला
यातायाती करुनि सर्वदा करीत संपादणी

चौपट चौदा वरुषें करुनी उपवासाचें व्रत सदोदित
सर्वस्वाला देउनि ठेविन तुज संतोषांत

अनंत सौख्याचा हा ठेवा झालों याचा धनी सुदैवें
तळहातीं झेलण्यास सोशिन जन्मवरी जाचणी

हृदयाच्या पालखींत वसविन हृदयाची शारदा लाडकी
हृत्तंत्रीवर गाइन गायन हृदयाचें सर्वदा

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ५ विलास ९
आणि
प्रतिभा १७ मे १९३५

(स्थळ प्रत)

## २०. परिचयाचे प्रेम

परिचय नव्हता झाला तेव्हां नव्हती ही पर्वणी सुखाची
तूं नव्हता मज सजन सख्या ! मी नव्हती तुज साजणी

नव्हती पडली गांठ रेशमी, नव्हती आलिंगनें कोवळीं
नव्हतें नयनींच्या मोत्याचें हृदयावर लेणें

नव्हती सजली शेज फुलांची, नव्हता दीपोत्सव अभिनव
नव्हती गालीं लाली, नव्हतें हें लीलावैभव

नव्हता भरला रस कुसुमांतुनि नव्हतीं खगगायनें मनोहर
नव्हत्या सागरलहरी, नव्हतें चंद्राला चांदणे

त्या दृष्टीची जादू करुनी या दृष्टिस गोविलें राजसा !
ठावुक नव्हतें तें सृष्टीचें अंतरंग दाविलें

अजाणतेची दृष्टी वरवर फिरते वाऱ्यावर चहुकडे
बाळपणीं लटकेंच रंगवी 'मृगजळ' चौफेर

परिचय होतां रहस्य कळलें हृदयाला हृदयिचें आंतलें
दृष्टींपुढचें चित्र उडाले खोटचा रंगाचें

परिचय होतां स्वप्नांमधुनी केलें मज जागृत सुखप्रद
या देहाचें सोनें झालें तव सहवासांत

हाती धरुनी चालविलें मज प्रेम तुवां दाविलें नवनवें
मला 'आपुली' म्हणवुनि जीवित धन्य धन्य केलें

या 'लक्ष्मी'चा तूं नारायण तुझीच शोभा मला ईश्वरा !
तुझ्यासवें पद वैकुंठीचें दिसलें या दृष्टिला

गोड मानिलें गुणरूपाला हेंच खरें सार्थक जिवाचें
तुझेंच देवा ! तव सेवेला अर्पण गंगोदक

गौरविल्यानें वामांकीं मज राणीं मी शोभली तुझी रे !
सुखासुखीं या तुझ्या साजणिस पदवी ही लाभली

हृदय साक्ष हृदयाला आतां मी तुजसी तूं मला जाहलो
मीच मानिलें सजन सख्या ! तुज तूंहि साजणी मला

परस्परांच्या सुखदु:खांचें झालों वाटेकरी जगांतरिं
यांतच गौरव यांतच वैभव मजला सर्वपरी

गळयांत घालुनि गळे जाहलों गळ्यातले ताइत प्रीतिचें
भूषण झालों परस्परांना हृदयाहृदयांत

या हृदयास्तव त्या हृदयाला पीळ पडे क्षणभरी जरि तरि
रत्नखचित सिंहासन त्याची कुठून पावे सरी

नयनाच्या एका थेंबानें स्नान मला पावलें मंगल
चतु:सिंधुचें नको नको जल सुवर्णपात्रांतलें

नाथानें मज करें भरविला घास तेंच भोजन खरोखर
तीच आरती नाथाच्या मी भरलें नयनांतुन

तुझ्यासवें मी घोरवनांतहि थाटिन नंदनवन साजणा !
तव सहवासीं झोपडींतही मांडिन इंद्रासन

बाहूंपाशीं परस्परांच्या 'लक्ष्मी नारायण' आपण
परस्परांच्या नयनीं वेचूं रत्नांची खाण

तुझ्यासवें मज शृंगाराला पुरेल फुटका मणी कसाही
तव सहवासीं मज मिष्टान्नें होतिल कोंडाकणी

कशास 'यातायाती' अथवा 'जीवाला जाचणी' लाडक्या !
उच्छिष्टावर या दासीची होइल संपादणी

पतिमूर्तीनें तळहातावर या दासिस झेलिलें प्रीतीने
यांतच साऱ्या 'सर्वस्वांचें सार मला पावलें

गळयांत घालुनि गळें गायिले भूपाळीचे स्वर परस्पर
एकतानता झाली, आलीं स्वर्गसुखें भूवर

◆ ◆ ◆

प्रतिभा १७ मे १९३५

## २१. नारी तरुणाची संपदा

(चाल–लावणी)

कोमलबाला मन्मथपुतळी जवळ असावी सदा
नारी तरुणाची संपदा
मनमोहिनिचें रूप मनोहर नित्य असो वीक्षणीं
सार्थक तरुणीच्या दर्शनीं
श्रवणीं यावें प्रेममयींचें प्रेमळ संभाषण
हेंच की स्वर्गाचें साधन

शयनमंदिरीं प्रेमरसाचें कटाक्ष संवीक्षण
त्यापुढें नकोच नंदनवन
मृदुल करांचा पाश गळ्याशीं मुखास मुख चुंबन
त्यापुढें तुच्छ सुधाप्राशन
हात उशासीं देउनि शयनीं हृदयांचें मीलन
त्यापुढें कशास इंद्रासन ?

मांगल्याची मूर्तिमती श्री, शशिप्रभा निर्मला
भूतलीं विलसिनी प्रेमला
या विश्वांतिल प्रेमरसाची वाहति भागीरथी
पावनी देवी ही श्रीमती
पारिजातसुमकोमल शोभा स्वयें इथे संचरे
करितसे जगतीतल साजिरें

तप:सिद्धि ही योगीशांची किंवा पुण्यप्रभा
अथवा कविची प्रतिभा शुभा

वृंदावनिचें मंगल अथवा जगास करि मोहिनी
तीं ही विलसे सीमंतिनी
उज्ज्वलतेचे प्रसन्नतेचें सार नार शोभते
हासुनी जगासही हसवितें

नसे मोल या स्त्रीरत्नांचें याला उपमा नसे
अलौकिक तेज भव्य दिव्यसें
तारुण्याच्या कैवल्याचें धाम वामलोचना
असावी जवळी मनमोहना
स्वर्गाचा सोपान कामिनी जवळ असावी सदा
नारी तरुणाची संपदा

◆◆◆

# २२. लावणी

नको ग मारुस मुरके वरिवरि तुझे नैन फिरवी इकडे
जरा तोल सांभाळी पडतिल नाजुक मानेचे तुकडे

तुजवर अमुची वहाल मर्जी नजर करी स्थिर जरा तरी
मधुर हासुनी मधुर बोलुनी पडदा मधला दूर करी

खेळ वाकडया नजरेचे हे अद्‌भुत जादूची करणी
वर खालीं हृदयास नाचवी तुझ्या ग नयनांचें पाणी

कमान ओढुनिया भिवयांची नैनांच्या कोपऱ्यांतुनी
अचुक निशाणीं नेत्र मारिसी अद्‌भुत नैनांचें पाणी

पुरे लपंडावाचा आतां नजरा-नजरांचा खेळ
कशास हा संकोच होउ दे भरल्या दृष्टीचा मेळ

उदया आला हृदयाकाशीं प्रणयाचा रजनीकांत
अनुरागाची छटा पसरली लाली आली गालांत

पटली आंतिल खूण परस्पर पारख आम्हां हृदयाची
कशास 'उत्तर दक्षिण' ऐके साक्ष मनोमय प्रेमाची

किति लाजावें किति मुरडावें किती हृदय हें लपवावें
पुरे मूकसंदेश, एकदा रहस्य सारें उकलावें

झाली प्रस्तावना पुरे ही मुख्य विषय तो यापुढती
जें नयनांनी सूचित केलें हृदयें करुं ते उघड रितीं

दृष्टभेट ही इथें संपवुनि गांठी घालूं हृदयांच्या
बहिरंगाचा परिचय झाला गोष्टी बोलूं अंतरिच्या

डोळयांना आवडले डोळे हा दृष्टीचा महोत्सव
नयनिं पेरिलें हृदयिं उगवले घेंऊं ये त्याचा ठाव

हृदयाची झालेली चोरी लपेल हृदयापासुनि कां ?
पुरे लाज संकोच एकदा जवाब त्याचा देइ निका

तुज आवडलें जरी हृदय हें असेच सेवेसी नजर
तुझें हृदय तरि दे मग मजला प्रसाद मानिन मोदकर

अदला बदली दिसते तरि हा एकजीव दो हृदयांचा
द्वैताचा अद्वैतभाव हा आत्मसमाधी प्रेमाचा

◆ ◆ ◆

## २३. प्रबोधन

(राग–सोहनी)

जाग जाग जाग सखे ! उजळल्या दिशा ।।ध्रु०।।

शशिमंडळ पश्चिमेस अस्त पावलें
तारेही बघ विलिन होऊं लागले
हसवित तुज मृदुल विमल हासते उषा

उदयाचलिं भानुबिंब देई दर्शना
फाकली प्रभा नभांत हर्षवी मना
जागवीत अरुण तुला संपली निशा

मधुर हा प्रभात–वात गात वाहतो
खेळत तव वेणीशीं नाच नाचतो
ऐक ! तुला गाती शुकसारिका कशा

फुलल्या फुलवेली नव पुष्पभूषणीं
डौलानें डोलतात विमल कमलिनी
मंगल वनदेवि वरित जागृती–दशा

ऊठ हे मनोविनोद ! सुगुण–गुणवती
गृहमंगल–देवि ! ऊठ ऊठ गे सती !
जागवीत जग सगळें जागल्या दिशा

जाग जाग जाग

◆ ◆ ◆

विदर्भवीणा, १९३० पृ. १०;
'पहिला पाळणा' (चित्रपट)

## २४. पौर्णिमा

आज पौर्णिमा मुखचंद्राची, माथ्यावर चांदणें
ढळल उद्यां मोत्यांचे पाणी नीरस मग लेणें

बहर भरावे देठोदेठीं, रस भरला भरपूर
तारुण्याची सरेल संपत् उतरुन जाइल नूर

ज्या दिवसाची त्या दिवसाला रस–रंगाची लाट
झरझर वाहुन जाइल गंगा पडेल उघडा कांठ

लावण्याचा अफाट दर्या तुफानास आला
त्या लहरीवर बसुनि एकदां जा वैकुंठाला

सोन्याच्या या पुतळीवरचे मीन्याचे मोर
भुर्‌कन् जातिल उडुनि साजणी वाऱ्यावर दूर

मदनाचा दरबार थाटला चढलें लाल निशाण
सोड एकदा राजेश्वरि ! तव प्रीतीचें फर्मान्

पिवळ्या वेलीवर जोवरी लाल गुलाबी फुले
तोंवर गुंफुनि गोफ गुणवती प्रेमळ सजवी गळे

आज तीर नैनावर चढला ठाण नीट नेटकें
शिकार साधुनि घेइ उद्याचे काय कुणा ठाउके

आज उमटली सरस्वती हें त्रिवेणिचें तीर्थ
लाजत मुरडत करुनी स्नानें होऊं या सार्थ

विदर्भवीणा १९३०

## दुसरा पाठ

आज उमटली सरस्वती ही पर्वकाळ आला
सुखद संगमीं पावन होउनि जाऊं स्वर्गाला

◆ ◆ ◆

# २५. लावणी

पवळी कवळी कळि चाफ्याची राजस अवयव वय चवदा
उघडया बाजारांत बैसली नगदानगदीचा सवदा

"या या सजना ! .या मनमोहना ! साजुक नाजुक मी नार
जाहिर दुनियेला आमंत्रण जाहिर मीना बाजार
मोकळेंच हे दार, मोकळा महाल मंचक दरबार,
मोकळयाच गुजगोष्टि, मोकळया देहाचा पाहुणचार
हिंडत धुंडित राधाराणिस याहो वृंदावनवासी
रास रचूनी बसलें याहो रासविहारी ! क्रीडेसी
अधरसुधेची पाणपोइ ही, या आलिंगन कुंजांत
येइ तृषित पांथस्था ! येथें करिते स्वागत थाटांत
येइ सरळ मजल्यावर मजले चढुनि वेल सोपानाचा
वसंत वैभव खुललें वरती फुलला झेला पुष्पांचा
ऐन्याच्या चांदण्या जडविल्या इथें बादली छतातळीं
याहो मेघश्यामा ! सजली मी चंचल चपला-पुतळी"

मयनिर्मित ही मायानगरीची मोहक मैनाराणी
वर खालीं हृदयास नाचवी अद्‌भुत जादूचें पाणी
नयनांचें काटेरी कुंपण कुरळया केसांचें जाळें
मांडुनि वसली त्यांत गुंतवित भटकत फिरलेले डोळे
दिवसभरी मानेला मुरके दिवसभरी डोळेमोड
दिवसभरी पानांच्या पट्टया दिवसभरी स्वप्नें गोड
मध्यरात्रिला भेटीगोष्टी थाटमाट हसणें रुसणें
रात्रीं क्षणभर फुरसत नाहीं दिवसामागुनि दिवस सुने
दिसेल त्याचे स्वागत करुनी होते त्याच्यास्तव वेडी
हसेल त्याच्या गळयांत पडुनी करिते काया कुरवंडी

पहिल्या भेटिस 'प्रेमविव्हला' 'लागे मूर्तीचें ध्यान'
जो जो भेटल त्याला अर्पण करि पंचप्राण
'तुम्हि माझे सरदार राजसा ! मी या चरणांची दासी'
असो शिपाई असोच प्यादा, क्षणांत वृंदावनवासी
गुण नसतां गुण गंभिर व्हावें रूप नसूनी रूपमणी
या माडीवर पैसे देउनि नसत्या सर्वस्वास धनी

हा येथें विक्रीस ठेविला तनुलतिकेचा बहर नवा
ईश्वरनिर्मित भांडवलावर नफा घेतला अवासवा
'आज नगद कल उधार' येथें 'माल चोख पैसा रोख'
'असल माल' 'दिलपसंद' सारा घे चिल्लर वा घे ठोक
सायंकाळापासुनि वाढे रोज दुकानांतिल गर्दी
क्षणोक्षणीं नवनवे गिऱ्हाइक आली वर्दीवर वर्दी
जगभर शाखा, खुल्या कराचा अंतर्-राष्ट्रिय व्यापार
पाजी तरुणांच्या तांड्यावर दुकानदारांचा भार

भावावाचुनि लोभहि लटका, हृदयाविण लटकें प्रेम
लोभावाचुनि लटकें अश्रु, प्रेमाविण लटका काम

उघड्या मैदानांत मांडली सार्वजनिक ही पिकदाणी
आठ चार आण्यांत थुंकुनी सर्वस्वाची धूळधाणी

◆ ◆ ◆

मराठी कविता–१९२० ते १९३० मुंबई साहित्य संघ प्रकाशन

## २६. रंगपंचमी

आतां फार विरहाचे दिवस कठीण
रंगपंचमीचा आला नवलाचा सण ।। धृ० ।।

वसंताची शोभा थाटे
बेलियाचा गंध सुटे
शशीबिंब नभीं नटे
मन्मथाचे बाण ।। आतां फार विरहाचे

उत्सवांत जन दंग
चहूकडे रस रंग
प्रणयिनी प्रिया संग
करी नृत्यगान ।। आतां फार विरहाचे

माझ्या जिवलग जिवा !
मज भेटशील केव्हां
आळवीत जीवाभावा
वाचवी रे ! प्राण ।। आतां फार विरहाचें

◆◆◆

विश्ववाणी १३, अंक ८ एप्रिल १९३५

## २८: 'बासरिचा झंकार'

(चाल–खचित बाई)

बासरिचा झंकार–कुंजवनीं ॥धृ०॥

गोड सुरांचे गोडच गाणें वाजे वारंवार
धवल अशा ह्या निशीथकालीं येते ही मधुधार
सुमगंधासम दिशिंदिशीं भरला भैरविचा प्रस्तार
चित्तवृत्ति मम सुखमय झाल्या सुखमय हा संसार

◆◆◆

# २९. अबोला

व्हावी दृष्टिस दृष्टि नकोशी–पहिलें हें मानस होतें का ?
पहिलें नयनांचें संमीलन यासाठिंच झालें होतें का ?

एका जागीं बसलों उठलों 'तूं मी' ऐसा भेद विसरलों
नको परस्पर वारा पुढतीं–विचार तेव्हां होतें का ?

परस्परांना हृदयें देउनि दोन मनें ही केलीं एक
त्यांची सोलुनि साल काढणें–हें तेव्हां सुचलें होतें का ?

भूषण झालों परस्परांना एकमेकां वाटे अभिमान
दुरभिमान वाढेल पुढे हा–हे अपेक्षित होतें का ?

बाळपणींचे खेळ खेळतां क्षणभरचें तें रुसणें फुगणें
पुढें विरस जन्माचा व्हावा–कल्पनेंत तरि हें होतें का ?

वेडें मन हें तव सुखदुःखें आंदोलन पावत होतें रे !
पडले पीळ उकलण्याचे ते मार्ग सख्या ! हे तव होते का !

प्रेमसूत्र संबद्ध जहालों विरूनि गेली स्वतंत्रता
फुटुनि निघाया दो जीवांचे एकजीव केले होते का ?

वृत्तिचें द्वैविध्य लोपलें स्वपरभाव गेला विरूनी
'स्वतंत्र कीं परतंत्र' वाद हा कृष्णार्जुन घालित होते का ?

अभिमानाची वार्ता नाहीं या प्रेमाच्या दरबारीं
समतेमध्ये उच्च नीच हे भाव कधीं उरले होते का ?

दृष्टि–आड होता क्षण भर तूं हृदय तुटे शतधा जेथें
उत्तर–दक्षिण जिवाजिवांचें सहन खऱ्या प्रीतिस होतें का ?

हृत्तंत्रीच्या नाजुक तारा स्वरांत लावुनि घे गोडी
स्वच्छंदानें हात फिरवितां मनोविनोदन होतें का ?

कितिही रुसलें, कितिही फुगलें, बळेच कितिही जरि विटलें,
प्रेमाकांक्षी हृदय तरी हें शांत तुझ्याविण होतें का ?

# २६. रंगपंचमी

आतां फार विरहाचे दिवस कठीण
रंगपंचमीचा आला नवलाचा सण ।। धृ० ।।

वसंताची शोभा थाटे
बेलियाचा गंध सुटे
शशीबिंब नभीं नटे
मन्मथाचे बाण ।। आतां फार विरहाचे

उत्सवांत जन दंग
चहूकडे रस रंग
प्रणयिनी प्रिया संग
करी नृत्यगान ।। आतां फार विरहाचे

माझ्या जिवलग जिवा !
मज भेटशील केव्हां
आळवीत जीवाभावा
वाचवी रे ! प्राण ।। आतां फार विरहाचे

◆◆◆

विश्ववाणी १३, अंक ८ एप्रिल १९३५

## २७. सोन्याचा खंजीर

चाल–(वद जाउं कुणाला शरण)

सोन्याचा खंजिर उरीं, सोसुं किति तरी, किती धरुं धीर
कधि येइल माझा पर्यंकीचा वीर

राजहंस राजसमणी, गुंतला गुणीं, उडुनि कसा गेला
जा आण लावुं दे कंठि फुलाचा झेला

श्रीमंत सवाइ सरदार, गळयाचा हार, हृदयिंचा राणा
मज टाकुनि गेला माझा मोतीदाणा

हा अनंत विरहावधी, सरेल कां कधीं ? धीर धरवेना
मदनाचे जहरी तीर तनुस सहवेना

ही नाजुक मृदु कोवळी, फुलाची कळी, कामिनी काया
या गोऱ्या गालीं उठली पिवळी छाया

हा कुसुमसमय संप्रती, वायु वाहती, मलयगिरीवरचे
संताप तशांतहि देती किरण चंद्राचे

नयनांत नीर दाटले, हृदय फाटलें, प्राण जड झाले
देहाचे सारे बंध तटातट तुटलें

प्राणेशा जिवलग जिवा ! अतां केधवा, द्याल दर्शन
ये दीनदयाळा ! त्वरित सख्या धाउन

जा जा ग सखे ! जा त्वरें, तनु स्मरशरें, होइ व्याकूळ
जा आण प्रियकरा नको लावुं गे ! वेळ

संदेश कथुनि अवचितां, पडलि मूर्छिता, धरणिवर कांता
उठवील कसा तिज कोण प्रियाविण आतां

◆ ◆ ◆

## २८: 'बासरिचा झंकार'

(चाल–खचित बाई)

बासरिचा झंकार–कुंजवनीं ॥धृ०॥

गोड सुरांचे गोडच गाणें वाजे वारंवार
धवल अशा ह्या निशीथकालीं येते ही मधुधार
सुमगंधासम दिशिदिशीं भरला भैरविचा प्रस्तार
चित्तवृत्ति मम सुखमय झाल्या सुखमय हा संसार

◆◆◆

# २९. अबोला

व्हावी दृष्टिस दृष्टि नकोशी–पहिलें हें मानस होतें का ?
पहिलें नयनांचें संमीलन यासाठिंच झालें होतें का ?

एका जागीं बसलों उठलों 'तूं मी' ऐसा भेद विसरलों
नको परस्पर वारा पुढतीं–विचार तेव्हां होतें का ?

परस्परांना हृदयें देउनि दोन मनें ही केलीं एक
त्यांची सोलुनि साल काढणें–हें तेव्हां सुचलें होतें का ?

भूषण झालों परस्परांना एकमेकां वाटे अभिमान
दुरभिमान वाढेल पुढे हा–हे अपेक्षित होतें का ?

बाळपणींचे खेळ खेळतां क्षणभरचें तें रुसणें फुगणें
पुढें विरस जन्माचा व्हावा–कल्पनेंत तरि हें होतें का ?

वेडें मन हें तव सुखदुःखें आंदोलन पावत होतें रे !
पडले पीळ उकलण्याचे ते मार्ग सख्या ! हे तव होते का !

प्रेमसूत्र संबद्ध जहालों विरूनि गेली स्वतंत्रता
फुटुनि निघाया दो जीवांचे एकजीव केले होते का ?

वृत्तिचें द्वैविध्य लोपलें स्वपरभाव गेला विरूनी
'स्वतंत्र कीं परतंत्र' वाद हा कृष्णार्जुन घालित होते का ?

अभिमानाची वार्ता नाहीं या प्रेमाच्या दरबारीं
समतेमध्ये उच्च नीच हे भाव कधीं उरले होते का ?

दृष्टि–आड होता क्षण भर तूं हृदय तुटे शतधा जेथें
उत्तर–दक्षिण जिवाजिवांचें सहन खऱ्या प्रीतिस होतें का ?

हृत्तंत्रीच्या नाजुक तारा स्वरांत लावुनि घे गोडी
स्वच्छंदानें हात फिरवितां मनोविनोदन होतें का ?

कितिही रुसलें, कितिही फुगलें, बळेच कितिही जरि विटलें,
प्रेमाकांक्षी हृदय तरी हें शांत तुझ्याविण होतें का ?

मी अन्यायी शतविध केले असंख्य जरि अपराध तुझे
प्रेमानें प्रेमी हृदयाला क्षमा उचित नच होते का ?

हृदयाच्या तोलानें मोजी या हृदयाचें वजन सख्या !
बासरिच्या ध्वनिहुनि वासाचें मोल अधिक कधि होतें का ?

जन्मांतरिचें सौहृद अपुलें तुटेल या जन्मीं हें कैसे ?
रुचे अबोला तरी रुचो परि--पहिलें हें मानस होतें का ?

◆ ◆ ◆

विदर्भवीणा १९३०–६३

## ३०. 'कमला'

सावरकर कृत 'कमला'
काव्याचे कौतुक

वृत्त–अनुष्टुभ

### "ज्याचें त्याला निवेदन"

कवि गोविंद, नाशिक

'कमला' ही किती शोभे लहान नटवी, करी
नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी

आहोंत काव्यलक्ष्मीची नित्य पाहतची छवी
कमला–रूपसंपत्ती तरीहि दिसली नवी

'कमला' ही गमे मुक्ता, मीरा वा विदुला कुणी
लावण्याची लता किंवा उमा देवविमोहिनी

काव्यें अहा ! न काव्यें हीं गगनीं गीतसंपदा
नौकेंत कौमुदीच्या ही बसुनी गात शारदा

नोंद त्या दिव्य गाण्याची ठेवूं पृथ्वीवरी, असे
संगीताचेंच तीच्या घे कवि काव्यांत या ठसे

वाचतांना नव्या पानावरी नवनवे तधी
पीयूषाच्या पुटांतूनी पुट दिव्य पदोपदीं

रसरंग निराळेची कवना–कवनांतले
विश्वमोहन मद्याचे पेले यांतुनि ओतले

विश्वमोहन मद्याचे पेले प्राशुनि कोवळे
उठती सौख्य सिंधूंची हृदयंगम वादळें

मनोज्ञ किति हो शोभा वाचतांना गमे हृदीं
कीं ही वाहतसे येथें काव्याची रसिता नदी

लकाकति पदें न हीं, पीयूषाचे रवे रवे
रोमारोमांतुनी गीतीं एकतान मधु स्रवे

कमनीय वसंताची मनमोहक मंजरी
मंजु मंजुळ रेणूंच्या मब निर्झरती सरी

ज्याचे भाव सुमांच्याही सुगंधावरती असे
श्रुतिमंगल हें काव्य श्रुतिमंत्र-निनादसें

कल्पनांच्या मधें जैसी कविता खुलुनी डूले
नव्या मराठी काव्यांत 'कमला' काव्य शोभलें

श्लोकांत कालिदासाच्या उपमाच जशी दिसे
नव्या मराठी काव्यांत 'कमला' काव्य हें तसें

छोटेसें पाडव्याचें हें अष्टपैलु मधें खुलें
कारंजें शतधारांचे स्वादु शीत सुधाजलें

नवें प्रसादमाधुर्य रसास्वाद नवा नवा
नव्या नव्या कल्पनांचा मृदु मंजुल गोडवा

वेली काव्यप्रसूनांची पाहुनी मनिं होतसे
कोठें ठेवूं अणी कोठें न ठेवूं तिजला, असें

अनुष्ठुभ, कविश्रेष्ठा ! वृत्तांत रुचलें भलें
गुणांधत्वहि मोठ्याचें मोठेंच असणें बरें

आणि हे कविराया ! तूं शिकलासि तरी कुठें
दिव्य हो किमया—आम्हा स्वयंमन्य नरां जिथें

सृष्टीच्या सहवासींही क्षणस्फूर्ति न लाभते
भुयारांत तुरुंगाच्या बैसुनीया सख्या ! तिथें

तुज जीवंत काव्यांचीं रसरम्य अशीं फुलें
सुवासमत्त पाहूनी निर्मितां मन हें भुले

यत्कीर्ति देशकार्यीं दे देवत्व दगडांप्रती
यौवनाचीं सुमें वीरप्रसू तोडुनि अर्पिती

देतो गंभीरवाणीनें सशोकास विशोकता
लेखणीचा ब्रह्मवीणा करीं कोमल लाभतां

**यावी वज्रासही वाचा;** काव्यलोलुप हीं मनें
असें मंजु गमे काव्य कीं हीं बुल्बुल् गायनें.

**फुलांहुनि मऊ आणी साखरेहुनिही मिठी**
**कंठी कोमल काव्याची** माळ निर्मळ गोमटी

**गोड काव्यें कवींचीं तीं पुढें त्याहुनीही अहा !**
**गोडी विजनवासीची पिऊनि रसिका ! पहा**

कालेंचि ना गुणेंही जो ठरे आद्यकवी महा
कवींत महाराष्ट्राचा आज त्यासम अन्य हा

असें कविवरा ! फेडूं प्रेमाचें हें तुझें ऋण
आवडो भक्तिभावाचें–'ज्याचें त्याला निवेदन'

◆ ◆ ◆

प्रतिभा (सावरकर अंक)
१५ जानेवारी १९३६

(या कवितेतील जाड ठशांतील शब्द स्वतः सावरकरांनी कमला काव्यांत वापरलेले आहेत, हे रसिकांच्या ध्यानात येईलच.)

## ३१ लावणी

छुम् छुम् छनछन पैंजण वाजति नाजुक चरणांत नारिच्या
मंद मंद गति चाले हंसी मन आनंदात

जरि जरतारी शालु बुटयांचा झोक ऐटबाज शालुचा
पदर सावरित चाले, करिती कंकण आवाज

मदनाची फुल्छडी फुलाची कलिका सुकुमारा फुलाची
अस्मानीची बिजली चमके कीं बांकेतारा

गोंडस गाल लाल मखमाली नयन काजळी पंकज
अप्रतिमा प्रियतमा तनू ही ही कनकासम पिवळी

काळे कुरळे केस वादली दुभंगला भांग मोतिया
शुभ्र फुलें वेणींत अंगिची काचोळी तंग

कुठें ग जातिस फेकित फेकित नयनांचे बाण विषारी
नोकझोक हा करुनि कुणावर योजिसि संधान

भाग्य कुणाचें आलें उदया कोण धन्य पुण्य भूतळीं
कुणास अर्पण करिल अपुलें ताजें तारुण्य

नव नवतीची कळि चाफ्याची कुणास वाहशिल नारि तूं
मोत्याचा शिरपेच कुणाच्या शिरीं खोवशील

मोल काय ज्वानीचें तुझिया सांग ग हासून सुंदरी
थोर अम्ही सरदार पृथ्विचें राज्य करूं दान

समशेरीवर गनिम नाचवूं काळाचे काळ आम्हि ग
स्वीकारी परि सखे ग ! अमुची प्रेमाची माळ

चमकन् उसळे ह्या नयनाची बिजली त्या नयनीं चमकन्
गालाशी गुजगोष्टी केल्या तत्क्षणिं अधरांनीं

मोहन–फंदी वहु आनंदी रसज्ञ रसिकांचा मोहन
छंद गातसे स्वच्छंदानें नव्या उमेदीचा

◆ ◆ ◆

# ३२. प्रीतीचें दिव्य

सख्या रे ! किती, पाहशिल प्रिती, परीक्षा करुन
कलदार मोहर सोन्याची पहा वाजवून

गिरिवरुन लोटलें धरुन, बुडविलें जलधीं
प्रीतीस नव्हे रे भंग तरीही कधीं

घडिभरी वास आवडी घेउन फेकावे
शिरिं यास्तव का हें फूल ठेविलें भावें

नसे रीति अशी प्रीतिची सख्या गुणवंता !
कां दीन दासिला उगाच छळिशी नाथा !

यावेंसें बरें तुज दिसे तरिच मग यावें
या विरहव्यथेला उगीच कां म्यां भ्यावें

ज्या दिशीं, जाहले पिशी, गुंतली नजर
बेचैन जिवाला स्वतः लाविला घोर

स्वाधीन, हृदय हें लीन, तूझिया चरणीं
केलें त्या दिवशींच जीव लाविला झुरणी

कंठास, प्रीतिचा फास, स्वकरिं आवळिला
त्या दिवशिच सुखदुःखास जीव अर्पियला

चार दिवस, जाहला प्रकाश, कोवळें उन्ह
जन्मास अतां लागली अंधेरी रैन

कोवळीं, फुलें गुंफिलीं, सुखाचे समयीं
हे दिवस पातले रुतती कंटक पायीं

काहिं दिवस गिरीचे शिरीं विभव अनुभविलें
या घोर कंदरीं आतां येउनि पडलें

हा अंत, असा विरहांत, नित्य प्रेमाचा
विधिलिखित असे हा सोहळा प्रेमि युगलाचा

हें योग्य सख्या सौभाग्य खऱ्या प्रेमाचें
विरहानलिं तापुनि प्रेम शुद्ध व्हायाचें

सहवास घडो बहु दिवस, घडो कीं विरह
या पायावर अर्पिला सदाचा देह

स्वीकार करी, झिडकार, तार की मार
वाहिली सदाची काया पायावर

माझि चिंता, असें भगवंता लक्ष्मीकांता
ओवाळिन पंचहि प्राण पायावरता

नसे आस, करित तव ध्यास, दिवस कंठावे
गत सौख्याचे दिन कसे तरी विसरावे

हा फार देहाचा भार नकोसा झाला
एक दिवस ऐकशिल विहंग उडुनि गेला

प्रार्थना ऐकरे सजना एक शेवटची
तुज कधिहि न येवो आठवण या दासीची

जधि विराम पावेल गोड नाम तें वदनी
जधि निश्चल होतिल नयन मूर्तिच्या ध्यानीं

भेटावें एकदां यावें क्षणभर तेथें
मग सर्व सुखें पावलीं मला तव हस्तें

नाहींत इथें नशिबांत नसो ते दिवस
अमृताचें भोजन देईल वरतीं ईश

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ५, विलास ८

# ३३. चिरंजीवास

मधुर मधुर चुंबना देई मन मोहना ! धृ०

कमलासम लाल लाल । कोमल तव गोड गाल
विमलस्मित मृदुल मृदुल । हर्षवी मना

बाळा ! तव रम्य वदन । रम्य केश रम्य नयन
रम्य तुझे हस्त चरण । रमवि लोचना

मधुर मधुर बोलुनिया । हृदय घेसि चोरुनिया
मजला आलिंगुनिया । सुखवि नंदना !

◆◆◆

## ३४. जोगीण

नयन शराचा घाव घातला हृदयीं हृदयेश्वरा !
कुण्या जन्मिचा सख्या सुंदरा ! दावा केला पुरा

उगाच घडिभर चमक दाविली सस्मित वदनावर
स्निग्ध मुग्ध नव भाव रेखिले हलत्या ओठावर
चंद्रकोर भालावर डोले वसंत गालांवर
मुक्या मुखांतुनि वाग्दानाचे तुटले मौक्तिक-सर
येउनि तिरपा तीर लागला-ठाण नीट साधलें
पंख मोडुनि उडत्या विहगा रेशिमगुणिं गोविलें
हृदयीं पहिला ध्यास लाविला भिरभिर हे लोचन
कोमल काया कंपित केली रूप सख्या ! दाउन

कुठें वाकड्या वाटा चुकल्या, दृष्टभेट लाभली
जन्मांतरि जें तुटलें सौहृद गाठ पुन: जोडली
क्षणांत रोखुनि दृष्टि परस्पर पारख केली नवी
नव्या प्रीतिचा अनुभव आला मंगल नयनोत्सवीं
इकडुनि तिकडे दूत धाडिले दृष्टीचे पारवे
हृदयाचे संदेश झेलिले हृदयावर गौरवें
एकमेव स्वच्छंद भुजांवर बाजुबंद गुंफिले
सोनरी साखळ्यांत जडले चंचल पद कोवळे
निळ्या नभाचा मंडप करुनी क्षितिजाचीं झालर
लाज लाजऱ्या दृष्टित विणला अंत:पट सुंदर
हृदयें गाती अस्फुट मगल एकतान गायन
विवाह मंगल शिरीं उधळला गुलाल गालांतुन
देवतरूच्या कळ्या कोवळ्या फुलल्या पायांतळी
स्वर्गसंपदा गुंफुनि सजलें तोरण भूमंडळीं

परि माझा भगवंत कोपला क्षणीं पाठ फिरविली
माया लावुनि जाणें केलें, आस सकल भंगलीं
प्रीतीच्या पंखावर वसुनी धावलास धावणें
डोळे भरुनी क्षणभर झालीं लाखवार दर्शनें
लाखांचें तें वैभव माझें लाखांचा तो क्षण
क्षणांत दिधला कसा निर्दया ! वाऱ्यावर उधळून
प्रीतिलतेचीं पहिली सुमनें तुजसाठीं गुंफिलीं
तुझ्याच चरणीं अर्पण करण्या आशा विस्तारिली
तुवांच रुसवा केला मग हें जीवित कोणास्तव ?
कोण करिल या वनमाळेचा तुजविण मग गौरव
हिरून नेलिस तुवाच माझ्या प्रीतीची साउली
फुलाफुलांचें पाणीं सुकलें पूजा कोमेजली

सुखांत होता जीव चिमुकला चिमुकल्याच वैभवें
झुलत हृदय पाळण्यांत झुलत्या फुलाफुलांच्या सवें
रुणझुण खेळुनि वाळपणीचें गोड खेळ अंगणीं
मायेच्या पदरांत झोंपलें मुग्ध हृदय हासुनी
हांसत हसवित डोलत डुलवित खेळ करित नवनवें
माझें मज लाभलें निरंतर बाळ–भाव वैभवें
नव्हतें दिसलें दुर्मिळ तेव्हां, नव्हत्या आशा मनीं
नव्हता सायक हृदयीं, नव्हता राजहंस लोचनीं
अजाण दृष्टिस दिसत आजवर अजाण निर्मळ जग
मधुर शैशवीं मधुर भासलीं उपवन वेली खग

तेव्हां दिसले डोळे मजला जडलेले मजवर
नव्हते त्यांतुनि सायक नव्हती जादू ही सुंदर
चहूंकडे मज हास्यचि दिसलें तेव्हांच्या आननीं
तुटले नव्हते परी मनोहर मौक्तिक सर त्यांतुनी
मायेचे जन होते तेव्हां वत्सलता दावित
लपला मग गोविंदच होता कवण्या कुंजांत

तुवां दिले या दासिस राया ! नामरूप प्रीतिनें
तुवां आणिले आकाराला सौभाग्याचें जिणें
तुवांच हृदयीं बोल ठंसविले त्याचीं पारायणें
तुवां वसविली मूर्ती हृदयीं तीच मला दर्शनें
तुझ्या जिवाहुनि या देहाची झाली ओवाळणी
तुझी संपदा तुलाच, तुझिया स्वाधिन संपादणी
आज तुझ्या आशेवर जगुनी जीवाला जगविणें
तुझ्याच नांवावरती आतां यावर माझें जिणें

साकाराचा निराकार तूं सगुणाचा निर्गुण
तूं माझा परमेश्वर मीही तुजसाठीं **जोगिण**

चटका लावुनि लटका झाला सर्वस्वाचा सखा
सांगा ! कोणी कोठें माझ्या सखयाची द्वारका

◆ ◆ ◆

विदर्भवीणा १९३०

## ३५. पंजाबी भाई

(चाल-सबसे रामभजन)

२२५८ ०१०८४ २३०६

पंजाबी भाईनो ! आता चला सरा पुढती ।। ध्रु० ।।

धन्य धन्य या हिंद भूमिचें नांव गाजवीलें
धन्य धन्य स्वातंत्र्य संगरीं आत्मार्पण केलें
वीरश्रीची शिकस्त करुनी हल्ला चढवीला
स्वातंत्र्याची ध्वजा रोविण्या पहिला बळि दिधला
प्राणांच्या आहुति देउनी समर पेटवीलें
जय बोला जय स्वतंत्रतेचें सुवर्णयुग आलें
पवित्र ह्या समराग्निज्वाला प्रचंड रणकुंड
लक्षावधि प्राणातें अर्पुनि पेटवुं ब्रम्हांड
निजप्राणांच्या पूर्णाहुतिनें समाप्ति यज्ञाची
या यज्ञाची करूं सांगता शपथ भवानीची

'हास्य निमालें, अश्रु पळाले, कंटकशल्यें बोथटलीं'
एकच तारा गगनीं चमके दिव्यदृष्टि आली
स्वर्गीच्या अप्सरा उभ्या ह्या पंचारति हातीं
ओवाळुनि प्रेमानें तुमचें सुस्वागत करिती
पंजाबी वीरांनो ! तुमचें अनुपम हें भाग्य
स्वर्गाचें अधिराज्य तुम्हांला यापुढती योग्य
निःशंक पुढें चला, पाठिला असे महाराष्ट्र
छत्रपति श्रीशिवनृपतीचें विजयि महाराष्ट्र
समशेरीवर गनिम् नाचवुनि हिंदु एक केला
मर्द मराठी वीरांचे त्या राष्ट्रहि पाठीला
स्वतंत्रतेला प्राण वाहुनि तुम्ही धन्य झालां
अम्हांस येणें मागोमागें-'जयोऽस्तु जय' बोला

महाराष्ट्र—पंजाब ठाकितां ठोकुनि दंड रणीं
कृतांत काळा खेचुनि आणूं शरण सहज चरणीं

‘जय बोला जय स्वतंत्रतेचा जयोस्तु जय बोला”
‘जय हरहर महादेव’ लागलें तोंड लढाईला

◆ ◆ ◆

# ३६. स्वातंत्र्यसमर

(चाल–भूपती)

चल दे सरबत्ती एकदांच तोफांस
मी उभा सिद्ध बघ समोर निर्वाणीस

चल गर्दी करुनी उसळ धुराचा लोट
हा रुंद छातिचा उभा पुरंदर कोट

चल सोड हुकुम खडखडित खड्या फौजेला
घे आटप आतां टांच दिली वारूला

दे थाप भरिव भरदार समरभेरीला
मी उभा थोपटुन दंड धडक द्यायाला

ही घटका आतां अखेर मर्दुमकीची
सांभाळ धडाडी वारांवर वारांची

बळ एकवटुन तव सेनासागर लोट
मी सिद्ध एकटा ठाण मांडुनि नीट

चल काढ तुझी एकदम लाख समशेर
शर्थीस उभा मी समोर बेदरकार

ये सामन्यास तुज शपथ मायभूमीची
बघ नीट एकदा शिकस्त रणमर्दाची

उसळेल मेरु कोसळेल वीरा ! गगन
परि रेसभरी नच ढळेल माझें ठाण

या तरवारीनें म्यान सोडिलें आतां
चल काढ हुडकुनी कोण तुझा तो त्राता

पाजळला तोंडा जळती ज्वाला उठली
चल काढ हुडकुनी कोण तुझा रखवाली

हें स्वातंत्र्याचें समर पारतंत्र्याशीं
हें देशभक्तिचें निकर देशशत्रूशीं

ही स्वत्वाची जुलुमावर धीट चढाई
ही मातृभूमिच्या उद्धारार्थ लढाई

जोंवरी एकतरि बिंदु हिंदुरक्ताचा
तोंवरी सर्वदा 'हिंददेश हिंदूंचा'

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष १, विलास १२

# ३७. हर हर महादेव

(चाल--सबसे रामभजन)

या भाईनो ! या या–'हरहर महादेव' बोला          हरहर
वीरांची ही वीरगर्जना शोभे वीराला   ।। ध्रु०

महाराष्ट्र–नरसिंह शिवाची वीरगर्जना ही          शिवाची
रायगडाचे बुरुज भेदुनी घुमत दिशा दाही

ज्या हाकेनें जागृत केलें या महाराष्ट्राला          एकदां
तीच हाक ही बोला 'हरहर महादेव' बोला

या मंत्राचा उपदेष्टा श्री समर्थ महाभाग          स्वामी
या मंत्रें वीरांना आला खडबडुनी जाग

या मंत्रानें महाराष्ट्र हें 'महा-राष्ट्र' झालें          एकदां
या मंत्राने महाराष्ट्राला नवजीवन आलें

समर्थ गुरुचा महामंत्र जो शिवरायें जपला          मंत्र जो
तोच मंत्र हा बोला 'हरहर महादेव' बोला

स्फुरण पावतां दिव्य मंत्र हा या महाराष्ट्रांत          एकदां
दिल्लीचें सिंहासन झालें क्षणांत डळमळित

या मंत्राचा धाक वाटला साऱ्या दख्खनला          धाक हो
या मंत्रानें भुते पळालीं सर्व दिगंताला

राजमुकुट म्लेंछांचें पडले उलथुनि धूळीला          मुकुट ते
'जयोऽस्तु जय जय' बोला 'हरहर महादेव बोला'

महाराष्ट्र–वैभव सूर्याच्या शुभ प्रातःकाळीं          पुण्यमय
पावा फुंकुनि या मंत्राची जादु शिवें केली

या मंत्राची जादु पसरतां या महाराष्ट्रात          एकदां
क्षणामधें लाखांनीं पिकले वीरांचे शेत

या जादूने शेतकऱ्यांचे झाले रणशूर एकदां
विळे कोयते क्षणांत बनले भाले तरवार

या मंत्राची जादु पसरतां झडल्या समशेरी एकदां
भीमथडीचे घोडे चढले अटकेवर स्वारी

चहुकडे आसेतु हिमाचल करीत दिग्विजय एकदां
जरि पटक्याचा हत्ती फिरला तुडवित अरिहृदय

या जादूनें महाराष्ट्र यश जात दिगंताला राष्ट्र–यश
तीच जादु हो बोला–हरहर महादेव बोला

त्या मंत्राचा महाराष्ट्राला विसर कसा पडला आज हा
समशेरींचे पाणी उतरुनि जंग तिला चढला

या मंत्राची जादू सरता सरलीं पुण्याई सकलही
वीरांचे विक्रमही सरले विभव लया जाई

पुन: कराया जागृत आतां या महाराष्ट्राला आतां
'जयोऽस्तु जय जय' बोला 'हरहर महादेव' बोला

अष्ट दिशांचे पडदे फाटुनि भेदिल गगनाला दूरवर
करुनि असा ध्वनि, बोला 'हरहर महादेव' बोला

निजलेला महाराष्ट्र जागविल स्फुरवुनि वृत्तीला पूर्विच्या
राष्ट्रगीत हे बोला 'हरहर महादेव' बोला

दिव्य ध्वनिच्या या रसरंगीं वीरांनो डोला मराठी
पुन: एकदा बोला 'हरहर महादेव' बोला

◆ ◆ ◆

## ३८. !!

(वृत्त–स्रग्धरा)

हिंदुस्थाना ! तुझें हे गृहकलह कधीं शांत होतील सारे
केव्हां हिंदी मनें हीं भरतिल न कळे सर्व एका विचारें
मात्सर्य द्वेष निंदा त्यजुनि सकलही राष्ट्रकार्येक–चित्त
केव्हां हिंदी पुढारी झटतिल करण्या राष्ट्र हिंदी समर्थ

आर्यांच्या वैभवाचा दिनमणि बुडुनि ध्वांत झाले नितांत
निद्रावस्थेंमधें हा किति तरी न कळे काळ गेला अनंत
प्रात:संसूचि आतां झडत चवघडा, त्यांतले गोड सूर
येती स्वाराज्यरूपी, तरि अजुनि अम्ही झोंप घेण्यांत चूर

गेला तो काळ जावो, क्षणभर करुं या दूर त्याचा विचार
आगामी काळ केव्हां तरि विसरुनिया काय लागेल पार ?
स्वार्थाला मत्सराला चिकटुनि बसतां यापुढे काय आशा ?
देई सद्‌बुद्धि आम्हां शरण पदिं तुझ्या हिंदवासी रमेशा ?

राष्ट्रोद्धारार्थ हिंदी तरुण सजुनिया आत्मयज्ञास आतां
कर्तव्याची अपेक्षा करिति परि तयां पाहिजे कोणि नेता
आतांही या विवादीं कलह करुनियां वेचिता काळ व्यर्थ
सर्वस्वी हो पुढारी–जन ! शिरिं तुमच्या भार, टाळा अनर्थ

◆◆◆

वागीश्वरी वर्ष ४ विलास ५

(या कवितेला वागीश्वरीच्या अंकांत शीर्षक नाही. त्याजागी केवळ दोन उद्‌गार चिन्हे आहेत.)

# ३९. ज्योति

(वृत्त–शार्दूल विक्रीडित)

गेली ज्योति विझूनिया तरि उरे दिव्यप्रभेची स्मृति
फुंकूनी, घृत ओतुनीच करितां येते पुनः जागृत
अंतर्दृष्टिस गोचर स्मृतिगत ज्योती तिथें नांदत
झालें स्थंडिल थंडगार जरिही ती वेदिशाला रिती

जेथें आज भयाण शांत दिसतें तेथें कधीं एकदा
चाले संतत वेदघोष जमुनी भूदेव भूभास्कर
तेथें आज उभें स्मशान जरिही कोल्हेकुई भेसुर
सांगोपांगहि मूर्तिमंद वसले ते वेद तेथें सदा

दिव्य–ज्योतिविकासिनीच हृदया टाकूनि गेली तरी
पूर्वीचेंच अजून छत्रपतिचें आहे महाराष्ट्र हें
तेजोभास्कर वीरवृंद जमुनी गाईल उच्चस्वरीं
ते स्वातंत्र्य–पवित्रमंत्र तरि ती पेटेल ज्योति स्वयें

गेली ज्योति विझूनिया तरि पुनः पेटेल ती आंतुनी
मंत्राचा सगळा प्रभाव, परि हा ! नाहीत होते कुणी

◆ ◆ ◆

काव्यकौमुदी आणि वागीश्वरी वर्ष १, विलास २, १९२४

# ४०. पहिलें चुंबन

हृदयें कोमलगुणी गुंफिलीं
एकमेक आकर्षुनि नेलीं
त्या हृदयांचें नवसंजीवन
दोन मुखांचें पहिलें चुंबन

नकळत पडल्या पहिल्या गांठीं
मधु मधु मुग्ध मनोहर भेटी
दो हृदयांचें स्नेहाकर्षण
दोन मुखांचें पहिलें चुंबन

पहिल्या भेटिस ओळख पटली
प्रथम दर्शनी नयनें मिटलीं
परस्परांचे स्नेह समर्पण
दोन मुखांचें पहिले चुंबन

हृदयोद्यानीं प्रथम विकसनें
फुलुनि उमटलीं पहिलीं सुमनें
नव्या नवतिचें नव–रस-पान
स्निग्ध मुग्ध तें पहिलें चुंबन

नव्या वयाची नवीन आस
नवीन वैभव नवे विलास
नवोनवांचें नवसंपादन
स्निग्ध मुग्ध तें पहिलें चुंबन

मुक्या मनांची भाव शारदा
मूक हृदयिचीं प्रीति संपदा
ये गालांवर अस्फुट उमटुन
स्निग्ध मुग्ध तें पहिलें चुंबन

सलज्ज हृदिं अनुराग उमटले
सस्मित वदनीं सूरहि भरले
दो वदनांचें वंशी–वादन
स्निग्ध मुग्ध तें पहिले चुंबन

नयन मनोहर मूर्ती दिसल्या
हृदयमंदिरीं जाउनि ठसल्या
अढळ कराया हें नव कोंदण
दोन मुखांचें पहिलें चुंबन

जिवा जिवांना साथ गवसली
भविष्य दृश्यें नयनीं दिसली
विश्वासाचें तें अभिवचन
दोन मुखांचें पहिलें चुंबन

पीळ भरुनि सस्नेह अनंत
दो हृदयांची गुंतागुंत
परस्परांचे अभंग बंधन
दोन मुखांचें पहिलें चुंबन

आनंदाचा महदानंद
मधुराचा मधु रसानुबंध
मृदुलांचेंही मृदु अभिनंदन
सलज्ज गालीं सस्मित चुंबन

मुग्ध हृदयिचें विमुग्ध लेख
प्रणय रसाचें चित्र सुरेख
प्रेममूर्तिचें अमूर्त पूजन
सलज्ज गालीं सस्मित चुंबन

# ४१. प्रिये ! खेळू खेळ

(चाल–मुलींच्या गाण्याची)

प्रिये ! खेळूं खेळ प्रिये ! खेळूं खेळ

चंपक तरुला बांधियेला दोला
पहिला वहिला प्रिये खेळुं खेळ !

खेळ नवलाचा सुमभ्रमरांचा
कृष्ण राधिकेचा प्रिये !

आकाशांत झोके मुक्यावरि मुके
मुके आणि झोके प्रिये ! येग खेळूं

शशी रजनीचा खेळ मजेचा
तरु लतिकेचा प्रिये !

वयाचा वसंत फुलें हृदयांत
हांसत नाचत प्रिये ये ग !

करिं कर देउनि मुखिं मुख लावुनि
एकान्त उपवनिं प्रिये !

जाऊं नदीकांठी लोळूं वाळवंटी
आलिंगन भेटी खेळ प्रिये ! खेळूं

बेलियाची जाळी कारंज्याजवळीं
तेथें एकमेळी प्रिये !

गुलाबांचे हार घालूं गळाभर
नाचूनी चौफेर खेळुं प्रिये !

फुलांचा सुगंध सुटे मंद मंद
आनंदी आनंद खेळ प्रिये ! खेळूं

शशी गगनांत वाहे मलयवात
वसंतोत्सवांत खेळु प्रिये

मंदमंद वात चंदेरी ही रात
कौमुदीरसांत प्रिये

बैसूनी नौकेंत स्वतां वळवीत
नदिप्रवाहांत प्रिये

गळ्यामध्यें हात गाऊं प्रेमगीत
प्रणयप्रमत्त खेळु प्रिये !

विश्व झोपीं गेलें सर्व शांत झालें
मन आनंदलें प्रिये ! खेळु

छेलछबीली प्रिया तूं रसीली
रुचे प्रेमकेली खेळ प्रिये

पैंजण चरणी रुमझुमवाणी
घालती मोहनी प्रिये

उपवन शांत फुलें डोलतात
एकान्ति एकांत खेळ प्रिये

नंदनवनींचा रति–मदनाचा
प्रणयरसाचा खेळ प्रिये !

माधवीच्या तळीं चंदनाजवळीं
पुष्पशेज केली खेळ प्रिये

अभिनवलीला चतुरमनाला
खेळ जो रुचला प्रिये !

खेळ नवलाचा सुम–भ्रमराचा
कृष्ण राधिकेचा प्रिये खेळूं खेळ

◆◆◆

## ४२. प्रीति

(चाल–असे पति)

प्रीतिचे स्नेहमधुर बंध
बंधनीं प्रीतिस आनंद ।।धृ०।।

प्रीतिचें मांडुनिया ठाण
प्रीतिचें करि शरसंधान

प्रीतनें प्रीतिस जिंकाया
प्रीतिला अर्पण करि काया

तोच शर उलटुनिया आला
प्रीतिचा वार हृदयिं झाला

प्रीतिचें व्हाया अधिकार
प्रीतिचें घे हृदयी वार

प्रीतीची विस्तारित माया
प्रीतिचा बुल्बुल् जिंकाया

प्रीतिचीं बिकटचि वहिवाट
प्रीतिची कंटकमय वाट

उलटा फासा गळिं आला
शिकारी बंदिवान झाला

हारुनी चरणिं शरण जाता
प्रीतिचे विजय येति हाता

उतरुनी विकच–कमल–कोशीं
घातला हातहि हृदयासी

प्रीतिची शरपंजरिं शेज
प्रीतिची भुजगशयनिं नीज

प्रीतिचा बंदा सापडला
प्रीतिच्या भुजबंधनिं पडला

गुंफुनि स्वकरीं गळफास
प्रीतिच्या जा वैकुंठास

प्रीतिची प्रेमळ सुरसरिता
धरेवर आणाया चढतां

रेशमी प्रीत मृदुल प्यारी
आडवी कुंपण काटेरी

प्रवाहीं वाहुनिया गेला
मिळाला प्रीति–सागरला

अलिकडे द्वैताचा भाव
पलिकडे प्रीतीचा देव !

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष १, विलास ५

## ४३. कालिंदी

(चाल–सरसवदन)

धन्य धन्य ती प्रसन्नसलिला वृन्दावाहिनी
निर्मळ निर्झरिणी । पावनी । कालिंदी तटिनी ।।ध्रु०।।

खेळुनि जेथें गोपांसंगें
कौतुक केलें श्रीयदुरंगें
अंकित हरिचरणीं । पावनी

जेथें वाजवि मुरलि मुरारी
रास नाचल्या गोपकुमारी
मोहुनि मधुरस्वनीं । पावनी

तो यदुवंशी शशिप्रकाशीं
करि जलकेली व्रजबालांशीं
मधुर सुधेहूनी । पावनी

कदंब तरुवर चढला श्रीधर
नग्न उभ्या जलिं गोपी सुंदर
आळविती स्तवनीं । पावनीं

हरिचें गोधन करि जलपान
गोप वाळूवर करिती शयन
खेळुनि यत्पुलिनीं । पावनी

संयोगाचे कीं विरहाचे
राधा माधव प्रणयरसाचे
स्थळ तें कुंजवनीं । पावनी

◆ ◆ ◆

# ४४. प्रभात-मंगल

(चाल-धावती)

समय किती हा शांत मनोहर
शांत शांत भू प्रशांत अंबर
प्रशांत तारे प्रशांत वारे
शांत शांत अंतरीक्ष सारें

क्षितिजावरच्या रेषा उजळत
दिशांदिशांतुनि प्रकाश झिरपत
नभ:प्रभेवर अंधुक दिसती
वस्तूंच्या सावळ्या आकृती
मर्दुनि काळ्या काळ-फणीला
मंगल उधळित भू-गगनाला
शेषशायिचें रूप सावळें
सृष्टित भरलें उघडित डोळे

निशा संपुनी प्रभात झाली
उदयगिरीवर उसळत लाली
गगनश्रीच्या मृदु हास्यांत
भुवनश्रीच्या मधु लास्यांत
पूर्व दिशेला चढला नीट
हिरेजडित सोनेरी मुकुट
नवकिरणांनीं चराचराला
सोन्याचा अभिषेक धरविला

सुवर्णमय नभ काय जहालें
सोन्याचे जणूं मेघ शोभलें
अंतरीक्ष सोन्यांत बुडालें
पृथ्वीवर सोनेंच शिंपिलें

प्रभात-मंगल वनें उपवनें
डोलत सृष्टी आनंदानें
कमलमिषानें विमल सरोवर
सहस्रनयनें पाहे भास्कर
सहस्रदल नयनांचें उघडुनि
उदयोन्मुख रवि पाहे नलिनी

सर्व पक्षिगण मंजुल गाती
दिन-राजाचें स्वागत करिती
कुंजवनीं कोकीळ कोकीळा
आनंदाचा गाति उमाळा
मूर्तिमंत हे वन-संगीत
विलीन होउनि तरूपर्णांत
झुलवित पंचम वाऱ्यावरती
वायुविकंपित झोले झुलती
उंच उभारुनि गळे नभांत
गंधर्वांशीं स्पर्धा करित

बालसूर्य-पदकमल-नमस्कृति
करण्या चंडोलादिक उडती
गान -सुधा तेथून वर्षती
स्वयंस्फूर्तिचीं करुनी कवनें
प्रेमें रविला गाती स्तवनें

सुरम्य द्राक्षा-लतिका शिखरीं
नाच नाचती मोर मयूरी

तरल रेशमी मृदु शेल्यानें
झेलित वरचेवर रविकिरणें
सर्वांगांचें उघडुनि लोचन
बाल भानुचें करिती दर्शन
सिंह व्याघ्र गिरिगुहा सोडुनी
पर्वत शिखरावरी येउनी
सूर्यबिंब सानंद पाहती
घनगंभीर स्वागत करिती

प्रभात होउनि मंगल झालें
भानुबिंब संपूर्ण उदेलें
उदयगीरीवर प्राची–कमळ
नटलें इकडे प्रसन्न निर्मळ
विषण्ण इकडे मिटुनी तुटलें
अस्तगिरीवर कुमुद विखुरलें
तपस्विनीची काळी काया
अस्तगिरीहुनि फेकित छाया

उदयगिरीवर तेज नवनवें
उसळत रविचें नव्या वैभवें
विभिन्न रंगीं गगन रंगलें
गंगा–यमुना–संगम झालें

गगनचुंबि वृक्षांची राई
उष:प्रभेने सजीव होई
सहस्र उघडुनि जिभा एकदा
चिवचिवते वनिं गीत संपदा
हालत शाखा डोलत पानें
हर्षोत्फुल्ला करित नर्तनें
दिशांदिशांतुनि मृदु झंकारें
झुलवित हिरवे विझण–वारें

रविकिरणांचें सोनें लुटुनी
मिरवित लक्ष्मी पानोपानीं

निळावंतिचीं शुभ्र भूषणें
गगनांतुनि आणिली उषेनें
अहेर तो वनवेली त्याली
तीच सकाळीं सुमनें झालीं
लाल गुलाबी पिवळे वर्ण
दवबिंदूंचें मौक्तिक चूर्ण
चमके वर भरजरी विकीर्ण
अर्धोदित सूर्याचें स्वर्ण

उषप्रभेचे तरंग उसळत
त्यांत फुलांचे सुगंध मिसळत
त्यावर वसुनी गाती गाणीं
फुलपांखरें गोजिरवाणीं
खऱ्या जरीचें रेशिम नामी
पंख फुटुनिया या आरामी
फुलाफुलांचे उडते जीव
इकडुनि तिकडें घेती धाव

कारंजातुनि पुष्पें भरुनी
उधळित वरवर शतधारांनीं
भासे, दावुनि अभिनव वैभव
वसंत करितो कुसुम महोत्सव
प्रीतिदूत हे फुलाफुलांचे
पोचवित संदेश प्रीतिचे
फुलाफुलांच्या लागुनि कानीं
गात मधुर आश्वासन गानीं
प्रभातच्या मृदु प्रभाप्रकाशीं
उडत बागडत नव अवकाशीं

पसरत पुष्पित वितान वरती
फूलपाखरें फेरे फिरती

गिरिशिखरांवर खळखळतें जळ
शतधारांनी वाहे निर्मळ
कड्यां कड्यांहुनि उड्या घेउनी
फेनधवल ह्या गिरिनिर्झरिणी
इकडुनि तिकडे घालिती फेर
कुंजा कुंजांतुनि चौफेर
बालरवीचीं तिरपीं किरणें
रेखित तनुवर अभिनव लेणें
त्या हर्षाचा फेस रुपेरी
उसळत वरवर उंच अंबरीं

हासत नाचत तरल तरंगिणी
शांत संथ वाहते वनांतुनि
या क्षितिजाहुनि त्या क्षितिजावर
वसुंधरेला घालित फेर.
उधळित मंगल तरंग माला
स्नान घालिते वनदेवीला

इकडे रविचें बिंब अंबरीं
उसळुनि आलें उदयगिरीवरि
इकडे किरणें अनुरागांत
कमल–कळ्यांशीं खेळत खिदळत
झुलवुनि त्यांना सलिल तरंगें
नेते तटिनी अपुल्यासंगें
बिंदू–बिंदूतुनि अनंत
अनंत रविबिंबें प्रतिबिंबत
सलिल–तरल ते मुकुर बिलोरी
अरुण किरण त्यांतुनि चौफेरी

हृदयंगम तीं परावर्तनें
दिगंगनांची उजळिति वदनें

गंभीर वाहे तटिनी–स्रोत
जणुं का रजत–रसाचा झोत
गगनीं अथवा फुटला बांध
तटिनि–तटांतुनि वाहत सांद्र
रविकिरणांचा चुरा रुपेरी
उजळित दिङ्मंगल चौफेरी

निळ्या नभाचे ठसे रेखुनी
स्वर्ग संपदा भूवरि आणी

वनांतुनि नवविकसित सुमनें
मृदुल जलावर झुलति मजेनें
मोती देउनि फुलें घेतलीं
सलिलाच्या शेल्यांत वेचिलीं
तऱ्हेतऱ्हेचीं तीं वनसुमनें
सरस रेखुनी चातुर्यानें
नयन मनोहर गुंफुनि झेला
जलधिस जाते ही गिरिबाला

तरंग–चंचल नौका हालें
फुलवंती ही त्यावर डोले
जलांत खेळत ह्या एकान्तीं
कुसुम सुकोमल वनवासंती
लाजलाजऱ्या मुरडत ठुमकत
निळ्या प्रवाहावरतीं चमकत
मृदुल विमल ते गुंफित नामी
रविरश्मींचे गोफ रेशमीं
इकडुनि तिकडे चंचल चरणी
फेरे फिरती सरस नर्तनीं

प्रसन्न आलापीत भोवतीं
प्रीतीचे संगीत प्रभाती
फुलाफुलांना हसवित गालीं
भ्रमर लाडका रुंजी घालीं
सरस हृदयिंचा हर्षनिधान
मृदुलभुजांचा बंदीवान
प्रीतीच्या कंठातील ताइत
भ्रमर खेळतो फुलांफुलांत
मुग्ध मुखांचे स्निग्ध विलोकन
सलज्ज गालीं सस्मित चुंबन
नव नवे नवलांचे खेळ
खेळत गोपीसह गोपाळ

वाऱ्यारचा वारु रवीचा
मागें टाकित पथ गगनाचा
दोरीवरुनी सुटला तीर
उफाळला भरधावत चौखुर

कृष्णेनें आवरली माया
इंद्रजाल ते गेलें विलया
नजरबंदिचा फाटुनिया पट
उघडें झालें काळें कपट

दीपमाळ मायावी गगनीं
तीही फुटली रविपद पडुनी
मोहनिद्र ते नयन उघडले
जीवांना संजीवन आलें

नवतेजाची गंगा आली
प्रसन्न मंगल धरणी न्हाली
पिवळें कवळें नाजुक ऊन
पुसट पसरलें उंचावरुन

कुठे फुटुनिया चहुबाजूंनी
प्रकाश भरला सदनोंसदनीं
जागीं झालीं सहस्र शयनें
शयनांमधुनी विकसत नयनें
काळें काजळ पुसुनि निघालें
नयनीं मंगल भाव उमटले

काळी चंद्रकळा रजनीची
मिटुनी फिटली दृष्टी पुढची
लख्ख पसरला चहुंबाजूला
जरतारीचा विणला शेला

ब्रम्हांडाचें मंगल झालें
परमेशाचें रूप उगवलें
कभिन्न काळा सरला धाक
उलथुनि पडलें भीम भयानक

दिगंत झाली राक्षसवेळा
सकल देवपण झालें गोळा
घुबडांचें साम्राज्य संपलें
शुकपिक मिळुनी गाउं लागले
कलकल अशिव शिवांचा सरला
एक तान दशदिशा मंगला

प्रसन्न मंगल वनें उपवनें
प्रसन्न मंगल हीं भू-गगनें
जिकडें तिकडे स्नात सुमंगल
दृश्यें भरलीं पवित्र मंजुळ
मुखांमुखांतुनि प्रात:स्मरण
गृहांगृहांतुनि संध्यावंदन

जागृत झालीं देव देवळें
भक्तिरसाचें ध्वनी मोकळे
लाख उजळल्या शुभ पंचारति
मांगल्याच्या घंटा गर्जति
फुलांफुलांचे शिवपिंडीहुन
रचिले उंच उंच गोवर्धन

किततरी भाविक भावभक्तिनें
प्रात:समयी करुनी स्नानें
शिवनामाचा करीत गजर
शिवालयाला जाती सत्वर
कितिक भक्तजन धरुनी फेर
प्रदक्षिणा घालिति चौफेर
कितिक बैसले ध्यान लावुनी
स्वस्थ शांत परमेश चिंतनीं

ब्रम्हपदीं लय लावित गेले
स्वयेंच केवळ ब्रम्ह जहाले
तेजोनिधिसे शंकरमूर्ती
जगास पावन करति प्रभातीं

पाप जगाचे धुवुनि निघालें
मांगल्याचें पर्वच आलें
नव विभवाचा नव आशेचा
नव्या नव्या शुभ आकांक्षाचा
भाग्यरवी चढतीस लागला
डोळ्यांपुढतीं प्रकाश दिसला

पवित्र झालें मंगल झालें
मांगल्याचें तेज पसरलें
चराचरांचें मंगल गायन
बालभानुचें प्रात:स्मरण
चराचरांचें मंगल ध्यान
बालभानुचें प्रातर्दर्शन
चराचरांचें मंगल वैभव
बालभानुचा पूजा गौरव
सकलांचें सर्वस्व समर्पण
बालभानुचें पूजन अर्चन

मिटल्या होत्या वृत्ति कमलिनी
त्याहि उगवल्या सूर्यदर्शनीं
त्यांचे वेचुनि रेणू मंजुळ
हार गुंफिला प्रभात मंगल
त्या हाराची ओंजळ भरुनी
अर्घ्य बालभानूच्या चरणीं

◆ ◆ ◆

११।५।१९२४

# ४५. विजयोत्सव !

(वसंततिलका–वृत्त)

(१९१४ ते १९१८ च्या पहिल्या युरोपीय महायुद्दाच्या शेवटी भारतात झालेल्या विजयोत्सवास अनुलक्षून बोबड्यांनी प्रस्तुत कविता लिहिली होती. 'विजयोत्सव' हे शीर्षक अर्थात् आमचे आहे. बोबड्यांच्या राष्ट्रीय कविता देखील किती प्रतिभासंपन्न व आवेशपूर्ण असत त्याचे प्रत्यंतर म्हणून हे दोन नमुने दिले आहेत. ––संपादक, 'वागीश्वरी')

पोटास लागति कळा अमुच्या भुकेनें
हे नाच रंग तुमचे विजयोत्सवानें
पोटास भाकरहि दुर्मिळ ज्या प्रजेला
त्यांच्यापुढें मिरवितां विजयोत्सवाला ?

जेथें प्रजा सकल ही पिळुनी निघाली
प्रत्यक्ष ती अवदसा अवतीर्ण झाली
जेथें पसाभरहि दुर्मिळ होति दाणें
तेथें विलास तुमचे विजयोत्सवानें ?

आम्हांस नेउनि बळें समरांगणांत
अग्नीत लोटुनि दिलीं शरिरें क्षुधार्त
तोफेस अस्थि अमुच्या–जय हा तुम्हांला
आम्ही क्षुधार्थ बघतों विजयोत्सवाला ?

साम्राज्यरक्षणमिषें गृहिणीजनांचे
आम्ही दिलें स्वकरिं मंगळसूत्र साचें
आता विलास करितां विजयोत्सवाचे ?
आहे तरी स्मरण कां अमुच्या क्षुधेचें ?

विष्णुस्वरूप अमुचा नृप सार्वभौम
सर्वस्व वाहुनि तयास करूं स्वधर्म

राजास रक्षण न का उचित प्रजेचें !
आहे बल प्रकृतिरंजन हे नृपाचें

राजा ! तुला विदित का तव तीस कोटी
हिंदी प्रजा विकल नित्यहि अर्धपोटीं
निःशंक ठेवुनि आम्हांस तसेंच कैचे
हे नाचरंग करितां विजयोत्सवाचे ?

धर्मच्युत प्रकृतिच्या शिरि राजदंड
राहे सदैव तव जागृत तो प्रचंड
तूतें परी भय नसे अपुल्या प्रजेचे
नीतिप्रमाद असले म्हणुनी सदाचे

कष्टार्जित द्रविण मेळवुनी प्रजेनें
राजा ! तदंश तुजला करभार देणें
आम्हीं करूनि उपवास तुम्हास द्यावें
त्याचे तुम्हीं दुरुपयोग असे करावे ?

आम्हांस काय असल्या विजयोत्सवाचें ?
पाठीस पोट अमुच्या भिडतां सदाचें
अप्राप्तकाल बघुनी तुमचे विलास
द्वेषाग्नि जाळित निरंतर मानसास

प्रासाद गोपुर विलास गृहें त्यजूनी
ये, झोपड्यांतुनि पहा, स्थिति लोचनांनी
कांहीं तुला हृदयलेश जरी असेल
होऊनि छिन्न नयनांतुनि ते गळेल !

सारा दिन श्रम करूनि निरर्थ झाले
पोटास पोटभर अन्न नसे मिळालें
बाळें लहान बहु व्याकुळ तीं भुकेनें
माता तयांस निजवी बघ वारि-दानें

दारिद्र्य पीडित कसे जन हिंद-देशीं
वर्षानुवर्ष निजतात पहा उपाशी
साम्राज्य हें तव, तुझीच पहा प्रजाही
चित्तीं स्मरें क्षणभरी नृपधर्म कांही

तोफेस होइल शरीर वश प्रजेचें
नाहींत यत्न परि हे मन जिंकण्याचे
सामर्थ्य हें तव वृथा न टिके क्षणैक
उद्विग्न हे जर नृपा ! सगळेच लोक

साम्राज्य हें स्थिर नसे तुझिया सुखानें
साम्राज्य हे स्थिर नसे विजयोत्सवानें
जेथें प्रजा सकल पूर्ण सुखांत आहे
साम्राज्य तें स्थिर नृपा चिरकाल राहे !

तुझेच लोक तुजला बघ वंचितात
नानापरी अहित ते तुज सांगतात
द्यावें प्रजेस सुख तर्पुनि अन्नदानें
तेथें विलास करिती विजयोत्सवानें

चिंता अहर्निश आम्हां तनु-धारणेची
वाटे तुला महति ही विजयोत्सवाची
ही का प्रजाहितपरायणता म्हणावी ?
कैसी प्रजा मग तुला अनुरक्त व्हावीं ?

जीवावरी प्रकृतिच्या सगळे विलास
सारी प्रजा पिळुनि भोगितसा सुखास
पोटास भाकरहि दुर्मिळ त्या प्रजेला
झाली, तरी करितसां विजयोत्सवाला ?

होतें समस्त विधिसूत्र जसें असेल
जैसें कराल परिणाम तसा घडेल
होतां प्रजेस सुख देइल ती सुखाला
नाहीं तरी–गहन कर्मगती नृपाला !

वागीश्वरी वर्ष ५, विलास ७
बोबडे विशेषांक 'समाधीवर फुले'

# ४६. गडि मर्द मराठा वीर

(चाल–पोवाड्याची)

गडि मर्द मराठा वीर । गाजला रणीं रणधीर
होऊन वारुवर स्वार । चालला अटकेच्या पार जणुं कमठ्यावरचा तीर

सूर्योदय कावेरीचा । सूर्यास्त सिंधुतीराचा
भाल्यावर अरि झेलीत । ढालेंत विजय वेचीत
फडकावित भगवा झेंडा । दिल्लीचा फोडीत बेडा
चालला मराठा स्वार । दशदिशा धाक अनिवार
हरहर महादेव हरहर । जयघोषें गर्जे अंबर

पिळदार मिशी मर्दानी, चमकला रणीं,
शूरांचा शूर । गडि मर्द मराठा वीर

मराठ्यानच जंग लढावा । मराठ्यानच जय मिळवावा
मराठ्यास शोभे तरवार । मराठाच पराक्रमी वीर
मराठ्यानच कीर्ती केलीं । मराठ्यासच श्री वश झाली
मराठाच रवीची ज्योत । गनीम ते सर्व खद्योत
मराठाच चमकला हीर । गनीम ते सारे फत्तर

धडक मराठी भारी, चालली स्वारी,
कुणिहि द्या समर । गडि मर्द मराठा वीर

मोंगलास केलें धुळधाण । पळविला नीच पठाण
निजामास दाविला हात । टिपु सिंह चरण चाटीत
मुंबइचा टोपीवाला । लोटांगण घालित आला
'सैतान खडा लढनेको । या खुदा बचावो हमको
यह आज बचावो जान । नहि होना हिंदुस्थान'

कापिले शत्रुसंभार । कुणि उरे न द्याया खबर
मराठ्यांची नौबद वाजे । भूगगन एकदां गरजे

शौर्याची मेरूमणी, वीर नर–मणी,
खडा खंबीर । गडि मर्द मराठा वीर

भाल्याची चंचल फेक । फेकीत रोखुनी रोख
करि उडती चिडिया ठार । क्या बिशाद घोडेस्वार ?
समशेर मराठ्याचीच । काळाचा नंगा नाच
चम् चम् चम् म्यानांतून, । निघतांना दिपती नयन
'वारावर घे घे वार । चल उतर फिरंग्या ! शीर'
बिजली जशि अस्मानांत । कडकडुनि घुसे पृथ्वींत
तसे घोड्यासह स्वारांचें । दशदिशांस बळि व्हायाचें

मराठ्याचा करीं चमकल, धन्य तो भाला
धन्य समशेर । गडि मर्द मराठा वीर

देवांचे हे अवतार । गडि मर्द मराठा वीर
उतरण्या धरणीभार । अवतरला देवसंभार
तो धन्य धन्य शिवराय । अवतार शिवाचा होय
म्लेंछांचा कर्दन काळ । हा प्रताप रवि तेजाळ
प्रत्यक्ष सांब त्रिपुरारी । शिवराय शत्रूला भारी
तो धन्य धन्य तो काळ । जाहले देव भूपाळ

गर्जले वीर रणगाजी, शूर शिव, बाजी
धन्य संसार । गडि मर्द मराठा वीर

संपले दिवस शूरांचें । संग्राम धीर वीरांचें
ते दिवस मुलुखगीरीचें । ते दिवस मराठे मर्दांचें
ते दिवस देशनिष्ठेचे । ते दिवस राजनिष्ठेचे
महाराष्ट्र विभव सूर्याचे । ते दिवस अभिमानाचे

ते दिवस कधिंच मावळले, शौर्य तें लपलें
लोपले शूर । गडि मर्द मराठा वीर

◆◆◆

चित्रमयजगत् जुलै १९२०
आणि
वागीश्वरी वर्ष ५, विलास ७
बोबडे विशेषांक 'समाधीवर फुले'

# ४७. उन्नति झाली। श्रीमंता गरिबी आली

(चाल–फुलें वेचीतीं)

उन्नति झाली । श्रीमंतां गरिबी आली ।।धृ०।।

गेला धन दौलतिचा माज । भूषण–वस्त्रांदीचा साज
झाला विनयशील आवाज । हरिकृपा झाली ।।श्रीमंता०।।

पुष्पास्तरणीं निजून शिणला । परसेवेनें अजवर विटला
देह खपे तो सत्कार्याला । पुण्यें फळलीं ।।श्रीमंता०।।

आजवरी जे कनकमदानें । नयन धुंद खोटचा अभिमानें
आतां त्यांस हिताहित माने । झापड गेली ।। श्रीमंता० ।।

पापें अगणित करुनि नासला । सत्कार्याला अपात्र झाला
दान पुण्यकर करूं लागला । शुद्धी झाली ।। श्रीमंता० ।।

वाहन गाडचा घोडे चढुन । पाय जहाले जे बलहीन
गेला त्यांचा आळस झडून । शक्ति मिळाली ।। श्रीमंता० ।।

भ्रष्ट जहाले अपशब्दानें । आत्मश्लाघा परनिंदेनें
तत्ववाद त्या आतां मुखानें । पापें गेलीं ।। श्रीमंता० ।।

स्वार्थी हेकेखोर मिजासी । दुष्ट पापमय नीच आळसी
वागे तोच नमुनि सर्वांसी । अनाथ वाली ।। श्रीमंता० ।।

देवा ! देशिल जरि श्रीमंती । देउं नको त्यातिल आपत्ती
रुचे त्याहुनी गरिबी चित्तीं । योग्यता कळली ।। श्रीमंता०।।

काय धनिक भक्षितात सोनें । गरिबांना का मृत्यु भुकेनें
दोघां जाणें त्याच पथानें । गरिबी रुचली ।। श्रीमंता० ।।

◆ ◆ ◆

# ४८. पोवाडे

लोपले शौर्य वीरांचे पोवाडे गावे कोणाचे ?
जंगली वीर समशेर पोवाडे गावे कशावर ?
लोपल्या रणींच्या वार्ता पोवाडे कशाचे आतां ?
संपले विभव देशाचें पोवाडे गावे कोणाचे ?
स्वर्गवासि नाना भाऊ पोवाडे कुणाचे गाऊं ?
स्वर्गातच तो शिववीर पोवाडे अतां कुणावर ?

ते दिवस संपले गेले । वीर लोपले
लपले शाहीर पोवाडे गावे कुणावर ?

पोवाडे स्वातंत्र्याचे पोवाडे स्वराज्याचे
पोवाडे नररत्नांचे पोवाडे राजमुकुटांचे
पोवाडे रणधीरांचे पोवाडे मराठे मर्दांचे
पोवाडें राजसेवेचे पोवाडे देशभक्तीचे
कामास येति देशाचे पोवाडे त्या तरुणांचे

लोपले सर्व नरमणी । लोपले म्हणुनि
सर्व शाहीर पोवाडे गावे कुणावर ?

हे दिवस-पूर्ण सौख्याचे हे दिवस आरामाचे
हे दिवस लेखणीचे स्वराज्य भीक मागायचे
हे दिवस वक्तृत्वाचे ठराव पास करण्याचे
हे दिवस सहानुभूतीचे हे दिवस शिष्टाइचे
हे दिवस अनुकरणाचे हे दिवस वृत्तपत्रांचे

यांच्यावर गाउनि गाणीं । शिणवुं का वाणी ?
भूमिला भार पोवाडे गावे कोणावर ?

गोऱ्यांची सत्ता चाले    अधिकारी टोपीवाले
शौर्यास नसे अवकाश    हो दीन दरिद्री देश
जरि कांहिं मिळेल नौकरी    पोटास तरिच शिदोरी
ना मान सर्व अपमान    राबावे रात्रंदिन
झेलावी मर्जी सरकारी    मिळवावी राय बहादुरी
देशांत अवदसा आली    देशाची खराबी केली

आतां कुठुनी स्फूर्तिच्या लहरी । पोवाडे कुणावरी
गाऊं कोठून    पोवाडे करूं कुणावरून

◆◆◆

# ४९. संदेश

(माय–लेकांचा संवाद)

प्रेमानें चुंबुनि बाळा । सांगते माय लडिवाळा
'ही पहा लेखणी पाटी । आणविली मी तुजसाठी
बघ कसें छान नवलाचें । पुस्तक हें तुज चित्रांचें
ये इकडे बघ ये वेल्हाळा ! । गोविंदा रे गोपाळा !
राजस मम बाळ गुणांचा । दे मुका एक मायेचा

घेऊनि-लेखणी पाटी
शाळेंत जाइ जगजेठी

शाळेंत जाइ रे बाळा ।' सांगते माय लडिवाळा

'शाळेंत काय असते ग । पुस्तक हें कसलें सांग'
ऐकुनी बोबडे बोल । सांगते माय लडिवाळ
'शाळेंत किती नवलाई । किति चित्रें ठायी ठायी
पाळणे किती गमतीचे । किती खेळ नवे नवलाचे
किति मुलें येति त्या ठाया । मौजेनें गाणीं गाया
शिकुनिया शाहणा व्हाया । शाळेंत जाई रे राया !
पुस्तकात किति मौजेच्या । काहण्या चिऊ काऊच्या

होऊनी पुढें विद्वान
रुपयांची रास रचून
फिरतांना गाडींतून

तुज पाहिन अपुल्या डोळां ।' सांगतें माय लडिवाळा

तो बाळ पांच वर्षांचा । संदेश बोलतो वाचा
'जाणार नाहि' शाळेतें । मज नकोच शाळा माते !

मज नको लेखणी पाटी । दे घोडा स्वारीसाठी
मज नकोच पुस्तक भार । दे आणुनि मज तरवार
मज नको पाळणें खेळ । मी फिरेन रानो–माळ
देशाच्या पडत्या काला । सावरील का ही शाळा !
शाळेची करुनी वारी । कधिं कोण देश उद्धारी
विद्वान नको मज व्हाया । मज नको वाद घालाया
मज नको लेखणी भार । जाईन मुलुखगिरीवर

घेऊनि करीं समशेर
सांडवून अरिचें रुधिर
या आर्यभू–तलावर

इतिहास लिहाया शिकवी । माते ती शाळा दावी '

विश्वरूप दर्शन देतां । हरि, भुलल‍ि यशोमति माता
तो लहानसा जरि बाळ । अग्नीचा तेजोगोल
ते दिव्य बोल बाळाचे । संदेश बोलिला वाचे
जाहले आजवर फार । देशात लेखणी–वीर
आज हा दिव्य संदेश । पाहिजेच ऐकायास
टाकील भेदुनी गगनें । अधिकारयुक्त वाणीनें
एकटा वीरवर ऐसा । दे धाडुनि रे जगदीशा

निद्रेची रजनी सरली
आशेनें वृत्ती भरली

होईल उदय निमिषांत । हें चंडोलाचें गीत

◆ ◆ ◆

# ५०. हरवले माझे पिंपळपान

( चाल–तूं माझा यजमान )

हरवलें माझें पिंपळपान ।।धृ।।

कुठें सांडलें कोणी नेलें माझे पिंपळपान
एकच होतें मजजवळी तें केवळ माझा प्राण
ठेवित होतें अपुल्या हातें कसें विसरलें भान
आनंदाचें मत्प्रेमाचें होते एकच स्थान

केल्या ज्यावरि आशा बहुपरि धरिला बहु अभिमान
राजस माझें लेणें साजे नसे जया उपमान
कुणास दिसलें कुणा गवसलें माझें हर्ष निधान
दे रे सागरा ! दे रे अंबरा ! माझा पंचप्राण

तरुलतिकांनो ! गिरि गुहरांनो ! द्या मज माझें दान
न लगे माणिक न लगे मोती । नको हिऱ्यांची खाण
बंधु भगिनीनो ! वनदेवीनो ! घाला पदरी वाण
कां येईना कुणास करुणा मजसि न उरलें त्राण
हें जन्माचें वेड जिवाचें माझें पिंपळपान

हरवलें माझें पिंपळपान

◆◆◆

# ५१. अभिनंदन

(चाल–चंद्रकांत)

लाख लाख मोलाचें सखया दिव्य तुझे बोल
स्वर्गलोकिची सुधाधार ही प्रसन्न अनमोल
हिऱ्यामाणकां मोत्यांचें हें भरलें भांडार
मोल तयाचे सुवर्ण द्यावें भूभारोभार

सरस्वती शारदा देविचा प्रेमळ तूं बाळ
तुला खेळवी मांडीवरती माता लडिवाळ
प्रसाद तीचा स्फूर्ति तूझी हे दैवी संधान
तुझ्या वाणिचें मोल करावें केवळ अज्ञान

अनमोलाचें मोल कशाचे कशास तुज चिंता
भगवंताचे देणें हें करि अर्पण भगवंता
हृदयाचे हे बोल तयाचें मर्म हृदय जाणे
या बोलांचे मोल करावें कसें सुवर्णानें ?

निरभिमान निर्मळ हृदयाचें प्रसन्न संगीत
अनमोलाचें मोल प्रेमळ हृदयाचा प्रांत
एक शब्द तव घुमतां होतो हृदयाचा डोल
मोल अशा शब्दाला एका विश्वाचा गोल

जसा पारखी तसे मोल रे ह्या अनमोलाचें
मोल नसे अनमोलाचें, तें मोल पारख्याचें
असता राजा–भोज, कवीचा भाग्यालंकार
करिता मोल तुझ्या बोलांचे देऊनि भांडार

कर्णाचे अवतार संपले कविता-श्री गेली
लक्ष लक्ष होनांची वार्ता कीर्तिशेष झाली
रसज्ञतेचें तुलसिपत्र मग घेऊनि आनंदें
रसिक जनांचें लेणें लेववि रसिकां स्वच्छंदे

स्वार्थपरायण वैश्यवृत्तिच्या प्रचंड कलहांत
अनमोलाच्या मोलाचि परि बोलुं नको मात
मोत्याचा पाऊस वर्षला रसिकांच्या दैवें
मला गमे अनमोल सांगतो ऐक सख्या ! भावे

◆◆◆

## ५२. वचन भंग

जरि असेंच मानस होतें
कां दिलेंस विश्वासातें ?
लोटण्यास चिरविरहांत–
कां केलिस मजवर प्रीत

प्रेमांत मला गोविले
प्रीतिचे धडे शिकवीले
लोटण्यास चिरविरहांत सखे ग !
कां केलिस मजवर प्रीत

'इकडच्या चरणिंची दासीं
राहीन सदा चरणासी'
यापरी देउनि वचन सखे ग !
मोडलीस अपुली आण

गुंतलीस अपुल्या वचनी
गुंतलों मीहि बहुपरिनीं
मोडलीस परि ती आण सखे ग !
दृष्टभेट केलिस कठिण

हृदयेश्वरि झाली दासी
हृदय हें साक्ष हृदयासी
विसरलीस का ती आण सखे ग !
दृष्टभेट केलिस कठिण

संपले दिवस सौख्याचे
चोरट्या आणभाकेचे
दृष्टभेट केलिस कठिण सखे ग !
मोडलीस अपुली आण

निद्रा मज सोडुनि गेली
चहुकडे निराशा झाली
पारखें होय घरदार सखे ग !
पारखा सकल संसार

तूं तिथे विरहकृश व्हावें
मी इकडे झुरत बसावें
किति विषमय कटु नियती ही सखे ग !
अंगाची झाली लाही

आठवी अजुनि तरि नीट
दृष्टीची पहिली भेट
जादूची अद्‌भुत करणी-जाहलें
हृदयाचें पाणी पाणी

प्रणयाचे गाउनि पाठ
बांधली रेशमी गाठ
मोकळे शीड भरधांव-सोडली
दर्यावर भरली नाव

'कधी भेटल प्राण विसावा
कां बरे उशिर अजि व्हावा'
क्षणभरीं पडेना विसर-रुचेना
दृष्टीआड होणें दूर

चोरट्या हृदयिंच्या गाठी
चोरट्याच भेटी गोष्टी
दैवानें केला घात-उडाला
राघू तो हातोहात

खिडकींत आपुल्या अपुल्या
घटकांवर घटका गेल्या
एकमेक पाहात वाट-बैसलों
दृष्टीची घ्याया भेट

पौषाचे सेवित ऊन
मी आपुल्या सौधावरुन
राहुनी उभी अंगणी-आपल्या
संकेत करिसि नयनांनी

वाटलें गांठ जन्माची
वाढली उडी आशेची
निमिष एक गेला हाय-दिसेना
होतें तें झालें काय

सुखशिखरी तेव्हां होतो
तेव्हांचा प्रेमा तव तो
तीं फुलें वेचुनी झालीं-आतां
कंटकमय धरणी उरली

## ५३. गंगास्तव

(वृत्त–मंदाक्रांता)

मातर्गंगे ! भुवनजननी ! धन्य माहात्म्य तूझें
विश्वामध्ये तुजसी उपमा कोणती अन्य साजे
ऐश्वर्याने शयन करूनी आर्यभूत्संग–देशी
आनंदाने हसुनि हसुनी तीस आनंद देशी

का ही तूझी जननि ! विमले ! प्रेमला आर्य माता
का हा तूझा गिरिवर असे तात गे जन्मदाता
त्यांचा प्रेमें करुनि धरुनि घेऊनीया निरोप
जाता रत्नाकर––पतिगृहि मोद होतो अमूप

लीलामंद द्विरदगतिनें चालता नूपुराचा
होतो नाद श्रुतिमधुरसा सुन्दरी काय साचा
किंवा ऐसा पति तुज गडे ! यत्कृपेनें मिळाला
त्याला मोदे मधु मधुरसें गासि गाणें प्रभूला

क्रीडोद्याने उपवन वने मार्गि तूझ्या अनेक
तूझ्या मार्गावरति करिती थंड छाया अशोक
कुंजाकुंजातुनि करित तूं हर्ष गुंजारवातें
स्वच्छंदाने भ्रमण करुनी देसि शोभा तयातें

तीरोपान्तीं फुलुनि विलसे मोहराने रसाळ
प्रेमे तूझ्या बकुलहि गळां घालितो पुष्पमाळ
सौगंधाने भरुनि तरु हा सोनचाफा दिगंत
येथे तूझें उधळुनि फुलें स्वागताला करीत

शोभे चैत्रस्फुटित कुसुमे लालरंगी पलाश
सौन्दर्याने सतत करि जो भृंगसंघा निराश
तोही देतो तव करि तव प्राणनाथास भेट
त्याची माळा स्वकरिं पतिला गुंफुनी देइ नीट

सारे बंधू भगिनि तव हे प्राणनाथा कडेस
जातांना गे ! बघूनि तुजसी दाविती गौरवास
तूंही गंगे ! सरसहृदये ! प्रेमगंगे! शुभांगी!
या सर्वांचे स्मरण पतिला देई जातांच वेगी

सारे बंधूजन परतले दूर आलीस तूंही
जाई चिंता मुळी न करिता शान्तचित्ते स्वगेही
आले तूझे पतिगृह तुझा पाहतो कांत वाट
माझे आशीर्वचन पतिला जाऊनी स्वस्थ भेट

◆◆◆

## ५४. माझ्या अंगणी

माझ्या ग अंगणी
फुलली तुळस
साजिऱ्या गोजिऱ्या
फुलल्या मंजिऱ्या

माझ्या ग अंगणी
वाढला गुलतुरा
वाढला गुलबास
सुटला सुवास

माझ्या ग अंगणी
चमके चांदणी
चमके चांदोवा
पडली ग आभा

माझ्या ग अंगणी
केवडा सुगंधी
आभाळा येवढे
लागले केवडे

माझ्या ग अंगणी
घातली रांगोळी
काढलें स्वस्तिक
पहा ग कौतुक

माझ्या ग अंगणी
नाचतो ग मोर
गोजिरं ग वाणे
वेचितसे दाणे

माझ्या ग अंगणी
फुलला मोगरा
फुलल्या फुलांनी
घातली ग वेणी

माझ्या ग अंगणी
बिलोरी आरसे
घातला मांडव
मांडिले पांडव

◆◆◆

विदर्भवीणा ६–११–१९३०

## ५५. बालगीत

माझें सोन्याचे पान
सुधाबाई माझी छान

चल ग सुधे खेळाया
गौरीचे गाणे गाया

मामी तुझा ग मधुबाळ
रडतो याला सांभाळ

पहा मोडतो हा अमुचा
खेळ मांडला गौरीचा

रामा ! जोडुनि पहा मजशी
सुधा मन्याहुन लहानशी

मी तव कानावरी मोठी
सिंधू सान्याहुन छोटी

सर्व ओळिनें उभे रहा
सिंधू माधव मौज पहा

आम्ही मोठ्या मोठ्यानें
गातो गौरीचें गाणें

◆ ◆ ◆

# ५६. महाकवि व अरसिक

(वृत्त-अनुष्टुभ)

‘अरे ! आला कवी ! आतां धावा ! धावा ! पळा लपा !
पाठीराखे स्मरा ! किंवा रामरक्षा तरी जपा !

कुण्या जन्मांतलीं पापें होतीं देउनिया दडी !
अचानक शिरी आली नेमकी कविची उडी

अरे धावा–पळा ! भाई ! –वळला इकडेच तो
भरली घटका आतां मढीं जीवंत गाडतो

काय रे दिसतें हाती ? अरे काव्य ! कवी–कवी
पा–णी–त–री–कु–णी–पा–जा कविता दिसते नवी

दोस्तांनो ! सहवासाचा झाला आनंद अंतरीं
जगल्या वाचल्या भेटूं आतां कोठें कधीं तरीं

तूं कोण ? कविखद्योत ? कवि गोगलगाय वा ?
कसाही कोणिही आम्हां कवि वंद्य जुना नवा

परी केलें तुझें काय ? गेलो वाटेस का कधीं ?
साडेसाती कशी आली कोवळया यौवनामधीं ?’

‘करितां काय कंटाळा ?–चोरांना हात दावितो
समग्र हे महाकाव्य मासिकांतुनि कोंबतों

असें नाहीं तसें यांच्या मानगूटीस बैसुनी
वाचावयाला लावीन काव्य हें मासिकांतुनी’

◆◆◆

किर्लोस्कर खबर १९२३ (?)

## ५७. प्रणयाच्या तीन अवस्था

युवा, युवतिदाक्षिण्य संपादित पराक्रमें
लीला–विलास–चातुर्य–प्रणयानुनय–क्रमें
हासवी मुग्धवाणीने नाचवी स्निग्धलोचनीं
प्रीतीच्या अभिषिक्तांचें साम्राज्य कुसुमासनीं

पणिनो थाटामाटानें प्रौढ कोमल बालिका
जुनें कुल जुनें शील सांगुनीं नांव–लौकिका
मुहूर्त पाहुनी शय्या; नाडी दावुनि चुंबनें
मंत्र–ताईत–पाकांनीं जागवी प्रीति–लक्षणें

पुस्तकां वृत्तपत्रांच्या वाद–वाचन–शिक्षणें
जांभया देत प्रौढाची प्रीती मिटत लोचनें
तपोज्ञानवयोवृद्ध मुत्सद्दी थोर शाहणा
रुळला घोळला नीट सुकला पिकला जुना

गिरी–वाराणशीमध्यें मध्यस्थांच्या शिफारसी
दातांचें 'सट', केसांचा रंग, डोळ्यांस आरशी
वाटुनी घोटुनी लाळ करितो कोड कौतुक
सोन्यरुप्यांत पोरीचें मढवीत शिखा–नख

मधेंच खोकला आला उराचे दुखती सर
कोसळून पडे प्रीती डोळे होतात पांडुर
पाठीराखा समाजांत, मोटारीतील सोबती
कुंकवाचा धनी, पत्रव्यवहारांतला पती

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ३, विलास २

## ५८ विडंबन

पतीच्या वयमानाशीं व्यस्त कामिन्यनुग्रह
जैसा–जैसा पति प्रौढ–नवनारीस दु:सह

तुटले दांत, फुटले डोळे, केसहि खुंटले
फाटले चित्त, प्रीतीचें हृदय-स्नेह आटले

'हा कोण?' सखये बाई माझा बाजार मास्तर
सुखार्थ झटतो माझ्या पगाराविण चाकर

माझे बुजवितो न्यून आल्या गेल्यास सोडुन
अधिकारी निरोपांचा घरीं दारास राखण

सांगितलेल्या कामाचा दिलेल्या तुकड्यावरी
कुंकवाचा धनी माझ्या खाजगीवर 'चौधरी'

येशील तर ये बैस जाशील तर जा सुखें
सलामत शिरासाठीं पचास पगडी विके

सोन्याची पुतळी पोर सोनें पेरुनि पणिली
देह गेला स्मशानांत उरली घरिं सावली

आढळे नार, बघतां नातवाकरितां स्थळें
चढले वृद्ध संन्यासी बोहल्यावरती बळें

आली आळ विवाहाची नावाचा पति जाहला
चितेच्या पूजनासाठीं सतीच्या आहुती दिला

'पतीचे फुटके कान–गुजगोष्टि कशा करू ?
आरशीच्या सुखासाठी शृंगार कसला करूं'

जीवाचा होय पाचोळा गात्रांचा होत खुळखुळा
प्रीतीची राखरांगोळी पत्नीच्या मस्तकीं टिळा

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ४, विलास ४

# ५९. 'प्रीति-विवाह'

"स्नेह्यांशी लडिवाळ लाडत घरीं, बाहेर मी चालतां
येता पाहुनि काव्य नाटक बळें वाचीत बैसे स्वता"

'येतें जाउनि तोंवरी क्षणभरी ठेवूनिया आधण
पत्रें टाकुनि या त्वरें-मज जरा छत्रीहि द्या आणुन"

,'माझी चिंच तुला नको-मज तुझा आंबा मुळीं नावडे"
,'घोडा घेइन मी अगोदर-सुखें घ्या म्हैस तुम्ही पुढें"
"मोलाचा भलता कशास तुजला पोषाख हा इंग्रजी"
"मी वाटेल तसें करीन-अथवा-पाहून घ्यावी दुजी"

दो वातावरणांतुनी उचलुनी एका स्थळीं लाविलीं
दोघेही विषवृक्ष, दोहिस नको दोघांचिही सावली
नाहीं ते भलतेच हट्ट भलतें नानापरींचें मत
येतो सांजसकाळ ऊत कलहा-ज्वालामुखी पर्वत-

बाजारांतुनि नीट आणुनि डबे कीं आपले आपण
दोघांचे मग दक्षिणोत्तरमुखें दो वेळचे भोजन

◆◆◆

वागीश्वरी वर्ष २, विलास १

# ६०. वैताग

वाटे भ्रांत मनास काहि न सुचे काहीं रुचेना कदा
खायाला घर धावतें म्हणुनिया बाहेर जातो सदा

अस्ताव्यस्त इतस्तता भटकुनी येतां फिरूनी घरीं
जातों चित्त निराश होऊनि पुनः बाहेर सत्वरी

बाहेरून घरीं घरांतुनि पुनः बाहेर वैतागुन
मी वेडांतच येरझार करुनी काढीत रात्रंदिन

जाऊं काय ? कुठें बसूं कुणि मला पाहील हासेल का ?
हा वाऱ्यावर जीव टांगुनि दिला दारीं घरीं सारखा

◆◆◆

वागीश्वरी वर्ष ४, विलास ३

## ६१. नाटकी पोर

वेणी घालाया केस
कपाळ कुंकुम शोभेस
दिधले देवानें तुजला
पार न तव सौभाग्याला

डोळे लाजुनि मुरडाया
चित्त चोरण्याला भिवया
बेसर घालाया नाक
खुले स्वरूपाचा झोक

गोंदुनि नटवाया गाल
कान शोभण्या कर्णफुल
हनुवटि द्याया प्रिया करीं
हरीकृपा तुजवरति खरी

एक चूक परि देव करी
मिशा तुला ह्या कशापरी ?
याहुनि देता कुचभार
होतीं काय बरें बहार

असो दिलें हे का थोडें
मुख तोडाया प्रीति विडे
प्रेमकथा वा करावया
हसावया वा रुसावाया

द्याया घ्याया मुके, मुख
तुझें तुला लखलाभ सुख
लपटायाला करपाशीं
तुला दिलें रे बाहूंसी

किंवा कंकण नादानें
हरावया प्रेक्षक भानें
छाती कंचुकि मिरवाया
गळा भूषणें सजवाया

चंद्रकळेकरितां काया
पद छुम् छुम् छुम् नाचाया
बृहन्नडेचें रूप नवें
सुंदर निर्मियलें देवें

पितापुत्र भाऊबहिण
समान तुम्हा सर्व जण
क्षणांत कांता क्षणीं पती
क्षणांत खालीं क्षणिं वरती

प्रेमदृष्टिनें जग बघतां
पैशाकरितां तनु विकिता
धन्य धन्य हें धन्य जिणे
मरणाहुनि बरवें जगणें

शिखंडि हे ज्या देशांत
नित्य नवनवे होतात
कशास चिंता विभवाची
साक्ष पंढरी–रायाची

तुमच्या कृत्यांनी देश
असाच राहिल अविनाश
चालू द्या गोंधळ तुमचा
प्रीतीचे रंगण नाचा

तुमचें समरांगण स्टेज
स्वराज्य, कुसुमांची शेज
करुनी प्रहार नयनांचे
लचके घेतां हृदयाचे

स्वदेश सेवा ही बघुनी
संतोषे भारत जननी
अखंड आयू तुम्हां असो
दिर्गति तुमचें दुरित वसो

◆ ◆ ◆

# ६२. योगी शिरोमणी

चौखुर आधारावर साधा सहनशीलतेचा अवतार
अंग झाडलें पुच्छ ताडलें पहिल्या फटक्याला तैयार

नको तनकडी नको झोपडी नको खरारा या अंगास
पाठीं पोटीं पर्वत राशी नको विसावा नकोच घास

या पायांना भुई पुरेना नाहीं संध्याकाळ सकाळ
पाहुनि खालीं खेपा घाली इकडुनि तिकडे रानोमाळ

किति रगडावें उजवें डावें ठरविल ज्याचें, तो कुंभार
सदाच पायावरतीं काया भार शिरावर भारोभार

अखंड पाठीवरतीं काठी लहान मोठीं समान त्यास
आले गेले पीळ उकलले हिशेव ठाऊक नाहि मनास

नसेच आशा नसे निराशा सुखदु:खाचा केला त्याग
'प्रभु' च्या पायीं वाहुनि घेई लोभही नाही नसेचि राग

तपोभ्रष्ट कुणि योगिशिरोमणि 'ढ' गावातूनि गर्दभरास
दुरचे दुरुनी सविनय वचनीं शरणचिठ्ठि विनशर्त तयास

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ४

(प्रथमावृत्तीत या कवितेचे नाव 'गर्दभराज' असे दिले आहे.)

# ६२. लग्न कचेरित नोंदुनि झाले

लग्न कचेरित नोंदुनि झालें, अनंत तपुनी तपें
परतलें मग प्रणयीं जोडपें

पडके छत मोडकाच मंचक चूल दिसेना घरी
चहुकडे चार जुन्या घागरी

फडताळाची दारें उघडी आ वासुनि धावती
आंतुनी पोतेरीं लोंबती

आंत उकिरडा भवतीं जंगल चंद्रमौळी झोपडें
गाढवे लोळतात चहुकडे

असेल हिरवेंगार पलिकडे प्रीतीचें मंदिर
आड हे वाळवंट खडतर

महाल माड्या असतिल तेथें दिवाणखाने नवे
बिछाने उंच उंच वैभवें

साज सरंजामासह असतिल चाकर नोकर घरीं
स्वागता जमतिल दारावरी

कपाळ फुटलें प्रीति उभीं डोळ्यावरी धावें जळ
मोडका मंचक पडकें स्थळ

प्रीतिस पहिला दिवस उगवला स्मशान–सीमेवर
गाढवें घुबडे दारावर

खेळ पाळणे, बाग बगीचे कुठेंच कांही नसे
ठेविले रस रचुनि कोळसे

बिनपंखांचे पक्षी सारे प्रीति–दूत योजिले
आंकडे अंधारी मोजिले

इकडुनि थापा तिकडुनि उत्तर बोल मृदंगी उठें
आंतला संशय आंतच फिटे

' राजकुळांतील कुमार कोणी ' ' राजकुमारी ' सर्वे
ठरवितो लग्नाचें गौरवें

राजपदाची धरुनी आशा स्वयंपाकिणी–सुता
चकविते 'राजकुमारा' स्वता

कुलवंताच्या कन्येसाठी पोर भटाचा झुरे
फसवुनी ' राजकुमारी ' हरे

फुगे फुगविले त्या रूपावर प्रीतिपाठ वाचुन
पाहिले डाव सहज टाकुन

डावासंगें डाव मिळाला दैवहि उपकारक
जाहली दैवाची पारख

मेहुण भोजन रस्तोरस्तीं यजमानांचें घरीं
टाकुनी सवळें खांद्यावरी

निराकार तें ' राज्य ' फुकाचें निर्गुण ' कुळ ' ही घरी
सगुण साकारचि भिक्षेश्वरी

अजुनि घागरी जुन्याच अजुनी चंद्रमौळि झोपडें
कोळसे तेच जुने चहुकडे

अजुनि नोंदली प्रीत बुकांतुन–सोनेरी अक्षर
कचेरित अखंड ते दप्तर

◆◆◆

वागीश्वरी वर्ष १, विलास ११

## ६४. अस्ताव्यस्त सौंदर्य

अंगाचा काजळी रंग रुपेरी केस डोईचे
घोटीव ते निळे गाल लाल आलोक दृष्टिचे

वाढलें पोट विस्तीर्ण वाळले कुचमंडळ
हाडांना फुटलीं टोकें मांसाचीं जीर्ण वाकळ

निर्माल्य नीट गालांचे फुलले फूल लोचनी
बाण बोथट डोळ्यांचे तीक्ष्ण वाग्बाण आननी

भीडस्त नाक वाटोळें कांटेरी दात पोवळे
सांवळे ओठ निर्भीड दक्षिणोत्तर चिंचुळे

डोळ्यांचे आटलें पाणी सुकला हृदयी झरा
स्वच्छंद दुथडी वाहे नाकां तोंडात पाझरा

पापण्या झडल्या झालें भिवयांवर टक्कल
नाकां–कानांत केसांचे वाढले दाट जंगल

प्रशस्त कुरळे दांत तंडतात परस्पर
कोवळे मोड केसांचे दाणादाण शिरावर

सांडले रूप–लावण्य अस्ताव्यस्त इतस्ततां
ओतिलीं मूस आफूच्या निशेंत विधिने स्वतां

◆◆◆

हिस्लॉप कॉलेज मॅगेझिन् १९२७ (?)

दा. क्र. 22५८८ 23८८

नाविन्यांत मजा तशीच पुनरावृत्तीत न्यारी मजा
आरंभांत मधे अखेरिस समारोपांत ही ती मजा
आहे यांत मजा तयांतहि मजा येथें तिथेंही मजा
आनंदोत्सव चातुरींतच मजा बाहेर नाही मजा ।।१।।

※

मी एकला फिरतसें बहुवार दारीं
या लागुनी न समजा मजला भिकारी
मी आपले तुणतुणें अपुल्या स्वरांत
लाऊनि गात जनरंजन हे करीत ।।२।।

※

ज्यांना हवें त्यास सदा उणीव
ज्यांना नको त्यांसच देत दैव
अशीच वाताहत या जगांत
स्थानागुणांची दिसते नितान्त ।।३।।

※

स्वर्गंगेच्या तरंगांत । आकाशाचे कुशेशय
मृगांक विलसे भृंग । तारका दंवसंचय ।।४।।

※

सदा कैदाशिणीला ही । हवा गोविंदसा पति
धटिंगणासहि वाटे । मिळावी जानकी सति ।।५।।

※

हजारो बाजारीं कविवर कवित्वास विकिती
'रसज्ञानों घ्या घ्या' म्हणुनि विनयानें विनविती
जरी त्यांना द्याया फुकट फुटकी एक कवडी
जगापाशीं नाही तरिहि कवि आयुष्य दवडी ॥६॥

### कशास गाणें–

कशास गाणें कशास नाच
सुवर्ण कोंदण करुनि जडविला काच न होतो पांच ॥

कशास डफ–ढोलकें तरी
पोकळ थापा बहुत गर्जना ढोल पोल अंतरी ॥

जुने पराक्रम जुनेच छंद
जुन्या घडीचा माल मिरविशी–पोटाचे हे फंद ॥

कशास बैठक शाहीरा
वाग्देवीचे अस्वल करुनी नेशी दारोदारा ॥

बिदागी कशास हवीरे तुला
सरस्वतीच्या अनुग्रहाचा विक्रय करिसी खला ॥

स्वतांच अपुली जाहीरात
ओवाळुनि आरती स्वतांला स्वतांच विचकिशि दांत ॥

औट घडीची फुंकर ही
बिन–पंखाचे पक्षी उडती त्यांत राम नाही ॥७॥

चित्तीं जरी हाव असेल मोठी
केव्हां तरी होईल खास खोटी
कधीं निराशाच नको मनाची
आशा तरी त्यागुनि दे सदाची ॥८॥

माया जरीं लावियली जनांत
लागे जळावें विरहानलांत
अनर्थ हा भावि टळावयाला
माया शिवूं देउं नको मनाला ॥९॥

✳

राशीं धनाच्या रचिल्या श्रमानें
दारिद्र्य येई विधि योजनेनें
टाळावया भावि अनर्थ ऐसा
उपाय की जोडुं नयेंच पैसा ॥१०॥

✳

जो उंच आकाशपथीं चढेल
तो खास एके दिवशी पडेल
पडूं नये हे जरि मानसांत
पृथ्वीवरी चाल सदा सुखांत ॥११॥

✳

## प्रीतीचा संसार–

अमुचा ! प्रीतीचा संसार
नलगे खाणे नलगे पाणी
चुलींत उंदीर फार ! अमुचा
बिन पंखाचे पक्षी उडती
अफाट दर्या पार ! अमुचा
चंद्रमौळि झोपडें स्मशानीं
"शिव पार्वति" अवतार ! अमुचा ॥१२॥

✳

नको बाहेरची शुद्धि आपले शुद्ध आपण
जसें तीर्थ जसा अग्नि शुद्ध तैसेंच साबण ॥१३॥

✳

जुने धान, जुनी पोथी, जुनें मध, जुना कवी
जैसे जैसे जुने होती तैसी गोडी नवी नवी ॥१४॥

✳

लंकापुरींत सोन्याच्या उदंड मिळती विटा
काळेंच करुनी तोंड दैव धाडीत मर्कटा ॥१५॥

✳

न हा शशी हें मुख सुंदरींचें
न व्योम हेंही कचभार तीचे
न तारका सुंदर पुष्पभार
न मेघ हे क्षौम सुशोभि चीर ॥१६॥

✳

सराव नसता कैसा दर्याव परतां तरूं ?
प्रपंच्याचा विपंचींत शांत स्वर कसा भरूं ? ॥१७॥

✳

कशास इहलोक हा जरि न सुंदरी सन्मुख
कशास परलोक वा जरि न अप्सरांचे मुख
तदर्थ नच वाचला नच तदर्थही वेंचला
तयास जगुनीं जगीं इहपरत्र आंचावला ॥१८॥

✳

ज्या दिशीं न सुहृदांसह गोष्टी
ज्या दिशीं न रमणी-मुख दृष्टीं
गीत-वाद्य-कविताहि न कांही
शून्य त्या दिशि दिशा मज दाही ॥१९॥

✻

गणोत मजला कुणी-कुणि बरें कुणी वाइट
म्हणोत अथवा कुणी विषय वासना लंपट
प्रसन्न दिसतां परी प्रणय-गोल गालांवरी
उफाळत तुफान तो हृदय-सिंधु अभ्यंतरी ॥२०॥

✻

न लाज नयनांतुनी, भिरभिरा बघे भोवती
नसे स्मित मुखावरी, खदखदां हंसे निश्चिती
नसे तनुवरी प्रभा, बहुत लादले दागिने
नसे सरस चित्तही, करित धीट संभाषणें ॥२१॥

✻

द्विरेफांची रसासक्ति सिहांचीं मुख-चुंबनें
अस्वलींचा दृढाश्लेष नागाची रतिबंधने ॥२२॥

✻

फुलवंती ही वृंदा-देवी जलवंती यमुना
स्वच्छंदाचे गाणें भरितें रसवंती मैना ॥२३॥

✻

कदा नेणों कट्टा उघडुनि, कदा घे विडि करीं
कधीं काडी ओढी कधि मग तया पेटवि तरी,
विड्यांचे काड्यांचे बघुनि तुकडे ते चहुंकडे
कळे धूम्रेशाचें अपरिमित सामर्थ्य उघडें ।।२४।।

※

**मच्छरान्योक्ति**

अत्तरदाणित अत्तर, गुलाबदाणित गुलाबपाणीही
माझ्या मच्छरदाणित निदानिचा मज प्रवेशही नाही।।२५।।

※

**स्फुट**

फुलें कुणाला वहायचीं तर पुढें समाधीवरी वहा
झरझर पाउल टाकित येतो तिथेंच त्याची वाट पहा।।२६।।

◆◆◆

वागीश्वरी वर्ष ५, विलास ७
बोबडे विशेषांक, 'समाधीवर फुलें

# शृंगार-संगीत

शृंगार संगीताची मूळ हस्तलिखित प्रत न मिळाल्यामुळे कै. बोबडयांच्या स्नेह्यांजवळ असलेल्या प्रतींवरूनच हे काव्य छापावे लागले. तेव्हा श्लोकांची मूळ हस्तलिखित प्रत कुणाजवळ असल्यास ती आमच्याकडे पाठवावी अशी त्यांना सविनय विनंती आहे.

—संपादक, वागीश्वरी

## शृंगार संगीत

वृत्ते–विविध

लावण्य घेऊनि शशिप्रभेचें । करीत सौंदर्य विधी स्त्रियांचें
शृंगार अंगावरि अंगनेचे । अनंग रेखीत फुलाफुलांचें

साजिरी गोजिरी तारका ही शुभा । हासरी लाजरी की फुलांची प्रभा
दिव्य-लावण्य-सौवर्ण-सौदामिनी । हीच सौंदर्य-संपत्ति-सीमंतिनी

# अष्टनायिका

**प्रोषित भर्तृका--**

यंदाच्या दसऱ्यास वाहुनि शमी ओवाळणी घेतली
झाली त्या विरहांत त्यावर दिव्यावाचून दीपावली
थंडीचे दिन हे असेच सरले येणें कधीं होइल
हा आणील वसंत काय सखये ! माझा मला कोकिळ ?

**स्वाधीन पतिका--**

होतें आवडणें मनातुनि किती मी लाजणें हासणें
माझा शब्द मुखांतला वरिवरि होतें सुखें झेलणें
माझे कोड परोपरी पुरविले जातात गे ! सोत्सुक
माझा राम रमापती नवनवे माझें करी कौतुक

**वंचिता विप्रलब्धा--**

कां हीं फुलें फुलुनिया मज हासतात ?
कां भृंग--संघ मज पाहुनि निंदितात
निर्देशुनी मज कराग्र गमे मृगांक
वेलींतुनी मजकडे मुरडीत नाक

मी ही कशास भलत्याच भरी भरावें
विश्वासुनी वचन धाडस कां करावें
संकेत तो, प्रणय--वंचन हें करूनी
केलें हसें हृदयिचें हृदयेश्वरांनी

माझा कोमल बोलका शुक कुणी कोंडून का ठेविला
माझा चित्त-चकोर काय भलत्या चित्तावरी भाळला
किंवा दिग्भ्रम होउनी भटकला रानींवनीं राजस
आतां आणिक धाव घेउनि कुठें शोधूं सखे! प्रीतिस?

# ऋतु वर्णन

**ग्रीष्म–**

सुगंधी पुष्पांची मृदुल झुलती शेज रचुनी
तयाला ज्योत्स्नेचे भरजरि नवे गोफ विणुनी
सुखें प्रासादाग्रीं सरस–रति शृंगार–चतुर
विलासी ग्रीष्माचे झुलत नभि हिंडोल मधुर

**शरद–**

करूनीया स्नानें फुलत वसुधा सुस्मितवती
फुलूनीया डोले विमल गगनीं तारकतती
नव्या सौंदर्यानें नटुनि थटूनी शांत सलिलीं
शरत्कांती हासे प्रणयमधुरा नीलकमलीं

**हेमंत–**

तुषारांचे मोती हरित तृणपर्णांत खचित
प्रभा बालार्काची गिरिविटपराजींत रचित
कुरंगाच्या पाठीवर चपल हेमंत फिरुनी
दिगंताची शेतें हसवि वर सोनें उधळुनी

**शिशिर–**

पिकें हाती येतां विविधतृणधान्यें भरुनिया
जुन्या संपत्तीची अनवरत दानें करुनिया
सुखाने हा आनंदित शिशिर झाकूनि नयन
धुकें आच्छादूनी दुलइत करी गाढ शयन

**वसंत–**

नवें नेसूनीया मृदुल हिरवें क्षौम वसन
फुलांच्या शालूचा वरुनि बुरखा नीट रचुन
पिकांच्या गाण्याचा स्वर धरुनिया पंचमस्वनीं
नवोढा वासंती तरल फिरते ताल धरुनी

# अष्टनायिका

**प्रोषित भर्तृका--**

यंदाच्या दसऱ्यास वाहुनि शमी ओवाळणी घेतली
झाली त्या विरहांत त्यावर दिव्यावाचून दीपावली
थंडीचे दिन हे असेच सरले येणें कधीं होइल
हा आणील वसंत काय सखये ! माझा मला कोकिळ ?

**स्वाधीन पतिका--**

होतें आवडणें मनातुनि किती मी लाजणें हासणें
माझा शब्द मुखांतला वरिवरि होतें सुखें झेलणें
माझे कोड परोपरी पुरविले जातात गे ! सोत्सुक
माझा राम रमापती नवनवे माझें करी कौतुक

**वंचिता विप्रलब्धा--**

कां हीं फुलें फुलुनिया मज हासतात ?
कां भृंग--संघ मज पाहुनि निंदितात
निर्देशुनी मज कराग्र गमे मृगांक
वेलींतुनी मजकडे मुरडीत नाक

मी ही कशास भलत्याच भरी भरावें
विश्वासुनी वचन धाडस कां करावें
संकेत तो, प्रणय--वंचन हें करूनी
केलें हसें हृदयिचें हृदयेश्वरांनी

माझा कोमल बोलका शुक कुणी कोंडून का ठेविला
माझा चित्त--चकोर काय भलत्या चित्तावरी भाळला
किंवा दिग्भ्रम होउनी भटकला रानींवनीं राजस
आतां आणिक धाव घेउनि कुठें शोधूं सखे! प्रीतिस?

कलहान्तरिता--

वृथा करुनी नर्तना कटु-कठोर संभाषणी
विदीर्ण करिती पदप्रणतचित्त, सौदामिनी
क्षणैक परि लोपतां रतिविलास-सौभाग्य तें
स्वयंरचित दुर्दिनीं नयननीर तें वाहतें

माझें तुझ्यांत मन हें हृदयावतंसा !
मी भाळलें तुजसि राजस राजहंसा !
मी रात्र जागवुनि रूप तुझें पहावें
तूं मात्र--हाय ! भलते न मुखास यावें

झाले पुनः परतुनी किति वर्ष मास
येणेच काय वद हें रतिमंदिरास
केली सख्या ! हृदयिची लटकीच आस
निर्माल्य हें करुनि फेकुनिही दिलेंस

दो गालांचे सरसवदनीं राजसा ! घे विडे हे
दो हातांचे वरिवरि तुला हार गुंफीत आहें
दो नेत्रांचे उजळित दिवे रूप तूझें पहाया
सर्वांगाचें शयन रचिलें वाट तूझीच राया !

अभिसारिका--

जाईची कुसुमें जयां मृदुपदीं कांट्यांपरी बोचिती
उद्यांनी फिरतां जयां भय मनीं वाटें सशाचें अती
सोन्याच्या पुतळ्या अशा रति गृहालंकार लीलावती
ते संकेत--निकुंज धुंडित दऱ्याखोऱ्यांतुनी धावती

उल्लंघूनि हिमाद्रितुंगशिखरें पोहूनिया सागर
वारंवार फिरूनि फेर सगळ्या पृथ्वीस पायावर
काळाच्या उदरांतुनी उसळत्या ज्वालेंतुनीही स्वयें
बाला ज्ञात–रसा सुखें रतिगृहा जाईल ती निश्चयें

**प्रमदा—**

शेवंतीची विमल कुसुमें गुंफिलीं केशपाशी
लोळे माळा सरसरुचिरा मौक्तिकी हृत्प्रदेशी
कांची गुंजारव मधुरसा गात संगीत नाद
दृश्य–श्राव्य श्रवण नयनानंद काव्य प्रमोद

न कळत किती किंवा कैसें असे सुख दुःख वा
हुरहुर मना वाटे कैसा प्रसंग निभे नवा
तरिहि पहिल्या रात्री बाला विलासवती स्वता
सहज चतुरा उत्कंठेनें सुखें करी सिद्धता

**बाला—**

कशाला गे ? तेथें, तुजजवळ येथेंच निजतें
गडे ! किंवा तूंही चल मजसवें सोबत तिथें
कुणासंगें बोलूं कवण कुरवाळील मजला
कसा बाई ! माझा तुजसिहि तिरस्कार रुचला ?

देऊनी हृदयास धीर, पुसुनी नेत्रांतली आसवें
हौसेनें मग भूषणीं नटवुनी श्रृंगारगौरीं स्वयें
बालेला रतिमंदिरास पहिल्या रात्री धरूनी करीं
युक्तीनें समजावुनी सजवुनी नेते सखी सत्वरी

## हृदयेश्वर

कुठं ग ! असतो येतो जातो कधीं हृदयेश्वर ?
हिरुनि हृदयें नेतो कां तो तरी वरचे वर
कवण तरि हा कोणाचा गे ! कसा दिसतो तरी
अवचित कशी सत्ता याची अशी भलत्यावरी ?

जहर भरले नेत्रीं याच्या कसें कुठुनी गडे ?
सलति हृदयीं भ्रूक्षेपांचें म्हणे शर वाकडे
उगिचच कुणा चावे घेतो कधीं अधरांवरी
सहजच कुणा जीवें मारी कसा धरुनी उरीं

मधुरवचनीं पोरींना हा म्हणे भुलवीतसे
सहजच करस्पर्शे कैसें तयां जडवी पिसें ?
विकलहि कसें व्हावें लागे मनीं बघतां तया ?
उगिच हृदयें अर्पी त्याला कुणी तरि कासया ?

अशि ग ! कशि ही प्रीती याची कुणावरही जडे
कधिहि पण हा नाही कैसा मला दिसला गडे ?
म्हणति सगळे 'प्रीती' 'प्रीती तरी असते कशी ?'
"--कळल बर का बाई ! घाई नको करूं फारशी"

वागीश्वरी वर्ष ४, विलास १

◆◆◆

**मुग्धा--**

'कां गे ! हा बडिवार आज रचिशी श्रृंगार नानापरी,
येथे चित्रविचित्र कां सजविली शोभा सखे ! मंदि री
कां तांबूल इथें, कुणास्तव उटी, कां पुष्पशय्या गडे'
बाला प्रश्न करी, सखी स्मित करी,कैसे सुटे सांकडे ?

ज्ञातरसा–

'चोळी दे हिरवी, वरी जरि असो साधेंच की पातळ
त्या पेटींतुनि चंद्रहार मजला दे एक तो केवळ

ने हे हार, गुलाब, सांग, वर जा–आल्येंच मी सत्वरी
घाईने चढते स्वताच दुसऱ्या रात्री जिना सुंदरी

वेणीतूनि फुलें गळूनि पडली, निःस्नेह नीलालक
झाले लाल कपोल, नेत्र सुजले, निस्तेज झालें मुख

वारंवार बघूनि दर्पण, सखी चेष्टेस लाजूनिया
दारांतूनि जिन्यांत भीतिचकिता पाहात चोरूनिया

सखी प्रश्न–

'कां हे केश तुझे असे विखुरले, शृंगार कां भंगला'
'अस्ताव्यस्त समस्त कां बिघडला हा थाट गे! येथला'

'झाले काय विडें, कुठें तरि उटी, कां पुष्पशय्या अशी ?'
'चेष्टा ही भलतीच काय!' पटली प्रनोत्तरें मानसीं

रतिकेली–

रतिश्रमानंतर विश्रमाला
विश्रांति होताच रतिश्रमाला

एकापुढें एक अनेकदां हे
शेजेवरी नीज उगीच नोहे

अस्ताव्यस्त तुटून हार, पडले मोती बिछान्यावरी
साडी सोडुनि ठेविली कुणिकडे ती सांपडेना करीं

अंधारातच केशपाश वळुनी घाईंत लीलावती
पर्यंकावरि झोपती विखुरल्या त्या पुष्पशेजेप्रती

रत्युत्साह स्वजन मनिचा व्हावयाला प्रदीप्त
    मिथ्याकोपें रुसुनि बसती भामिनी मंदिरांत
गाढाश्लेषें अदयसुरतोल्लासकेलि प्रसंगें
    रात्री जाता प्रियजनसवें मानिती मान भंगे

पर्यंकावरती निराश कलहश्रांता वधू झोपली
    भासे गाल अजून लाल मधुनी भासेच ती हासली
संतोषे बघतां पती अवचिता शेजेवरी स्फुंदुनी
    एकाएक भयाकुला दचकते आलिंगिते कामिनी

बोलें–'कोप वृथा सख्या ! अनुनयें धि:कारुनी मी करी
    त्या कोपांतच झोप घेत पडलें बाजूस शेजेवरी
स्वप्नीं तेंच पुन:–नको स्मरण तें–तेंही नको झोपणें'
    'झाला शेवट गोड–गोड सखये स्वप्नें अशीं पाहुणें !'

तो संकोच, विकास तो, हृदयिचें तें कोपणें हासणें
    ते ते आर्जव-गौरव प्रणति त्या ती रम्य संभाषणें
त्या द्वंद्वांतुनि सावरूनि फिरतां शय्यागृहाभ्यंतरीं
    प्रीतिस्निग्ध–मनास मार्ग दिसतो पर्यंक शेजेवरी

**प्रभातकाळ–**

निशावसानीं जरि कामिनीला
    आलिंगुनी देह न धन्य केला
तरी स्वयें लावुनि भस्म अंगी
    हिमाचलीं होउनि बैस योगी

कान्ता कान्तिमती कान्तविश्रांता क्रांत–कांतिनें
प्रसन्न नभही कान्त मन: संताप–शांतिनें

झाकूनि साऱ्या खिडक्यांस जाळीं
 आच्छादनें पांघरुनीं सकाळीं
घेतां मिटोनि मग लोचनांतें
 शय्यागृही कृत्रिम रात्र होते

तीं आलिंगन बंधनें उकलली, संभाषणें संपली
तीं तीं स्निग्ध विलोकने, कुशल तीं भ्रूनर्तनें थांबली
लज्जेचे मिटले गुलाब, पुसलीं गालावरी चुंबनें
डोळे लावुनि दूर दूर निजली हा चंद्र ते चांदणें

एकांतीं रतिमंचकी रतिगृही एकाच शय्येवरी
कैशी त्यां अनुरक्त दोन हृदयां येईल निद्रा परी
वाटे झोप सरेल, होईल पुढें आरभ कार्यक्रमा
मध्यान्हावरि ते करीत मिटल्या नेत्रात रात्रिभ्रमा

रविप्रभा–धूसर यामिनी–पती
 रतिश्रमक्लान्त विलासिनी सती
परस्परांचे उपमेय दृश्य तें
 उष: प्रकाशांत विशोभ शोभतें

सायंकाळी धीट जे नीट डोळे
 तेथें आतां लाजरी वीज खेळें
स्वच्छन्दाचे मोकळें हास्य गाली–
 होतें, तेही लाल झालें सकाळी

**प्रणयचिन्हे–**

प्रथम परिचयाची विस्मृती ती न व्हावी
 प्रथमच रजनीची साक्ष कांही असावी
रसिक, कुच–कपोलीं रेखितो की सुरेख
 चतुर रतिरसाचें रम्य शृंगार–लेख

फिरवुनी बघते स्तनमंडलें
फिरविते अधरीं कर कोवळे

कुठुनिया कसल्या मज वेदना ?
करि विचार मनांत पुनः पुन्हा

नख-क्षत कुचांवरी पसरले, असो एकदा
नसे कठिण कंचुकीमधुनि झाकणे आपदा
परी अधर कोवळे करित चावुनी चाळणी
कसें लपवुं गौप्य हें ? सभय पाहते दर्पणी

**गौप्य गोपन–**

माझी मोहनमाळ आज उजळा द्यायास मी तोडिली
जाळीला करवंदिच्या अडकुनी साडी सखे ! फाटली
घेतां पद्मसुगंध भृंग उडूनी गालास की चाविले
नारीनें वदुनी असत्य वचनें तें गौप्य संगोपिलें

**अपेक्षा–**

लीला विलासांत विलीन होते
ती रात्र केव्हांच सरुन जाते
आशे अपेक्षेंत उदासवाणा
किती युगांचा दिन ओसरेना

सदा मला ध्यात मलाच गात
आडून माझ्याचकडे पहात
बुडेल केव्हां रवि या विचारी
डोळ्यांपुढे आणुनि रात्र सारी

भेटीस उत्कंठित जाहलेला
पर्यंक शेजेवरी बैसलेला
कांही तरी योजित मानसांत
उदास भासे दिवसास कान्त

आकाङक्षदृष्टी मज पाहतात
पाहूनिया मंजुल हासतात
मध्येच संकेत कधी करीत
हासूनि गालांतुनि वाहतात

पाणी पिण्याचें असुनीहि आंत
विडे सुपारी जरि चौफुल्यात
तरी पुन: पाठवुनी निरोप
बोलाविती ते मजला समीप

एका ठिकाणीच बसाउठावें
परस्परांशीच हसारुसावें
परी कुणी काय म्हणेल बाई !
नकोच तें ! हा दिनही न जाई !

**प्रसन्नता--**

'नकोच सन्मान नकोच कीर्ती । कुबेर संपत्ति नको मला ती
सर्वस्व माझें हृदयेश्वरी ही । सदैव देवा ! मजलागि देई'
'गौरीहरानें मजलागि देणें । कीं जन्मजन्मान्तरिं हेंच लेणें
मागूं तरी आणिक काय देवा । माझ्या प्रभूची मज देई सेवा

या आनंदनिधान-नंदनवनीं ही कल्पवेली वसे
सारें सार्थक धन्यता सकलही कल्याण तेथें असे
ही सोपानपरंपरा चढुनिया पीयूष ते प्राशुनी
वैकुंठास सदेह नीट चढणें शय्या-विमानांतुनी

आतां सावध ! सावधान-घटिका संपूर्ण आली भरू
हातीं काम-लता स्वयें गवसली सोनें जिवाचें करू
आतां दीप नको, नको वसनही, ही भूषणेंही नको,
पायीं लोटुनि घेतलें रमणिच्या कांही दुजें तें नको'

**स्वकीया--**

घेती वेचुनि नीट हार गजरे म्यां गुंफिलें तेवढे
चातुर्ये तबकांतुनी निवडती म्यां बांधिलेले विडे
बाई ! भारिच नेटकी नजर ती स्वारीस एका क्षणीं
माझी मुग्धमनोगतेंहि कळती डोळ्यांकडे पाहुनी

वाटें भ्रांति, बघूनि दार उघडें सोत्कंठ कुंजी उभा
पाहे गर्भगृहांत भीतिचकिता प्राणेश--दीप प्रभा
हे लक्षांत रहस्य येउनि सखी दीपावली मालवी
अंधारांत महोत्सवास करुनी बाला निशा घालवी

**स्फुट--**

विलासिनींची हृदयें कठोर
रुचे तयां मंजुल वाग्विहार
फुलाहुनी नाजुक कोमलांग
परी रुचे निर्दय अंगसंग

पीयूषसिंधू भरुनी विधिनें निराळी
नारीमया ललितसृष्टि सुखार्थ केली
पीयूषपान रसिकास करावयाला
आज्ञेवरून विधिच्या अधिकार आला

झोपेत सारा दिन घालवूनी
शृंगार सायंसमयीं करूनी
सारी निशा जागुनि जागवीती
कामीजनीं लोकविरुद्ध रीती

श्रृंगार-सार--सरिता सरसीरुहाक्षी
उत्तुंगपीनकुचभारविनम्रदेहा
सीमंतिनी सुमसुशोभितकेशपाशा
ज्यांना न मोहविति मोहिनि ते विमूढ

गालांवरी प्रेमविलास हासे
शालीनता लोचनलीन भासे
तारुण्य संपूर्ण वपुप्रकाश
ओष्ठीं सुधासिंधु करी विकास

बाला गालांत हासे वरिवरि बघुनी चोरट्या दृष्टिपातें
ओढूनीया करानें पदर तनुवरीं सावरीते कुचातें
थोडें बोलूनि धैर्यें भयचकित पुनः लाजते बोलण्यास
ते हे लीलावतीचें अभिनयमधुर प्रेमलीलाविलास

सायंकाळी पसरुनि नवी शेज ताज्या फुलांची
आनंदानें स्वकरिंच उटी घाशितां चंदनाची
जीं जीं स्वप्नें पडति ललनालोचनीं जागृतींत
त्या स्वप्नींची शयनिं निजुनी नीज होई कृतार्थ

**प्रथम रजनी—**

वरति नेत बळें रति–लालसा । परि पुनः गमतें भय मानसा
धरुनि फेर जिन्यावर सुंदरी । उतरते चढते वरचेवरी

वरिवरि भ्रमतें मन कामुक । धडधडा उडतो उर उत्सुक
द्रुत–विलंबित ती चढते जिना । उतरते चढतेच पुनः पुन्हा

बघति काय सख्या चढतांवरी । वळुनि पाहत लाजुनि घाबरी
वर कदाचित होईल ऐकणें । हळुंच टाकित पाउल भीतिनें

ते श्रृंगार, विहार ते, तबक तें, ती चंदनाची उटी
चित्रें, दीप, सुगंध, हार–गजरे, पर्यंक तो शेवटीं
पाहूनी सगळे विलास पहिल्या दृष्टींत कान्ताजनां
दारी पाउल टाकतांच पहिली अस्पष्ट ये कल्पना

अज्ञानांत पदप्रवेश पहिला शय्यागृही एकदा
तेंव्हांचें भय एकदाच, पहिला संकोच तो एकदां
लीलालालित एकदांच पहिली आलिंगनें चुंबनें
पर्यंकावरि रम्य रम्य पहिलें तें एकदां जागणें

सोपान जेंव्हां चढते विलासिनी
आमंद ये मंजिर रंजितध्वनी
सालंकृता भासत गात शारदा
वीणेवरी मंजुळ काव्य-संपदा

लीलानृत्य करीत फेर धरुनी भ्रूवल्लरी वाकड्या
पायी सुस्वरसार मंजुळरवें नादावती तोरड्या
गाली सप्रणय प्रसन्न खुलला श्रीराग तारस्वनीं
शय्या-मंदिरिं सानुराग विलसे संगीत-सीमन्तिनी

शय्यागृहाकाश निकें विकासवी। श्रृंगारसाहित्यविलास हासवी
चंद्राननेची मुखचंद्रचंद्रिका। शोभा नवी देत सुवर्णमंचका

मंदिरीं चतुरा परोपरि लाज लाजुनि राहते
वाकड्या नयनांतुनी बहु लाजुनि पति पाहते
लाजते परि पाहते, वरि पाहतें परि लाजते
पाहुनी वरचेवरी बहु लाजते परि पाहतें

नेटका पति नीट रोखुनि पाहतां परि लाजरी
चोरुनी करकंकणीं पतिमूर्ति पाहत साजिरी
लाविल्या नजरा पुनः पति पाहतां दुसरीकडे
दर्पणांतुनि पाहतो पति लोल लोचन वाकडे

ओवाळीत सलज्ज पंकजदृशा भ्रूक्षेप नीरांजनें
गुंफूनी करवल्लरीस चवऱ्या ढाळीत आलिंगनें
स्वच्छन्दे उधळीत सस्मितमुखीं सोनें रुपें हासुनी
वीरांचा करितात गौरव वधू पर्यंकसिंहासनीं

कंठीं सादर सानुराग सुमनें गुंफूनिया प्रीतिनें
रेखूनी विविधांगरागरचना कस्तूरिका चंदने
आनंदें वदनीं त्रयोदशगुणी तोडूनिया तांबूल
वामांकीं हृदयेश्वरीस पतिही संन्मानिती प्रेमळ

वाटे इथे येउनिया पतीनें । न्यावें धरूनी कर आदरानें
येता परी पाहुनिया पतीला । उभ्या स्थलीं कंप तनूस आला

वाटे मनांतून विलासिनीचें । व्हावें सुखें मीलन लोचनांचें
होता पतिस्पर्श परी कपोलीं । डोळ्यांतली लाज विशेष झाली

मनांत अस्पष्ट विचार येती । गालांवरी स्पष्टचि बिंबताती
विमुग्ध लीला नव बालिकेची । आशा निराशा करिते पतीची

मोठे योध्दे शरण चरणीं एकट्या बाण घातें
मोठे मोठे द्विरद वश ते एकट्या दृष्टिपातें
मुग्धा बाला वश करुनिया मंचकीं न्यावयाला
मोठ्यांनाही कठिण पडतें तें जयाचें तयाला

युध्दीं ठोकुनि दंड सज्ज अरिशीं सोत्कंठ झुंजावया
किंवा प्रेममहोत्सवी तरुणिशीं आनंद भोगावया
जे जे वीर, समर्थ तेच असती, धिक् भीरुवृत्ती जन
ज्यांचें सारविचार नीति नियमें आधार घेई मन

विद्या, बुध्दि, श्रुतिहि सगळ्या, सर्व शास्त्रप्रमेयें
लज्जा भीती, नयविनय ही, तीहि अत्युच्च ध्येयें
जीं जीं तत्वें खचुनि भरलीं वेदवेदांतपृष्ठीं
ती नारींच्या विहरति सुधासारधाराधरोष्ठी

येथे ही बघ मोहिनी झुलतसे, हे चंपकाचे झुले
उद्यानीं परडींत वेंचित दिसे वासंतिका ही फुलें
हाती घेउनि हात दावित पती चित्रें बहु प्रीतिनें
बालेला रतिमंचका जवळुनी आणीतसे युक्तिने

आली ही रतिदान मागत शुका रंभा इथें भूतला
तारेचा अनुराग हा बघ कसा गालावरी शोभला
पश्चात्ताप करीत भामिनि इथें गेला निघूनी हरी
येथे नग्न तिलोत्तमा-वर पहा होऊं नको घाबरी

'झालें काय दिव्यास ?' वात सरली, साराव्रया पाहतां
गेला दीप 'चुकूनि' त्यात विरली चित्रांतली चित्रता
अंधारीं चुकुनी पुनः कर धरूं जाता निरी ये करीं
तो प्रत्यक्ष तिलोत्तमा उतरली स्वर्गांतली भूवरीं

जैसी सांज खुले, फुले स्मित तसें, दोन्ही कपोलांवर
जैसा उंच चढे शशी, चढतसे अत्युच्च आशाभर
जों जों शांत दिशा-दिशांत, मनही तों तों प्रसन्नोत्सुक
भूगोलास विभावरीसम सखी चुंबी सख्याचे मुख

प्रिया श्लेषीं पुष्पास्तरणिं करितां नित्य शयन
पितां साक्षात् द्राक्षासव अधरिचें नेत्र मिटुन
कुठे झाले अस्तोदय, रजनि केव्हां, कधि दिन ?
कळेना हें आहे भुवन अथवा नंदनवन

विलासप्रणयी कान्त लीला ललित कामिनी
शोभा अन्योन्य सानंद-विलासविलोकनीं

सजुनि नाजुक मन्मथमंजरी
मृदुपदीं झुकतां रतिमंदिरी
वरिवरी परिरंभण चुंबन
हळुच नंतर दीप विसर्जन

आनंदोत्कर्ष, जेव्हां प्रमुदित रमणी शांत एकांत भेटे
तो सौख्योत्कर्ष, जेव्हां विनयवति उभी, हात हातांत थाटे
सौंदर्योत्कर्ष, जेव्हां विलसत ललना वस्त्रभूषाविहीन
तो दीप्त्युत्कर्ष, जेव्हां शयनगृहिं दिवा टाकिते मालवून

'नाही तेल दिव्यांत ?' 'कांत शयनी वाचीत भाराभर
'केली शेज न काय ?' 'गाढ करितो निद्रा पती तीवर'
जातो वेळ उगाच, हार गजरे शृंगार केला नसे
होतो दाह सखे ! –निरोप–तुजला सारेंच सांगू कसे?'

झाली फार निराश निद्रित पती पाहूनि शेजेवरी
वाटे, 'जागवुं काय ?' धैर्य कुठले त्या बालिकेला परी
न्याहाळीत मुखास, बाजूस उभी, डोळयांतल्या अश्रुनें
प्रीतीच्या पुरुषोत्तमास विनवी 'घ्या येवढे धावणे'

डोळे लावुनी वाट पाहत पती होता प्रसन्नोत्सुक
झोपेचे मिष घेउनी बघतसे सानन्द ते कौतुक
पाहूनि स्मित तें परी दचकली, आलें कळूनी मना
विद्युद्वेग तशी दिवा विझवुनी झाकीतसे वंचना

माळा फुलांच्या शयने फुलांची
अलिंगनेंही खुलल्या दिलांची
लतालतांच्या फुलल्या फुलांत
पर्यंक शय्या झुलत्या झुल्यांत

स्वर्लोकीचे विहरति सुधाकुंभ बिंबाधरांत
भूगोलार्धद्वय विलसती कांचनी कंचुकींत
पाताळीचे अभिनवनवोल्लास लावण्य अंगी
त्रैलोक्याचें विभव सजलें अंगसंगप्रसंगी

विलीन आलिंगन बंधनात
अद्वैत झालें रतिमंदिरांत
जिवाशिवांची उरभेट झाली
शय्यागृही मंगल संधि आली

सकल सरली रात्र आता, शशी पडला फिका
उजळित उषस्तेज प्राची-नभः पट हा निका

त्वरित अजुनी जागा होई सख्या मनमोहना !
क्षणभर मनाजोगें माझ्या करी तुज याचना

झालें जागरण प्रियाविनवणीमध्ये सरे यामिनी
सूर्यास्तावरि भेट दुर्मिळ पुनः होईल गे भामिनी!

झालेले अपराध सर्व विसरीं माझी क्षमायाचना
हें अर्घोदयपर्व मंगल करूं मांगल्य-संपादना

मंगलं भगवन्नाम मंगलं नाम शारदा
काव्यं श्रृंगार-संगीतं प्रसन्नं नित्यमंगलम्

◆◆◆

## १. जयहिंदभूमि

या कविरायांनो ! या या
हिंदभूमि गुण गाऊं या ॥ध्रु॥

हिंदभूमि गुणीं । प्रेरुनी वाणी
गुंफुनि गाणी । गाऊं या
तत्पद गायनि । क्षणभर रमुनी ।
आनंदाने नाचूं या ॥१॥

परमेशाते । प्रेमभरानें
ज्या वाणीनें गौरविले
तीच योजुनी । मातृस्तवनीं
क्षण कर्तव्यीं लावूं या ॥२॥

करति सार्थक । काय निरर्थक ।
काय विघातक । स्वहिताचे
कर्तव्याची जाणिव साची
विचारपूर्वक होऊ द्या ॥३॥

विरस कल्पना । करुनी नाना ।
लोकरुचींना । बिघडवुनी
कवि पदवीला । नीच धुळीला
लोळविती तिज वाचवु या ॥४॥

स्व-राज्यगानें । भारु जनमनें
स्वराज्याविणें व्यर्थ जिणें
ह्या मंत्रानें भरुं भू-गगनें
हिंदवासिजन जागवूं या ॥५॥

◆ ◆ ◆

वि. ज्ञा. विस्तार जाने. १९२१

## २. सोक्ष की मोक्ष

एक आज द्या मजला जागा हृदयांत तरी
अथवा मज लोटुनि द्या स्वकरें स्वर्गांत तरी

एक पाज मज सजना अधरसुधा आज तरी
अथवा प्याले भरुनी विष मजला पाज तरी

प्रेमाच्या जादूने नंदनवन पाहिन तरी
अथवा या चरणी हें जीर्ण सुमन वाहिन तरि

एक आज जिंकिन हा प्रेमसमर रंग तरी
अथवा पावेन सुखें एकदांच भंग तरी

◆ ◆ ◆

वागी. व. १ वि. १

## ३. बिकट वाट

कृष्णा तुझी फार बिकट वाट प्रीतीची
कांही तरी लाज धरी लोक रीतींची ।।ध्रु।।

भर रस्त्यावर दिवसा । पदर ओढतोस कसा
तरणी ज्वान परकी मी नार नवतीची ।।

हीरे काय काळ-वेळ । तुज सदाहि तोच खेळ
चावट तू तुजशी न शंकाहि भीतीची ।।

नको रे नको अडवू हरी । काय तुझ्या हृदयी तरी
वाटेवर पडली का, गोष्ट भलतीशी

## ४. खेळगडी

बाळपणीच्या घरदारी
विनू ग माझा शेजारी

*

करवंदीच्या झाडाशी
विनायकाच्या पाठीशी
दोन्ही डोळा झांपड
लपले मी दाराआड

*

तो मज शोधायास निघे
खेळगडी आम्ही दोघे
मग मागे तो मीहि पुढे
करवंदीच्या मुळाकडे
पळता पळताना थकले
विनायकाला सांपडले

*

बाळपणीचे हे खेळ
बाळपणीचा तो मेळ
जीवाभावाला रूचला
आईबापा आवडला

*

दिवस तरी हे सोन्याचे
दिसले मजला भाग्याचे
लाज मला आता त्यांची
नाव तिकडचें घ्यायाची

◆ ◆ ◆

## ५. माझी सुशी

**Whome God Love, die young**

लोलक डोळे–सुशी माझी हळू हळू चाले
प्रात:काळी ते इवलाले
हासत हासत उघडी डोळे
भूक दुधाची बाळ तान्हुले
पिउनि ममताळे–जा खेळ खेळ तव चाळे
भातुकलीची मौज मजेची
स्वयंपाकाची घाई कशाची
भात भाकरी लटु पटुची
भुकेला आले–भाऊ बाळ दादा सगळे
नवलाखाची माझी भुलाई
कुठे ठेविली गोजिरी बाई
तिला नेसते साडी आई
मैना बोले मधु बोले घर दुमदुमले

※

## ६: सखुबाई

थकुबाई मोठ्या थकुमार
अडाचं पानी बहु दूर
नका घेऊ एवढी घागर
मोडल थकुची कंबर

※

चिट नेसली बुट्टेदार
अंगात चोळी रंगदार

※

आइक माझ्या दिलदारा
येथ कांही रंग नाही वरा
कोणीकडून आली लांड सवत
भुलविला माझा नीळकंठ

✳

घरात सासू सासरा
आणिक बाई देर भासरा
नंदा माझ्या वैरणी
देतील कज्जा लाऊनि

◆ ◆ ◆

## ७. रंग खेळत हरि

चाल—आनंदाचा कंद

राधे संगे रंग खेळत यमुना पुलिनी श्रीहरी
श्याम मनोहर व्रजकामिनीवर राधेसंगे श्रीहरी
गोपी वेष्टित बर्ह विभूषित वाजवुनी मधुबासरी
दिग्‌मंडळभर गुलाल भरला
वाळवंटी थर जाहला
गोपी हरिवर पिचकाऱ्याभर रंग फेकिती केसरी
राधे संगे रंग खेळत यमुना पुलिनी श्रीहरी

◆ ◆ ◆

## ८. काळी चंद्रकला

काळी चंद्रकळा, नाही येत माझ्या मना
नेसतील तुझ्या सुना
मायबाई ।।

काळी चंद्रकळा, पदरी रामबाण
नेस तुला माझी आण
राधाबाई ।।

काळी चंद्रकळा, पदरी रामसीता
नेसली पतिव्रता
राधाबाई ।।

काळी चंद्रकळा, जशी काजळाची वडी
लेणाराची दृष्ट काढी
आत्याबाई ।।

काळी चंद्रकळा, जसं काजळाचं बोट
घेणाराचं मन मोठं,
राजाभाऊ ।।

काळी चंद्रकळा, नेसू नको आंगणात
पति तुझा बंगल्यात
मायलेकी ।।

काळी चंद्रकळा, त्याला मोतियाची जाळी
नेसू नको संध्याकाळी
बाई माझे ।।

◆ ◆ ◆

# ९. मेले नवरे

अग हे नको नको ग नकोच मेले नवरे ।।धृ।।

पुढे पुढे करा
यांचे पाय धरा
मेले फुकट घरी देव्हारे ।।

बाई जीव गह्राण
कपड्या--लत्त्यास वाण
जन्मवरीचे घर-पोतेरे ।।

हे कोणाचे कोण
मेले पैशास दोन
चार दिवस गळ्यावर सुरे ।।

※

# १०. चांदणी

तुज पाहुनि मनि येते ही चांदणी नभीची ।।
जरतारी गुलाबी गाल । शशिबिंब धवल हे भाल
नयनाची चमक विशाल । पुतळीच मन्मथाची
तनु पिवळी कनकरसाची । वर साडी ही ठिपक्याची
सुकुमारा नवनवतीची । कलिकाच चंपकाची
गजऱ्याने शोभे वेणी । जणु बिजली की अस्मानी
करी कंकण छुमछुमवाणी । वनदेवता वनीची

◆ ◆ ◆

कधी बागेमध्ये प्रियकरिणी संगे विहरता
हवाना धूम्राचे पसरित मुखे लोट भंवता
सुवर्णाच्या चष्म्यातुनि वदन आनंद वघुन
डियर, माय लव्ह, ऐसे म्हणत पळवत् नेईन दिन

✳

झाकी शशी-किरण निर्जल मेघ जो का
गांजी नृपाल बलहीन गरिब लोका
जो दंश दुष्ट करी वृश्चिक की निरर्थ
यांनी जगांत जगण्यात महा अनर्थ

✳

समस्ताश्चर्यांचे सलिल निधि आश्चर्य जगती
द्विजे आचामीला सकल–अधिकाश्चर्य न मिति
परी अत्याश्चर्य–द्विज कलशजन्मा मुनी असे
अपाराश्चर्याचा निधीच गमतो वारिधि नसे

✳

शशी–स्वच्छ–ज्योत्स्नांकित रजनी, सौधाग्रशयने
सुगंधी वाळयांचे व्यजन–मृदुल-क्षौम–वसने
जलांची कारंजी, रस विविधहि हार फुलते
विलासी ग्रीष्माची चतुर लीला विलसते

✳

वसंताच्या रात्री मलयगिरीचे वात सरस
पिकांचें आम्रांतर्गत रव सुमोद्दाम पळस
विलास-प्रासादे सुभग-सुम-शोभा उपवनी
नवोढा सृष्टीचे विभव रचिती सर्व मिळुनी

✳

राहीन मी नित्य असा उपाशी
खाईन केव्हांहि परी तुपाशी
येईल जेव्हां प्रभुच्या मनांत
मिळेल सिंहासन तै वनात

✳

लक्ष्मी प्रसन्नवदना सदनात नांदे
सत्कीर्ती–सौरभ नभांत समस्त कोंदे
कांता सुशीलचरिता रमवी मनाला
याहून स्वर्गसुख काय सुरेश्वराला ?

✳

## संताच्या विभुती

परस्त्री स्वस्त्रीचा मुळी न धरला भेदच अता
सुधेशी मद्याची ठसत दृढ चित्तात समता
प्रभावे ज्ञानाच्या सहज सगळे कर्म सुटले
कुशंका–भी–लज्जा–नय–विनय सारेच फिटले

जगाच्या व्यापारी सहज मग निस्संग बनुनि
निमग्न स्वानंदी मन विनटले आत्मभजनी
कुणी निंदा वंदा स्वहितकर धंदा मज भला
जगाच्या कल्याणास्तव मम खटाटोप सगळा

✳

## सावधान

ताडमाड उभा उंच स्वर्गाला नेटला वर
गोष्पदांत बुडे ऐसी कुलुंगी पोर भूवर
ओणवा होत पाताळी करितो प्रीतीयाचना
वायुयानांत आकाशी देत ती मुखचुंवना
चढाओढीत दोघांची आणभाक परस्पर
वाङ्निश्चय विवाहाचा सिध्द झाले वधूवर
पाताळीची नागकन्या स्वर्गीय वर प्रेमल
भूवरी लागले लग्न ‘सावधान सुमंगल’

✳

## वल्गना

गेला राम तुझा उगीच भलती आता नको वल्गना
लंकेच्या मशकास मारुनि तुझा खोटाच मोठेपणा
सांगे वाल्मिकि--ऐकते जग--तुझा तो काळहि संपला
आम्ही वानर प्रत्यहि बघतसो--की एक तू त्यांतला
माझा वेग महाभयंकर गिरी दुर्गे उडो पाहती
सारी ही ग्रहमाळ--विश्व सगळे पंखांत झांकोळती
नासाश्वास गुणेच शत्रु कुणीहि माझ्यापुढे येईना
जाई येथुनी कोटि मर्कट तरी आणून घे सामना

## दाहक सौंदर्य

सुरी सोनेरी हास्य लकेरीत
कालकूटहि या चपल लोचनांत
केशरचनेतुनि दंश भुजंगाचे
प्राणहारक हे रूप अंगनेचे
सकल भीषणता याच चारुतेत
प्राण संशोधन प्राण जीवनांत
याच मायाजाळांत मर्मघात
वेच प्राणांची अमृतसिंचनांत

## मातेस

सदाशिवे देवि नमोऽस्तु माते
सुवर्णभूमि तुझिया पदाते
तूझाच हा बालक मातृ--देवी
तूझ्या पदी सादर शीर्ष ठेवी
लक्ष्मी तुला त्यजुनि दूर निघोनि गेली
देवी सरस्वतिहि आजच रुष्ट झाली
ज्यांनी तुझ्या सदनीचे जलहि वहावे
त्यांनी विपत्तीत तुझ्या तुज का त्यजावे

# बोबडे यांच्या हिन्दी कविता

(श्री बोबडे हे मराठी पद्यरचनेबरोबरच मधून मधून हिंदीतही पद्यरचना करीत असत. त्यांची हिंदी काव्यरचना मराठी इतकीच नितांत मधुर आहे. वाचकांच्या परिचयार्थ त्यांच्या संग्रहातून पुढील कविता देत आहोत)

## १. काहेको प्रीत लगाई ?

काहेको प्रीत लगाई । मोहन
बन जमुनाके कुंजलतामें । मीठी बातें बनाई । मोहन
गले चढाकर तुलसि कि माला । मुखसे बन्सि सुनाई । मोहन
एक अबला चरणों में लेकर । अब कहा हो सुखदाई । मोहन

✻

## २. प्रीत चरणों में लगी है

प्रीत चरणों मे लगा है । है निभाना हाथ तेरे
पियासा प्रेमरस की है । है बुझाना हाथ तेरे

रैन दिन अबतो नैनोमे । मोहनी मूरत समाई है
वहीं मुखचंद मनोहरसा । है दिखाना हाथ तेरे

जिस पियारे चरणसंगकी । हमे दिलसे धुन लगी है
उस चरण सेवामे हाजिर । है कराना हाथ तेरे ।

यह बरेदा हुवा अबसे । नज़र आगे हमारी है ।
इसी संसार सागर से । हैं जिलाना हाथ तेरे

◆ ◆ ◆

वागीश्वरी वर्ष ५, विलास ७
नोव्हेंबर १९३४

मुद्दतसे लबे बाम नझारें नहि होते
क्या खौफ अय है के इशारे नहि होते
पैलूसे उठाया मुझे नक्कारा समझकर
क्या चांदके नजदिक सितारे नही होते
सायलसे मेरी जान खफा यौं नहि होते
क्या मांगने वालोंके गुजारे नही होते
घर दिलमे अभी होकर विलायतका नजारा
क्या डुबे हुवे बेडे किनारे नहि होते

※

इश्कमे क्यौं के बचे जान बडी मुश्किल है
दिलसे मजबूर हूं इनसान बडी मुश्किल है
एकसे एक जमानेमे हसी है बढकर
करिये किस किसपे फिदा जान बडी मुश्किल है
दिलकु वसियत है शहमान बडी मुश्किल है
बच रहे चाक गरीबान वडी मुश्किल है
राह चलते हुवे वोह दिलकु लिये जाते है
जिनसे न कुछ जान न पहिचान बडी मुश्किल है

◆◆◆

REFBK-0022589